पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

बुधवार, दि. १६ जुलै, २०२५ | वर्ष : १३ | अंक : १९० | पाने ८ | किंमत २ रुपये

www.janpravaslive.in E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

३ वैद्यकीय पदवी नसतानाही रुग्णांवर उपचार

४ दोनशे कोटीचे रस्त्याचे काम निकृष्ट ?

५ ऑनररी लेफ्टनंट संतोष साबळे यांचा सेवापूर्ती समारंभ

पान ८ वर..



## शंभूराज देसाई अन् आदित्य ठाकरे, वरूण सरदेसाई यांच्यामध्ये जोरदार खडाजंगी; विधानसभेत राडा

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : राज्याचं पावसाळी अधिवेशन सध्या मुंबईत सुरु आहे. आज (१५ जुलै) विधासभेत मंत्री शंभूराज देसाई आणि ठाकरे गटाचे आदित्य ठाकरेंसह वरुण सरदेसाई यांच्यात जोरदार राडा झाला. यावेळी मंत्री गुलाबराव पाटील शंभूराज देसाई यांच्या मदतीला धावून आले.



मुंबईतील वांद्रे परिसरातील ४२ एकर जमीनवर डिफेन्स लँड संरक्षण विभागाची मालकी असल्याने ९४८३ झोपड्यांचे पुनर्वसन रखडले आहे. ही लक्षवेधी वरुण सरदेसाई यांनी मांडली. यावर मंत्री शंभूराज देसाई यांनी २०१९ ते २०२२ साली एकदाही याबाबत तत्कालीन सरकारने बैठक घेतली नसल्याचे सांगितले, यावरुन वरुण सरदेसाई यांच्यासह आदित्य ठाकरे चांगलेच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. मंत्र्यांनी जे पत्रकात आहे, तेच सभागृहात सांगितलं. त्यांना चांगलं ब्रिफिंग मिळालं नसेल, असं वरुण सरदेसाई म्हणाले. तुम्हाला उत्तर ऐकायचं नाहीय का?, असं म्हणत शंभूराज देसाई रागाने खाली बसले. यानंतर मंत्री गुलाबराव पाटील हे शंभूराज देसाईंच्या मदतीला धावले. छातीवर हात मारत लाज काढण्याचा अधिकार तुम्हाला कुणी दिला आहे?, तुम्ही जन्मताच शिकले का? असा सवाल गुलाबराव पाटील यांनी उपस्थित केला.

तुम्ही २०१९ ते २०२२ पर्यंत काय केले? याबाबत सांगा. एकदाही पत्र दिले नाही. एकदाही पाठपुरावा केला नाही. त्यावेळी कुणाचे सरकार होते? २०२२ साली एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर चारवेळा आम्ही पत्रे दिली. तुम्ही काय केले? आमची लाज काढू नका. तुम्ही काय केले ते सांगा? असे म्हणत शंभूराज देसाई यांनीदेखील आक्रमक भूमिका घेतली. मी २०१९ ते २०२२ यावेळेत पाठपुरावा झाला नाही, हे मी म्हटले, जर मी कुणाचं नाव घेतलेले नाही तर मग एवढी नाकाला मिरची लागायचे कारण काय? असा सवालही शंभूराज देसाईंनी उपस्थित केला.


विधानसभा सभागृहाच्या बाहेर येत वरुण सरदेसाईंनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी वांद्रे मधील ४२ एकर डिफेन्सच्या जमिनीचा प्रश्न मी विचारला आणि गृहनिर्माण विभागाकडून हे उत्तर अपेक्षित होतं. अर्धा तास लक्षवेधी झाली, मात्र प्रश्नाचे उत्तर मिळालेलं नाही किंवा तो प्रश्न सोडवला गेला नाही. आम्ही आमच्या मतदारसंघातील प्रश्न सोडवायला विधानसभेत येतो, हे हक्काचं विधिमंडळ आहे जिथे जनतेचे प्रश्न सोडविले जातील, पण येथे २०१९ ला काय झालं? २०२२ ला काय झालं? हे सुरू आहे. हे धंदे आता बंद करा, जनतेचे प्रश्न सोडवा, असे वरुण सरदेसाईंनी सांगितले.

## जिल्हा परिषदेचे गट, पंचायत समिती गणांचा प्रारूप आराखडा जाहीर

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठीचा गट आणि गणांच्या रचनेचा प्रारूप आराखडा जिल्हा प्रशासनाकडून जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार ७३ गट आणि १४५ गण असून, आराखड्यानुसार जुन्नर, खेड आणि इंदापूर या तीन तालुक्यांमध्ये सर्वाधिक म्हणजे प्रत्येकी आठ सदस्य असणार आहे. त्यामुळे ७३ पैकी २४ सदस्य या तीन तालुक्यांत असणार आहेत.

तर सर्वांत कमी म्हणजे २ जिल्हा परिषद सदस्य संख्या ही वेल्हा तालुक्यात असणार आहे. या आराखड्यावर हरकती आणि सूचनांसाठी २१ जुलैपर्यंत मुदत देण्यात आली आहे. प्रारूप आराखडा जाहीर झाल्याने आता जिल्ह्याच्या ग्रामीण भागात निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत.



जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांकडून आराखड्याचा अहवाल शुक्रवारी जिल्हा प्रशासनाला देण्यात आला होता. त्यानंतर गट-गण रचनेचा प्रारूप आराखडा १३ तहसील कार्यालयाबरोबरच पंचायत समिती कार्यालये आणि जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर ती प्रसिद्ध करण्यात आला आहे.

यामुळे इच्छुकांची मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. समाविष्ट गावांमुळे हवेली तालुक्यातील सात गट कमी झाले आहेत. नवीन गटरचनेत जुन्नर, खेड, भोर, दौंड आणि इंदापूर तालुक्यात प्रत्येकी एक गटाची वाढ झाली आहे. जिल्ह्यात २०१७ मध्ये जिल्हा परिषद सदस्यांची संख्या ७५ होती. सन २०१७ नंतर हवेली आणि मुळशी तालुक्यातील काही गावांचा समावेश महापालिकेच्या हद्दीत करण्यात आला.तर उरुळी देवाची –फुरसुंगी या दोन्ही गावांची मिळून स्वतंत्र नगरपालिका स्थापन करण्यात आली आहे. त्यामुळे त्याचा परिणाम जिल्हा परिषद सदस्य आणि पंचायत समित्यांची सदस्य संख्या कमी होण्यावर झाला आहे. हवेली तालुक्यात २०१७ मध्ये जिल्हा परिषद सदस्यांची संख्या ही १३ होती. आता या तालुक्यात जिल्हा परिषद सदस्य संख्या ६ वर आली आहे. तर जुन्नर, खेड, दौंड, भोर आणि इंदापूर तालुक्यात जिल्हा परिषद सदस्य संख्येत एकने वाढ झाली आहे.

## संक्षिप्त

### यंदाही गिरगाव चौपाटीवरच होणार बाप्पांचे विसर्जन

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : मुंबईतील मोठ्या गणपतीच्या विसर्जनाचा तिढा सुटला नसला तरी, मुंबई महापालिकेने गिरगाव चौपाटीवर बाप्पाचे विसर्जन होणार हे गृहीत धरून येथील विसर्जनाची जय्यत तयारी सुरू केली आहे. विसर्जनाच्या काळात चौपाटी स्वच्छ ठेवण्यासाठी विविध सामाजिक संस्थांची निवड करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी अर्जही मागवण्यात आले आहेत.

पीओपी गणेशमुर्तींचे समुद्र व नैसर्गिक तलावात विसर्जन करण्यात हायकोर्टाची बंदी आहे. त्यामुळे राज्य सरकारकडून पर्यायी व्यवस्था शोधली जात आहे, परंतु मोठ्या गणेश मुर्तींचे समुद्राशिवाय विसर्जन करणे शक्य नाही. त्यामुळे महापालिकेने पीओपी मुर्तींच्या विसर्जनाचा तिढा सुटला नसला तरी, सर्वाधिक गणेश मूर्तींचे विसर्जन होणाऱ्या गिरगाव चौपाटीवर विसर्जनाची तयारी सुरू केली आहे. काही दिवसांपूर्वी गिरगाव चौपाटीवरील विसर्जनाच्या तयारीसाठी समुद्राच्या रेतीमध्ये गणेश मुर्तींच्या गाड्या फसू नये यासाठी पुरेशा मनुष्यबळासह स्टील प्लेटस टाकणे आणि काढण्यासाठी हायड्रा आणि वेल्डिंग मशीनची तरतूद आणि डोझर, विबरो रोलर आणि जेसीबीचा पुरवठा करणे, विसर्जनाच्यावेळी समुद्रात बुडणाऱ्या भक्तांना वाचवण्यासाठी लाईफ गार्डससह मोटारबोटसाठी विविध प्रक्रिया राबवण्यात आली होती.

### भाजपशी सोयरिक ‘बिना हुंड्याची’

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : पुणे जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष आणि माजी आमदार संजय जगताप यांनी सासवडमध्ये मेळावा घेत १६ जुलै रोजी भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीमध्ये भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. सामान्यांचे प्रश्न आणि पुरंदर हवेलीचा विकास अधिक गतीने व्हावा, या दृष्टिकोनातून हा निर्णय घेण्यात आला आहे.’

भाजपमध्ये प्रवेश करताना मला कोणतेही पद हवे आहे, याबाबत चर्चा झालेली नाही. त्या उलट पुरंदर विधानसभा मतदारसंघामधील विकास कामांसाठी भरीव निधी देण्याचा आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून आपल्याला मिळाले आहे. पूर्वी काँग्रेसमध्ये संघटनात्मक कार्य दिसत होते. मात्र, काही काळापासून त्यामध्ये कमी पाहायला मिळत आहे. कुठल्याही संघटनेमध्ये संवाद महत्वाचा असतो, मात्र त्या संवादाची कमतरता कुठेतरी काँग्रेसमध्ये जाणवत आहे. त्यामुळे तुलनेने चांगली संघटन असलेल्या भाजपमध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे.

## डिलिव्हरी बॉयच्या वेशात येऊन दुचाकी वाहने चोरी करणारा गजाआड

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : डिलिव्हरी बॉयच्या वेशात येऊन दुचाकी वाहने चोरुन नेणाऱ्या वाहन चोरट्याला येरवडा पोलिसांनी अटक केली आहे. मुसेफ अकिल शेख (वय १९, रा. सेवक चौक, लक्ष्मीनगर, येरवडा) असे या चोरट्याचे नाव आहे.

येरवडा पोलीस ठाण्यातील पोलीस अंमलदार भिमराव कांबळे आणि बालाजी सोगे यांना त्यांच्या बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, ईशान्य मॉल येथे एक संशयित दुचाकी वाहन चोर फिरत आहे. या बातमीच्या अनुषंगाने पोलिसांनी ईशान्य मॉल परिसरात त्याचा शोध घेऊन पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या मुसेफ शेख याला पकडले. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने मौजमजा करण्यासाठी दोन दुचाकी चोरल्या असल्याचे सांगितले. त्याच्याकडून येरवडा पोलीस ठाण्याच्या परिसरातून चोरलेल्या ६० हजार रुपयांच्या दोन मोटारसायकली जप्त केल्या आहे. श्रेणी पोलीस उपनिरीक्षक प्रदिप सुर्वे तपास करीत आहेत.



ही कामगिरी सहायक पोलीस निरीक्षक रविकांत नंदनवार, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप सुर्वे, पोलीस हवालदार सचिन गवळी, मनोज शिंदे, पोलीस अंमलदार बालाजी सोगे, भिमराव कांबळे, शैलेश वाबळे, संदिप जायभाये, नवनाथ गांगुडे, नटराज सुतार, अमोल गायकवाड यांनी केली आहे.

## राजीव गांधी प्राणीसंग्रहालयात १६ हरणांचा मृत्यू

### तपासासाठी नमुने प्रयोगशाळेत

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : कात्रज येथील राजीव गांधी प्राणी संग्रहालयात गेल्या काही दिवसांत १६ हरणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. यामध्ये २ नर आणि १४ मादी चितळांचा समावेश असून ७ जुलै ते १२ जुलैदरम्यानपर्यंत या १६ त्यांचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे वन्यजीवप्रेमी आणि पर्यावरणप्रेमींमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. उन्हाळी सुट्ट्यांमध्ये लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत गर्दीने फुलणाऱ्या या संग्रहालयात वाघ, सिंह, मगर, माकडांसारख्या अनेक प्रजातींबरोबरच ९८ हरणांचा स्वतंत्र अधिवास होता. मात्र, मागील चार ते पाच दिवसांत तब्बल १६ हरणे मृतावस्थेत आढळल्याची बाब समोर आली असून ही बाब चिंतेची आहे.





मृत्यूचं नेमकं कारण अद्याप अस्पष्ट असलं, तरी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपास सुरू केला आहे. मृत्यू झालेल्या हरणांचे नमुने तसेच खाद्यपदार्थांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. महाराष्ट्र झू अथॉरिटी व रोग अन्वेषण विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल होऊन तपास करत आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार साथीच्या रोगामुळे हा प्रकार घडला असल्याची शक्यता असून प्रयोगशाळांमधून अंतिम अहवाल प्राप्त झाल्याशिवाय ठोस कारण सांगता येणार नाही.

महापालिकेचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. घनश्याम पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार गेल्या चार-पाच दिवसांत या १६ हरणांचा मृत्यू झाला आहे. मात्र मागील दोन दिवसांत किंवा आज एकही मृत्यू झालेला नाही. मृत्यूचे कारण शोधण्यासाठी अन्नाचे आणि इतर नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. प्राथमिक स्वरूपात कोणत्याही गंभीर संसर्गाचा निष्कर्ष समोर आलेला नाही.

प्राण्यांच्या मृत्यूच्या कारणाचे अद्याप अचूक निदान झालेले नाही. शवविच्छेदन करुन त्यांच्या अवयवांचे नमुने देशातील भोपाळ, भुवनेश्वर आणि नागपूर अशा तीन प्रयोगशाळांमध्ये दिले आहेत. तिथून अहवाल प्राप्त होणार आहेत. त्यानंतर प्राण्यांच्या मृत्यूबाबत अचूक निदान होईल.

## खडकवासला धरण साखळीत ७५ टक्के पाणीसाठा

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : : खडकवासला धरण साखळीतील पानशेत, वरसगाव, टेमघर आणि खडकवासला या चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे, आज मंगळवारी (१५ जुलै) सकाळी ६ वाजेपर्यंत एकूण पाणीसाठा २१.६२ टीएमसी, म्हणजेच ७४.१६ टक्के इतका झाला आहे.

मागील वर्षी याच दिवशी म्हणजे १५ जुलै २०२४ रोजी साठा केवळ १०.८० टीएमसी (३७.०५%) होता. यावर्षी जून महिन्यापासून पावसाने जोरदार हजेरी लावल्यामुळे धरण साठ्यात दुपटीने वाढ झाली आहे. खडकवासला धरणात मागील २४ तासांत अवघ्या ३ मिमी पावसाची नोंद झाली असून, सध्या जलपातळी ५८०.७१ मीटर आहे. एकूण साठा १.१८ टीएमसी (५९.५९%) असून, आतापर्यंत ५.०५ टीएमसी पाणी धरणाच्या सांडव्याद्वारे मुठा नदीपात्रात सोडण्यात आले आहे. नवा उजवा मुठा कालवा सध्या ९० क्यूसेकने सुरू आहे. पानशेत धरणात २१ मिमी पाऊस झाला असून, जलपातळी ६३०.४१ मीटर आहे. धरणात ७.८० टीएमसी (७३.२५%) साठा असून, मागील २४ तासांत १४७ दशलक्ष घनफूट पाण्याची आवक झाली आहे.

## खाजगी बस व दुचाकीची समोरासमोर धडक; तीन तरुणांचा जागीच मृत्यू

**जनप्रवास । प्रतिनिधी**

निरगुडसर : मंचर घोडेगाव रस्त्यावर पळस्टीका फाटा येथे दुचाकी व प्रवासी आराम बसच्या झालेल्या अपघातात तीन तरुणांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना दि. १५ रोजी चार वाजल्याच्या दरम्यान घडली आहे. अथर्व संदीप खमसे वय १८, भारत सुदाम वाजे वय १८, गणेश रामभाऊ आसवले वय १८ सर्व रा. कोळवाडी घोडेगाव असे मयत झालेल्या तीन तरुणांची नावे आहेत.



उत्तर प्रदेश येथील यु.पी ९०, बी टी ३५७० हि खासगी प्रवासी आराम बस भीमाशंकर बाजूकडे प्रवाशांना घेऊन जात असताना घोडेगाव मंचर रस्त्यावर पळस्टिका फाटा येथे मंचर च्या बाजूकडे दुचाकी स्कुटीवर येणाऱ्या तीन तरुणांची समोरून बसला धडक बसली या अपघातात बसच्या खाली जाऊन तीनही तरुणांचा जागीच मृत्यू झाला. सदर अपघात एवढा भीषण होता की बसने दुचाकीला काही अंतर फरपटत नेले अपघातात दुचाकीचा चेंदामेंदा झाला आहे. रुणांना रुग्णवाहिकेद्वारे उपजिल्हा रुग्णालय मंचर येथे दाखल केले असता डॉक्टरांनी ते उपचारा पूर्वीच मयत झाले असल्याचे सांगितले. घोडेगाव पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला आहे. पुढील तपास पोलीस करत आहे.

## विंग कमांडरचा बंगला फोडला ४० तोळे सोने, ८ लाख लंपास

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : शहरातील सर्वात सुरक्षित समजल्या जाणाऱ्या परिसरात दरोडेखोरांनी थैमान घातल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. जांभुळकर चौकातील कौशल्या बंगल्यात लष्कराचे विंग कमांडर वीरेंद्र कुमार झेंडियाल यांच्या घरात पहाटेच्या सुमारास पडलेल्या दरोड्यामुळे शहरात खळबळ उडाली आहे. अधिकच्या माहितीनुसार, पहाटे अंदाजे २.३० ते ३ च्या सुमारास दोन अज्ञात चोरटे झेंडियाल यांच्या बंगल्यात घुसले. झोपेत असलेल्या विंग कमांडर यांच्या बेडरूममध्ये घुसून त्यांच्या तोंडावर हात ठेवत त्यांना जागे केले. सोने कुठे ठेवले आहे?, अशी विचारणा करत धमकी दिली की जर हालचाल केलीस तर वाईट परिणाम होतील. चोरट्यांच्या हातात हातोडा, हेक्सा ब्लेडसारखा रॉड होता.

विंग कमांडर यांच्या कपाटाची चावी हिसकावून घेत त्यांनी कपाट उघडले व त्यातील तब्बल ४० तोळे सोने आणि साडेआठ लाख रुपये रोख चोरून नेले. काही क्षणातच चोरटे पसार झाले. लष्कराच्या अधिकाऱ्याच्या घरी दरोडा पडल्याने पोलिस प्रशासनही हादरले आहे, वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले . परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले आहे.

## तुकोबा – माऊलींची होणार भेट

### देहू देवस्थानने निमंत्रण स्वीकारले; आळंदीत जंगी स्वागताची तयारी

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : संत ज्ञानेश्वर महाराजांचा ७५० वा जन्मोत्सव आणि संत तुकाराम महाराजांचा ३७५ वा वैकुंठगमन सोहळ्याचे औचित्य साधून तुकाराम महाराजांची पालखी परतीच्या प्रवासात आळंदीत आणावी यासाठी आळंदी देवस्थानाकडून देहू देवस्थानला पत्राद्वारे निमंत्रण देण्यात आले होते. यापार्श्वभूमीवर देहू देवस्थानने आळंदीकरांचे हे निमंत्रण स्वीकारले असून जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची पालखी येत्या रविवारी (दि. २०) आळंदीत माऊलींच्या भेटीला येणार आहे. विशेष म्हणजे तुकोबारायांचा पालखी सोहळा आळंदीत मुक्काम करणार आहे.



माउलींची पालखी येत्या रविवारी (दि.२०) आळंदीत दाखल होणार आहे. त्याच दिवशी संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा आळंदीत यावा असे निमंत्रण देवस्थानाकडून देण्यात आले होते. याबाबतचे पत्र आळंदी देवस्थानचे सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखणे आणि विश्वस्त चैतन्य महाराज कबीर यांनी देहू देवस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे यांना दिले होते. परंपरेप्रमाणे संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा आळंदीतील संत ज्ञानेश्वर महाराजांच्या भेटीस जाणे महत्त्वाचे मानले जाईल असे पत्रात नमूद करण्यात आली होते. पूर्वी संत तुकाराम महाराज आळंदीत माउलींचे दर्शन घेऊन पंढरपूरला मार्गस्थ होत असे. त्यांच्या पश्चात त्यांचे पुत्र तपोनिधी नारायण महाराज यांनी पालखी सोहळा सुरू केला. १६८५ पासून देहूमधून संत तुकारामांच्या पादुका पालखीत ठेवून ते आळंदीत येत होते. नंतर संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका पालखीत घेत पुढे पंढरपुरला प्रस्थान करत होत्या. त्यानंतर ही परंपरा खंडित झाल्यावर गुरु हैबतबाबा आरफळकर यांनी १८३२ मध्ये स्वतंत्रपणे संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा सुरू केला. त्यानंतर दोन्ही संतांच्या पालखीचे मार्ग बदलले. दोन्ही पालखी सोहळ्यात लाखोंच्या संख्येने भाविक सहभागी होत आहेत. या दोन संतांची भेट होण्यासाठी या वर्षी सोहळा आळंदीला नेण्याची मागणी वारकऱ्यांच्या वतीने आळंदी देवस्थानने देहू देवस्थानला केली होती. दोन्ही देवस्थानच्या विश्वस्तांमध्ये सखोल चर्चा करण्यात आली. देहू देवस्थान येथे निमंत्रण स्वीकारल्याने संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज या दोन पालख्यांच्या भेटीचा अनुपम सोहळा येत्या रविवारी हजारो भाविकांना अनुभवता येईल.

# अग्रलेख : हा तर मिलीजुली सरकारचाच प्रयोग...!

विधानसभेत सत्ताधारी पक्षाकडे प्रचंड मोठे बहुमत आहे, ही वस्तुस्थिती असली तरी दोन्ही सभागृहात विरोधकांनी ज्या पद्धतीने आपल्या तलवारी म्यान केल्या आहेत, त्यावरून विरोधकही अप्रत्यक्षपणे सत्ताधाऱ्यांचेच समर्थन करीत असावे अशी शंका घेण्यास भरपूर वाव आहे. वास्तविक राज्यात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न, लाडक्या बहिणींच्या भाऊबिजेचा खेळखंडोबा, एवढेच कशाला, संजय शिरसाट बॅग प्रकरणासह अनेक विषयांवरून सरकारला घेरण्याची मोठी संधी विरोधकांना चालून आली होती. त्यादृष्टीने पावसाळी अधिवेशन तापण्याची शक्यता वर्तविली जात होती. पण दुर्दैवाने शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस सर्वच नेते, आमदार जणू गलितगात्रच झाल्याचे दिसन आले. वास्तविक विरोधी पक्षातील काही आमदार, नेते मोठमोठ्याने बोलताना दिसतातः परंतु ते केवळ ओरडणे असते. आतापर्यंत कोणत्याही मुद्यावर विरोधकांनी सरकारला अडचणीत आणले आहे किंवा तसा प्रयत्न केला असे दिसले नाही. एवढेच काय, तर सभागृहाच्या पायऱ्यांवर घोषणाबाजी आणि सभागृहात मात्र सर्वत्रच शांतता ही अधिवेशनाचे गांभीर्यच घालविणारी ठरत आहे.

हिंदी सक्तीच्या मुद्यावरून मुंबई मोठे शक्तिप्रदर्शन करणाऱ्या ठाकरे गटाने या विषयावर सभागृहात आश्चर्यकारकपणे मौन बाळगल्याचे दिसते. सरकारने तोशासनादेश रद्द अवश्य केला; परंतु एक नवी समिती स्थापन करूनत्या माध्यमातून हिंदीचे पुनर्वसन करण्याचा मार्ग खुलाच ठेवला आहे, त्यावर कोणतीही चर्चा झाली नाही. आता ही जी काही समिती नेमली जाणार आहे तिचा अहवाल राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतरच बाहेर येईल, तोवर मराठीच्या माध्यमातून जो काही जाळ निर्माण झाला होता तो शांत होईल. वर म्हटल्याप्रमाणे सत्ताधारी पक्षाकडे खिंडार पाडणे अशक्य असलेली बहुमताची भक्कम तटबंदी आहे.

पाच वर्षे हेच सरकार सत्तेत राहणार हे निश्चित आहे. परंतु ही वस्तुस्थिती सत्ताधाऱ्यांपेक्षा विरोधकांनी अधिक मनापासून स्वीकारल्याचे दिसते. त्यामुळे सरकारची आणि खास करून मुख्यमंत्र्यांची खप्पामर्जी होऊ नये, याची काळजी घेत विरोधक वरवरचा आणि औपचारिक विरोध सभागृहात करताना दिसत आहेत. काही प्रसंगात तर सत्ताधाऱ्यांनी आणि त्यातही खास करून भाजपच्या मंडळींनीच विरोधकांना खाद्य पुरविल्याचे दिसून आले. भाजप नेते, विशेषतः फडणवीस सध्या शिंदे गटावर चांगलेच नाराज आहेत. एकनाथ शिंदेंचे अमित शाहांसोबत असलेले थेट कनेक्शन फडणवीसांना खूपत आहे, त्यातच अमित शाहांच्या माध्यमातून एकनाथ शिंदे फडणवीसांवर वर्चस्व गाजवू पाहत आहेत. अशा प्रकारच्या राजकारणात चांगलेचे मुरलेले फडणवीस आता शिंदेंना धडा शिकविण्याच्या मागे लागले असावेत. दोन दिवसांपूर्वी विधानपरिषदेत शिंदे गटाच्या मंत्र्यांच्या कारनाम्यांची चर्चा सुरू असताना, अचानक ठाकरे गटाच्या आमदारांनी संजय शिरसाट यांच्या मुलाचे हॉटेल खरेदी प्रकरण उकरून काढले. हा विषय उकरून काढण्यासाठी त्यांना सत्ताधाऱ्यांकडून संदेश गेल्याचे बोलले जात आहे. त्यांनी हे प्रकरण उकरून काढताच मुख्यमंत्र्यांनी तातडीने या प्रकरणाची चौकशी करण्याचे आश्वासन दिले. खरे तर मुख्यमंत्री आपल्या मंत्र्यांचा शक्य त्या पातळीपर्यंत बचाव करतात. स्वतः फडणवीसांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात आपल्या अनेक मंत्र्यांना विरोधकांच्या तीव्र आक्षेपानंतरही अभय दिले होते; परंतु यावेळी काही वेगळेच दिसत आहे. ठाकरे गटाच्या आमदारांना शिंदे गटाच्या मंत्र्याविरोधात उचकविले जात आहे आणि विरोधकांनी मागणी करण्यापूर्वीच मुख्यमंत्री चौकशीचे आदेश देऊन मोकळे होत आहेत.पूर्वी शरद पवारांच्या बाबतीत असे म्हटले जायचे की महाराष्ट्रात ते आपल्या पक्षासोबतच विरोधी पक्षही चालवत असतात. सध्या फडणवीस सरकार व विरोधी पक्ष चालवित आहेत. विरोधकांनी कोणत्या मुद्यावर आक्रमक व्हावे व कोणत्या मुद्याकडे दुर्लक्ष करावे, हे फडणवीसच ठरवत असल्याचे दिसते.

ज्या जनसुरक्षा विधेयकाच्या बाबतीत विरोधकांनी सभागृहाबाहेर प्रचंड गदारोळ माजविला होता, ते विधेयक विधानसभेत डाव्या पक्षांच्या एक दोन आमदारांचा अपवाद वगळता एकमताने मंजूर झाले. ठाकरे गट बाहेर कितीही बोलत असला तरी सभागृहात त्यांची भूमिका वेगळीच असते. या विधेयकाला मान्यता देऊ नये, अशी विनंती आम्ही राज्यपालांना करणार असल्याचे उद्धव ठाकरे म्हणाले. परंतु त्यांच्या आमदारांनी विधानसभेत या विधेयकाला मूकसंमती का दिली, या प्रश्नाचे उत्तर देण्याचे ते टाळतात. परवा प्रवीण गायकवाडांवर हल्ला झाला, विधानसभेत विजय वडेट्टीवारांनी तेवढ्यापुरता तो मुद्दा उपस्थित केला, मुख्यमंत्र्यांनी त्यावर बाजू मांडताच सगळे शांत झाले. वास्तविक गायकवाड यांच्या हल्ल्यामागे भाजप आणि आरएसएसचा हात असल्याचा आरोपही होत आहे. परंतु त्याला विरोधी काँग्रेस-राष्ट्रवादीनेही (शरद पवार पक्ष) न्याय देण्यासाठी आवाज उठविला नाही. फक्त शरद पवार, सुप्रिया सुळेंनी गायकवाडांना फोन करून आपुलकीचा फार्स केला. इकडे भाजपने मात्र त्या हल्ल्यामागे पक्षाचा संबंध नाही. तो हल्लेखोराने व्यक्तीगत केलेला हल्ला प्रकार आहे असे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. इकडे शरद पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे मोदींच्या योजनांचे कौतुक करतात अन् मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जयंत पाटील यांना मोदींच्या योजना आवडू लागल्याचे सांगत संभ्रम निर्माण करीत आहेत. एकूणच काय, तर विरोधकांचा विरोध विसरून सरकारचे समर्थन करणे हा मिलीजुली सरकारचा प्रयोग जनतेचा विश्वासघात म्हणावा लागेल.

# राज्यात अनेक मंत्र्यांचे पत्ते होणार कट?

राजकारण

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस धक्कातंत्र वापरण्याची शक्यता

वादग्रस्त वक्तव्य, कारभारातील निष्क्रियता या सर्वांमुळे बहुमतात असूनही महायुतीची गाडी गती घेईना. उलट दररोज नवनवे वाद निर्माण होत आहेत. यासाठीच आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मंत्रिमंडळात धक्कातंत्र वापरत फेरबदल करण्याची शक्यता असल्याची चर्चा आहे. पावसाळी अधिवेशन संपल्यानंतर याचा फैसला होईल. पण हे धक्का तंत्र फक्त भाजपच्या मंत्र्यांपुरतं मर्यादित असेल की एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीसाठीही असेल याचीही चर्चा रंगली आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणाकडे अवघ्या देशाचं लक्ष लागलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लवकरच राज्याच्या कॅबिनेटमध्ये मोठे फेरबदल होण्याचे संकेत मिळत आहेत. या संकेतानुसार अनेक बड्या मंत्र्यांना आपली खुर्ची गमवावी लागणार आहे. तर अनेक नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता सूत्रांकडून वर्तवली जात आहे. हे धक्का तंत्र फक्त भाजपच्या मंत्र्यांपुरतं मर्यादित असेल की एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीसाठीही असेल याचीही चर्चा रंगली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडी घडत आहेत. त्या अनुषंगाने आता राज्याच्या कॅबिनेटमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता सूत्रांकडून वर्तवली जात आहे. लवकरच महायुती सरकारमध्ये मंत्रिमंडळात फेरबदल होणार आहेत. काही इतर पक्षातील दिग्गजांना पक्षात घेऊन मग त्यांना मंत्रिमंडळात घेऊन मंत्रिपद दिलं जाईल, असं बोललं जात आहे. अनेक मंत्र्यांचे पत्ते कट केले जातील. खांदे पालट होईल, अनेक नव्या चेहऱ्यांना कॅबिनेटमध्ये संधी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच यामुळे अनेक मंत्र्यांना धक्का बसणार असल्याचे बोललं जात आहे.

### महायुतीत तणाव

गेल्या काही दिवसांपासून राज्याच्या राजकारणात घडत असलेल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर हा संभाव्य मंत्रिमंडळ विस्तार अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. महायुती सरकारमध्ये लवकरच मंत्रिमंडळात मोठे फेरबदल होणार असून अनेक विद्यमान मंत्र्यांचे पत्ते कट केले जातील, असे बोललं जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या या 'धक्का तंत्रा'ची सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरु आहे. यापूर्वी केवळ भाजपच्याच मंत्र्यांना याचा फटका बसेल अशी शक्यता वर्तवली जात होती. पण आता सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसमधील काही मंत्र्यांनाही याची झळ बसू शकते, असे बोललं जात आहे. यामुळे महायुतीतील तिन्ही घटक पक्षांमध्ये मोठी उलथापालथ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### नवीन चेहऱ्यांना संधी देणार का?

या मंत्रिमंडळ फेरबदलात अनेक नव्या चेहऱ्यांना कॅबिनेटमध्ये संधी मिळण्याची शक्यता आहे. पक्षसंघटनेत चांगले काम केलेल्या किंवा आपापल्या भागांमध्ये मजबूत पकड असलेल्या नेत्यांना मंत्रिपदे दिली जाऊ शकतात, असे संकेत मिळत आहेत. त्यासोबतच, काही इतर पक्षातील दिग्गजांना पक्षात घेऊन मग त्यांना मंत्रिमंडळात घेऊन मंत्रिपद दिलं जाईल, असेही बोललं जात आहे. यामुळे विरोधकांमध्येही अस्वस्थता वाढण्याची शक्यता आहे.

## नाराजांनाही संधीची शक्यता; सांगलीला संधी मिळणार का?

एकतर्फी बहुमत असूनही राज्याच्या मंत्रिमंडळात समतोल संधी देण्यात महायुतीच्या नेत्यांना अपयश आले. यामध्ये अनेक जिल्हे मंत्रिपदापासून वंचित आहेत, तर एका जिल्ह्यात तीन पक्षांचे चार-चार मंत्री आहेत. परिणामी या मंत्र्यांना बाहेरच्या जिल्ह्यांचे पालकत्व देण्यात आले आहे. यातून अनेक ठिकाणी स्थानिक पालकमंत्रीपदाचे वाद आहेत. नाशिक, रायगडसह अनेक जिल्ह्यात तर घटक पक्षांच्या नेत्यांमध्ये खुलेआम द्वंद्व सुरू आहे. याचा फटका स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत बसू शकतो. अशा परिस्थितीत फेरबदल करायचे का, अशी चर्चाही सुरू आहे. यासह अनेक कारणांसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा दिल्ली दौरा झाल्याची चर्चा आहे. आता फेरबदलात सांगली, सोलापूरच्या स्थानिक आमदारांना संधी मिळणार का याची उत्सुकता आहे.

## अंतरंग

### मतदार याद्यांची झाडाझडती व्हावी!

बिहारप्रमाणे देशभरातील मतदार याद्यांची फेरपडताळणी करण्याचा निर्णय केंद्रीय निवडणूक आयोगाने घेतला आहे. पुढील महिन्यापासून ही प्रक्रिया सुरू होईल. यासाठी आयोगाने सर्व राज्यांमधील आपली निवडणूक यंत्रणा सक्रिय केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने गत आठवड्यात 'एसआयआर'ला (स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन) घटनात्मकदृष्ट्या वैध ठरवून बिहारमध्ये हा कार्यक्रम सुरू ठेवण्याची मुभा दिली. त्यानंतर आता निवडणूक आयोगाने संपूर्ण देशभरात हा कार्यक्रम राबविण्यासंदर्भात पावले उचलल्याचे सांगितले जाते. अनेक विरोधी पक्षांनी आणि इतरांनी सरकारच्या या कृतीविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती.

काही राज्यांच्या मुख्य मतदान अधिका-यांनी त्यांच्या राज्यात या पूर्वी झालेल्या 'एसआयआर'नंतरच्या जाहीर करण्यास सुरुवात केली होती. दिल्लीमध्ये २००८ तर उत्तराखंडमध्ये २००६ मध्ये शेवटचे 'एसआयआर' पार पडले होते. राज्यांत या पूर्वी झालेल्या 'एसआयआर'नंतरच्या मतदार याद्यांचा आधार नव्याने 'एसआयआर' प्रक्रिया राबविताना केला जाणार आहे. बिहारच्या बाबतीत २००३ च्या मतदार यादीचा आधार घेऊन ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. अनेक राज्यांनी २००२ ते ०४ दरम्यान 'एसआयआर' प्रक्रिया राबविली होती. बिहारमध्ये यंदा निवडणुका होणार असून त्यानंतर आसाम, केरळ, पुदुचेरी, तामिळनाडू, पश्चिम बंगालमध्ये २०२६ मध्ये निवडणुका होणार आहेत. आयोगाच्यावतीने बिहारमध्ये सुरू असलेल्या मतदार यादी सुधारणेच्या कार्यक्रमादरम्यान बुथ स्तरावरील अधिका-यांना नेपाळ, बांगलादेश, म्यानमारमध्ये लोक मोठ्या प्रमाणावर आढळून आले.

न काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांनी मतदार याद्यांच्या फेरपडताळणीला विरोध करत सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. यामुळे पात्र मतदारांना मताधिकारापासून वंचित व्हावे लागणार असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे तर अवैध शरणार्थी, घुसखोर यांची ओळख पटवून त्यांना मतदार याद्यांमधून वगळण्यासाठी सखोल पडताळणी करण्यात येत असल्याचे निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे. बिहारमधील मतदार याद्यांमध्ये नेपाळ, बांगलादेश आणि म्यानमारच्या नागरिकांचादेखील समावेश असल्याची धक्कादायक माहिती समोर आली. या लोकांकडे आधार कार्ड, रेशन कार्ड, रहिवासी प्रमाणपत्रदेखील आहेत म्हणे. आयोगाच्या अधिका-यांनी दिलेल्या माहितीनुसार १ ऑगस्ट नंतर योग्य तपासणीअंती ३० सप्टेंबरला प्रकाशित होणा-या अंतिम मतदार यादीतून अशा लोकांची नावे वगळण्यात येतील. बिहारमधील मतदार याद्यांच्या पुनरावलोकनाचा मुद्दा तापला असून या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे.

न्यायालयाने मतदार याद्यांच्या फेरपडताळणीस स्थगिती दिली नसली तरी आधार कार्ड, रेशन कार्ड हेदेखील पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यास सांगितले आहे. यंदा होणा-या बिहारच्या विधानसभा निवडणुकीसाठी त्या राज्यात मोठ्या प्रमाणावर मतदार याद्यांचे पुनर्विलोकन सुरू आहे. यामुळे बिहारमध्ये मोठ्या प्रमाणावर वाद सुरू असतानाच आता संपूर्ण देशात मतदार याद्यांची झाडाझडती सुरू करण्याची शक्यता केंद्रीय निवडणूक आयोग तपासून पाहत आहे. देशभरात ऑगस्टपासून मतदार यादीच्या विशेष सखोल पुनर्विलोकनाची शक्यता लक्षात घेऊन केंद्रीय निवडणूक आयोगाने सर्व राज्यांतील निवडणूक यंत्रणेला सज्ज केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने गत आठवड्यात मतदार यादी पुनर्विलोकन 'घटनात्मक कर्तव्य' म्हणून घोषित केले. यावर बंदी घालण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला मात्र आधार, रेशन कार्ड आदी पुरावेही ग्राह्य धरण्याचे आदेश दिले. खासदार कपिल सिब्बल यांनी निवडणूक आयोग कायमच मोदी सरकारच्या हातातील बाहुले बनले आहे, अशी टीका केली आहे. बिहारमधील मतदार याद्यांची फेरपडताळणी घटनाबा असून बहुमत असलेले सरकार कायम सत्तेत राहण्यासाठीचा हा प्रयत्न असल्याचा आरोप केला आहे. आयोगाकडे नागरिकत्वाचा निर्णय घेण्याचा अधिकार नाही मात्र तरीदेखील विशेष सखोल पुनर्विलोकन मोहीम राबवून आयोग मतदारांच्या नागरिकत्वाची पडताळणी करत आहे. हे सारे सरकारच्या इशा-यावर चालले आहे. बिहारमधील मतदार याद्यांमध्ये नेपाळ, बांगलादेशच्या नागरिकांची नावे मोठ्या प्रमाणात आढळली आहेत, असे निवडणूक आयोगाने म्हटले आहे. घरोघरी पडताळणी केल्यानंतर ही बाब उघड झाली. अशा अवैध नागरिकांची नावे अंतिम यादीत सामील केली जाणार नाहीत. ही यादी ३० सप्टेंबर रोजी प्रकाशित होईल. वास्तविक बिहारच्या २४३ विधानसभा मतदारसंघात ३८ जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यां-मार्फत विविध अधिका-यांच्या सहायाने मतदार व मतदान यादीची तपासणी केली जात आहे. निवडणूक आयोगासोबतच राजकीय पक्षांसोबत नियुक्त केलेले दीड लाख कार्यकर्ते प्रत्येक घराघरात जात आहेत. निवडणूक आयोगाच्या एका अधिका-याने म्हटले आहे की, २८ जुलैला बिहार मतदार पुनर्विलोकन प्रकरणाची पुन्हा सुनावणी होईपर्यंत आयोग अंतिम निर्णय घेणार नाही त्यानंतरच देशभरात ही प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेण्यात येईल. बिहारमध्ये आगामी निवडणुकांचे वारे जोरात सुरू आहेत. बिहार सरकार आगामी ५ वर्षात राज्यातील १ कोटी युवकांना नोकरी व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणार असल्याचे आश्वासन मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी दिले आहे. खासगी विशेषत: औद्योगिक क्षेत्रात नोकरी व रोजगाराच्या नव्या संधी निर्माण केल्या जाणार आहेत त्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

– माधवी सावंत

## पंचांग

विक्रम संवत्- २०८१ आषाढ शके संवत्- १९४७
संवत्सर - विश्वावसूनाम अयन- दक्षिणायान मास-
आषाढ ऋतु- सौर वर्षा कृष्ण पक्ष तिथि : षष्टी २१:०२:११
नक्षत्र : उत्तरा भाद्रपद २८:५०:१५+ योग : शोभन
११:५६:४९ करण : गर ०९:५२:४७ करण : वणिज २१:०२:११
सूर्य : कर्क १७:३०:३९ चन्द्र : मीन हिजरी सन् - १४४६
मुस्लिम मास - मोहरम तारीख -२० विशेष
रामजीबाबा पुण्यतिथी - मोर्शी (अमरावती)

## राशी भविष्य...

**मेष** वेळेत कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. मित्रांचे व सगे सोयऱ्यांचे सहकार्य मिळेल. निष्कारण वाद विवाद, तणाव टाळला पाहिजे. व्यापारातील योग्य निर्णय फायदेशीर राहील.

**वृषभ** आपली दयाळू प्रवृत्ती, उदारतेमुळे आपल्याला एक नवीन सुख देऊन जाईल. नवीन पद मिळण्याची शक्यता आहे. गुंतवणूकीच्या बाबतीत जागृत रहा. मुलांचे जीवन समाधानी राहील.

**मिथून** जीवनसाथीच्या प्रकृतीची चिंता जाणवेल. खर्च वाढल्याने आर्थिक टंचाई भासणार आहे. व्यापार व्यवसाय सामान्य राहील. वादविवादापासून दूर रहा.

**कर्क** व्यक्तिगत कामात प्रगती राहील. आर्थिक परिस्थिती सुधारणार आहे. समाजात आपले कौतुक होईल. व्यापार फायदेशीर राहील. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**सिंह** नम्रपणा सोडू नका. वयस्कर लोकांचा सन्मान व आदर ठेवा. व्यापारीक निर्णय वेळेत घेतल्याने फायदा होईल. जीवनसाथीच्या प्रकृतीची चिंता जाणवेल.

**कन्या** जीवनसाथीचे सहकार्य आपल्याला मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. प्रतिष्ठीत लोकांच्या भेटीमुळे आपल्या फायद्यात वाढ होईल. प्रवासात सावधानी बाळगा.

**तूळ** व्यापार चांगला चालेल. संपत्ती बाबत आकांक्षा पूर्ण होतील. कामामध्ये यश मिळविण्यासाठी प्रयत्नशील रहा. कौटुंबिक किंवा घराची समस्या भेडसावेल.

**वृश्चिक** जास्त धावपळ केल्याने थकवा जाणवेल. आपल्या अपक्षेप्रमाणे कामे होणार नाहीत. व्यवसायात फायदा मिळण्याची शक्यता कमी. आत्मविश्वास बाळगा.

**धनू** जोखमीचे व जबाबदारीचे कामे सावधतेने करा. निष्कारण धावपळ करू नका. प्रयत्न करून आज यश कमी मिळेल. कौटुंबिक समस्यांची चिंता राहील.

**मकर** प्रतिष्ठीत व्यक्तींच्या संपर्कामुळे फायदा होईल. आपल्या आर्थिक परिस्थितीती सुधारेल. कामे टाळण्याचा प्रयत्न करू नका. व्यापारातील नवीन योजना फायदेशीर राहतील.

**कुंभ** कौटुंबिक संबंध मधुर राहतील. मान सन्मान वाढेल. भागीदारीचे अनेक नवीन प्रस्ताव मिळतील. अनोळखी व्यक्तीपासून सावध रहा. अडकलेला पैसा मिळेल.

**मीन** अति उत्साह आपल्याला नुकसान पोहचवेल. प्रवासाचा फायदा होणार नाही. अधिक खर्च करण्याची प्रवृत्ती सोडा. व्यापार मध्यम राहील. कार्यकुशलता वाढणार आहे.

## पारावरचा फड



राज्यातील जिल्हा परिषदांच्या प्रभागरचना आणि त्यांच्या गटनिहाय संख्या निश्चितीचा फेरा एकदा सुरू झाला आहे. त्यातून काही गट वाढू लागलेत. त्यामुळे ग्रामीणमध्ये सर्वच इच्छुक आजी-माजी पदाधिकारी, सदस्यांकडून मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. राज्यातील महापालिकांच्याही प्रभागरचनेचे प्रशासकीय पातळीवर काम सुरू आहे. सांगली, कोल्हापूर, सोलापूर महापालिकांमध्येही यासाठी प्रशासनाची धावाधाव सुरू आहे. अर्थात सर्वच ठिकाणी मोठ्या प्रमाणात पक्षांतराचे खेळ रंगले आहेत. त्यामुळे मागचे सत्ताधारी-विरोधक आता काही ठिकाणी एकत्र आलेत, तर काही ठिकाणी सत्ताधारी विरोधात गेले आहेत. परिणामी सर्वांतु सुखी भवसाठी नेत्यांना मात्र संधी देताना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. यासाठी प्रभाग वाढविणे, प्रभागाच आरक्षणनिहाय संधी देताना सोयीसाठी फेररचना करणे, त्यात जाती-धर्मनिहाय मतदारांचा गठ्ठा इकडून तिकडे फिरविण्यासाठीही आग्रह धरू लागलाय. एकूणच याबाबत पारावरची चर्चा..!

**पांडूनाना :** ईलंबानं का हुईना, झेडपी, म्हापालिकेच्या इलेक्शानं धुमशान लवकरच सुरू होतंया. त्याची तयारी परभागरचनेनं सुरू झालीया.

**बाबूराव :** ती झालीया खरं, पन ह्या खेपंला म्हायुतीला राज्यात मिळालेलं बहुमत डोकेदुकी ठरतीया बग.

**पांडूनाना :** आसं काय झालं रं...?

**बाबूराव :** आरं, आता राज्यात म्हायुतीच्या आडीच वरीस वगळता सलग हॅटरिकमुळं ईरोदात कुनीच न्हायाला तयार न्हायती.

**पांडूनाना :** खराज तुजं. आता समदीच भाजप, शिंदे गट न्हायतर आजितदादाकडं गेल्याती.

**बाबूराव :** सांगलीत तर मदनभाऊ गट भाजपकडं, कोलापुरात बंटी पाटलांसकट भाजपचा गट बी शिंद्यांकडं गेलाया. मग काय ह्या समद्यास्नी संदी कशी?

**पांडूनाना :** व्हय, म्हनून तर नाराजीचं दिसू लागलंया आन् एकेकक कार्यकरतं पतरं लिवाय लागल्याती सोशल मिडियावं.

**बाबूराव :** आरं पन ह्यातनं नेतं तोडगा काडत्याल की? आन् चार-चारचा परभाग हाय, त्यात गड्याला न्हायतर त्याच्या कारबारनीला संदी मिळंलच की!

**पांडूनाना :** त्यासाटी तर परभागाची फेररचना करनं आन् त्यानुसार सोयीचं करायचा खेळ बी सुरू हाय.

**बाबूराव :** त्यासाटीच काहीजनानी नेत्यास्नी बी वेटईंगवर ठेवलंया सोबत येन्याबाबतीत.

**पांडुनाना :** ह्येलाच म्हंत्यात हुशार राजकारनी, नेत्यास्नीच कळतंया व्हय; आता खंडीनं पक्श हायती.

**बाबूराव :** व्हय, आजून मैदान लांब हाय. कोन कशी पलटी मारत्याल सांगता येत न्हाय! **– अमृत चौगुले**

## उपदेश कथा

### परनिंदा

संत ऑगस्टाईन एकदा तीन - चार साधकांसह जेवायला बसले होते. संभाषणाच्या ओघात एक साधक दुसऱ्या एका साधकाबद्दल काही गैर बोलू लागला. ते ऐकून ऑगस्टाईन काही बोलले नाहीत पण त्यांनी समोरच्या भिंतीकडे आपली नजर वळवली. निंदा करणाऱ्या साधकाने देखील ऑगस्टाईन बरोबर आपली नजर भिंतीकडे वळवली. भिंतीवर लिहिले होते की, जे कोणी दुसऱ्याची निंदा करतात त्यांना या ठिकाणी जेवायची परवानगी नाही. ते वाचून तो बोलायचे थांबला. दुसऱ्याची निंदा करण्याने तो नर सुधारत नाहीच पण आपले पुण्य मात्र खर्च होते.

**कथा उपदेश : निंदा करणे हीनपणाचे लक्षण आहे.**

## दिनविशेष...

### आंतरराष्ट्रीय

०६२२ - पैगंबर हजरत मोहम्मद यांनी मक्काहून मदिनाला स्थलांतर केले. तेव्हापासून इस्लामी कॅलेंडरची सुरुवात झाली.

१९७९ - इराकचे राष्ट्रपती हसन अलबक्र यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. सद्दाम हुसैन यांना त्यांचा जागी राष्ट्रपती बनविण्यात आले.

१९९० - फिलीपीनमध्ये भूकंपाचा धक्का, १६०० ठार.

२००६ - चीनच्या शांक्सी प्रांतातील एका कोळसा खाणीत झालेल्या स्फोटात १८ कामगारांचा मृत्यू झाला.

२००७ - जगातील अग्रणी फुटबॉल संघात सामील ब्राझीलने आपला कट्टर विरोधी अर्जेंटिनाला ३-० ने पराभूत करुन कोपा अमेरिका चषकाचा पुरस्कार लागोपाठ दुसऱ्यांदा आपल्या नावे केला.

### राष्ट्रीय

१८५७ - १८५७ च्या युध्दातील कार्यकुशल सेनापती नानासाहेब पेशवे यांचा पराभव होऊन पेशवाईचा शेवट झाला.

२००४ - तामिळनाडूच्या कुंबाकुनम शहरात खासगी शाळेत लागलेल्या आगीत ९० मुले ठार.

२००८ - राजस्थान विधानसभेत राजस्थान अनुसूचित जाती, जमाती, मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गासाठीचे संशोधित विधेयक आवाजी मताने मंजूर करण्यात आले.

## अति व्यायाम घातकच

सध्या तरुणांमध्ये सिक्स पॅक एब्जचे भलतेच आकर्षण आहे. या आकर्षणातूनच बॉडी बिल्डिंगचे वेड तरुणांना लागले आहे. व्यायाम करणे, पिळदार शरीरयष्टी कमावणे चांगलेच ; नव्हे ते गरजेचेच आहे. निरोगी आणि दीर्घायुष्यासाठी व्यायाम करणे गरजेचाच आहे, पण हे करताना प्रत्येकाने आपल्या प्रकृतीचा देखील विचार केला पाहिजे. तसे न करता कमी कालावधीत पिळदार शरीरयष्टी कमावण्यासाठी तरुण व्यायामाचा अतिरेक करतात. अती व्यायाम देखील शरीराला घातक आहे. अती व्यायाम देखील शरीराला घातक ठरू शकतो इतका की तो जीवावर बेतू शकतो. अती व्यायाम, अती वजन उचलणे शरीराला घातक आहे. झटपट शरीरयष्टी कमावण्यासाठी काही तरुण स्टिरॉइडचे सेवन करतात. स्टिरॉइडचे देखील दुष्परिणाम आहे. स्टिरॉइड अधिक प्रमाणात सेवन केल्यास मृत्यू देखील येऊ शकतो त्यामुळे तरुणांनी स्टिरॉइडचे सेवन करणे टाळावे. पथ्य पाळून तरुणांनी व्यायाम केला तर त्याचा लाभ आयुष्यभर होऊ शकतो. फक्त शरीर पिळदार बनवणे हा उद्देश न ठेवता दररोजच्या व्यायामातून आपल्या शरीराला योग्य पोषण मिळते. त्यातून नेहमी उत्साही राहता येते. परंतू व्यायामाचा अतिरेक करू नये अन्यथा अति सर्वत्र वर्जते याचे भान तरुणांनी बाळगावे.

–अर्पणा काटकर, सांगली

## जन की बात...

### गडकिल्ल्यांचे संवर्धन, संरक्षण कधी?

नुकतीच गडकिल्ल्यांना युनेस्कोची मान्यता मिळाली पण या गड किल्ल्यांचे संवर्धन आणि संरक्षण कधी? हा प्रश्न आता सर्वांच्या मनात येवू लागला आहे. महाराष्ट्र हे राज्य त्याच्या खडतर भूगोलासाठी आणि समृध्द इतिहासासाठी प्रसिध्द आहे. येथे सुमारे ३५० पेक्षा अधिक किल्ले आहेत, ज्यापैकी बरेचसे छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधले किंवा बळकट केले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य ही दूरदृष्टी मांडली होती. हे केवळ भौगोलिक स्वातंत्र्य नव्हते, तर हिंदू संस्कृती, धर्म, लोककल्याण आणि प्रशासनिक नीती यांचा संतुलित संगम होता. त्यांची राज्यव्यवस्था धर्मनिष्ठ असूनही सर्वसमावेशक होती हीच खरी हिंदवी स्वराज्याची ओळख होती. ही ओळखच या गडकिल्ले यांनी टिकवून ठेवली आहे. महाराष्ट्र आणि तामिळनाडू राज्यातील १२ महत्त्वपूर्ण किल्ल्यांची युनेस्को जागतिक वारसा यादीत समाविष्ट केली आहे. जगभरातील मराठी जणांसाठी हा सुवर्णक्षण आहे. या १२ किल्ल्यांचा समावेश झाल्याने छत्रपती शिवाजी महाराजांनी रचलेल्या दुर्गराजांचा ऐतिहासिक ठसा आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झाला. हिंदवी स्वराज्य स्थापन करताना शिवरायांनी हे गड किल्ले बांधले, जिंकले. शत्रूला न दिसणारे दरवाजे आणि किल्ल्यांची माची स्थापत्य हे मराठा स्थापत्यशास्त्रातील महत्त्वपूर्ण वैशिष्ट्येपूर्ण भाग आहे. या गडल्लियांना युनेस्कोची मान्यता मिळाल्याने संवर्धनासाठी निधी, मार्गदर्शन आणि जागतिक स्तरावरील सहकार्य मिळेल.

परंतू अतिक्रमण हा सध्या महाराष्ट्रातील किल्ल्यांसमोरील गंभीर प्रश्न आहे. अनेक किल्ल्यांवर अतिक्रमण, बेकायदेशीर धार्मिक किंवा व्यावसायिक बांधकामे, आणि अस्वच्छता वाढली आहे. मात्र, हा धोका टाळण्यासाठी जर शासनाने ठोस धोरणे, कडक अंमलबजावणी, स्थानिक जनजागृती आणि युनेस्को मार्गदर्शनाखाली काम केले आणि स्थानिक स्वयंसेवी संस्था, वारकरी संस्था आणि इतिहासप्रेमींना सामावून घेऊन सामूहिक प्रयत्नांनी किल्ल्यांचे संरक्षण शक्य आहे. असे झाले तर शिवकालापासून जपलेले हे वैभव अतिक्रमणामुळे नष्ट होऊ देणे, हे कोणत्याही परिस्थितीत सांस्कृतिकदृष्ट्या जागरूक समाजाला परवडणारे नाही. त्यामुळे गडकिल्ल्यांचे संरक्षण, संवर्धन हीच आपली छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रती श्रध्दा असेल.

–आल्हाद माळगावकर, पनवेल

## मतदार याद्यांची पडताळणी व्हावी

बिहार मधील मतदार याद्यांची सखोल पडताळणी करण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला आहे. निवडणूक आयोगाने घेतलेला हा निर्णय स्वागतार्ह आहे. निवडणूक आयोगाने केवळ बिहारमधीलच नव्हे तर देशातील सर्वच राज्यातील मतदार याद्यांची सखोल पडताळणी करायला हवी. न्यायालयानेही सर्वच राज्यातील मतदार याद्या अद्ययावत करण्यास हिरवा कंदील दाखवला आहे. मतदार याद्या अद्ययावत करणे, अवैध मतदारांची, स्थलांतरित किंवा मृत मतदारांची नावे काढून टाकणे आणि मतदारांची नावे मतदार यादीत समावेश करणे यासाठी मतदार याद्यांची सखोल पडताळणी होणे गरजेचे आहे. मतदार याद्यांची सखोल पडताळणी न झाल्याने स्थलांतरित, मृत मतदारांची नावे यादीत असणे काही मतदारांची नावे अचानक मतदार यादीतून वगळण्यात आल्याचाही प्रकार घडला आहे. बिहारमध्ये बांगलादेशी, नेपाळी आणि रोहिंग्यांची नावे मतदार यादीत असल्याची बाब समोर आली आहे. आपल्या राज्यातही शेकडो बांगलादेशी नागरिकांची नावे मतदार यादीत असल्याचा आरोप राजकीय पक्षांकडून केला गेला. जर मतदार याद्यांची सखोल पडताळणी झाली तर अवैधरित्या मतदार यादीत घुसखोरी करणाऱ्या या परदेशी नागरिकांची नावे मतदार यादीतून वगळण्यात येतील आणि पात्र मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट होईल.

–स्मिता माने, सांगली

# विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त स्पर्धा परीक्षेत सहभागी होऊन अधिकारी व्हावे : राहुलकुमार अवचट

■ जनप्रवास प्रतिनिधी

यवत : जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेत सहभागी होऊन आपल्या आई वडिलांचे व संस्थेचे नाव उज्वल करावे असे आवाहन माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे राज्य कार्यकारणी सदस्य राहुलकुमार अवचट यांनी केले

वरवंड ग्राम शिक्षण संस्थेच्या एकनाथ सीताराम दिवेकर महाविद्यालय यांच्या स्पर्धा परीक्षा विभागाच्या वतीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा परीक्षेमध्ये विविध पदांवरती नियुक्त झालेले, संस्थेचे विद्यार्थी सामान्य कुटुंबातील स्वप्निल संगीता प्रकाश कुतवळ यांची महाराष्ट्र शासनाच्या नगर रचना व मूल्य निर्धारण विभागात रचना सहाय्यक पदी नेमणूक झाल्याबद्दल महाविद्यालयात सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते या वेळी ते बोलत होते.



या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून माहिती अधिकार प्रशिक्षक व माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे राज्य कार्यकारणी सदस्य राहुलकुमार अवचट, संस्थेचे अध्यक्ष संजय आण्णा दिवेकर, सत्कारमूर्ती स्वप्निल कुतवळ, वडील प्रकाश कुतवळ, मातोश्री संगीता कुतवळ, महाराष्ट्राची भूमीचे संपादक आदित्य बारवकर, माहिती अधिकार कार्यकर्ते नंदकुमार भागवत, संदीप चव्हाण, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अनिल शितोळे, उपप्राचार्य डॉ. शरद गाडेकर, स्पर्धा समिती विभागाचे डॉ. नानासाहेब गोफणे, प्रा. संगेश यादव, कार्यालयीन अधीक्षक ॲड .संतोष रणधीर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्तात्रेय दुर्गाडे, डॉ. ज्योती माने, डॉ. नामदेव बनसोडे, डॉ. मारुती वाघमारे, प्रा. प्रकाश मचाले, प्रा. कुणाल दोशी, प्रा. भारत उगाडे, प्रा. साळुंखे, संस्थेच्या प्राध्यापिका लोंढे, प्रा. देशमुख , प्रा. संगीता साळवे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने आपले मनोगत व्यक्त करताना सत्कारमूर्ती स्वप्नील कुतवळ यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध शासकीय पदांवर झालेल्या निवडीबद्दल आपली भावना व्यक्त करताना विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, जिद्द, चिकाटी व सातत्य ठेवले तर ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील चांगल्या प्रकारे यश संपादन करू शकतात .

यावेळी कार्यक्रमाच्या संस्थेचे अध्यक्ष संजय आण्णा दिवेकर यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या मनामधील न्यूनगंड बाजूला ठेवून जर आत्मविश्वासपूर्वक आणि सातत्यपूर्ण अभ्यास केला तर निश्चितपणे आपण आपले उद्दिष्ट व ध्येय साध्य करू शकतो या कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे असलेले माहिती अधिकार प्रशिक्षक व पत्रकार राहुलकुमार अवचट यांनी स्पर्धा परीक्षेत अभ्यास करण्यासाठी वरवंड ग्रामसेवक संस्थेच्या वतीने सुसज्ज असे ग्रंथालय निर्माण केले असून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेत सहभाग होऊन आपल्या आई–वडिलांचे व संस्थेचे नाव मोठे करावे असे आवाहन केले, या कार्यक्रमाच्या निमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल शितोळे व उपप्राचार्य डॉ. शरद गाडेकर यांनीही विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजन स्पर्धा परीक्षा समितीचे प्राध्यापक डॉ. नानासाहेब गोफणे यांनी केले. या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे व सर्व उपस्थितांचे प्रा. संगेश यादव यांनी आभार व्यक्त केले. डॉ. ज्योती माने यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# खोडद येथे बिबट्याची मादी पिंजऱ्यात जेरबंद

## मादीचे दोन बछडे मात्र पोरके

■ जनप्रवास प्रतिनिधी

नारायणगाव : खोडद (तालुका जुन्नर) येथील माळी मळा शिवारात सोमवार दिनांक १४ रोजी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास एक बिबट्याची मादी पिंजऱ्यात जेरबंद झाली. मात्र या बिबट्याच्या मादी बरोबर येथे वावरत असलेल्या तिच्या दोन बछड्यांना मात्र आईविना पोरके राहावे लागणार आहे.

दरम्यान पकडलेली बिबट्याची मादी वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी येथील परिसरात, जवळपास सोडू नये अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. याबाबत येथील ग्रामस्थ सचिन काफरे व अमोल शिंदे यांनी सांगितले की, आमच्या भागात पाळीव प्राण्यांवर गेल्या अनेक



दिवसांपासून बिबट्या हल्ले करत आहे. दोन दिवसापूर्वी अंगणात पोरं खेळत असताना आमची कोंबडी बिबट्याने आमच्या डोळ्यासमोर आपल्या जबड्यात पकडून नेली. असेही काफरे यांनी सांगितले. दरम्यान वनक्षत्रपाल ठोकळ यांच्याशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही. येथील वनरक्षक विशाल गुंड यांनी सांगितले की, सोमवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास ग्रामपंचायत सदस्य योगेश शिंदे यांचा भ्रमणध्वनी आला की, बिबट्याची मादी पिंजऱ्यात जेरबंद झाली आहे.

येथे अंध व्यक्ती राहत असल्यामुळे स्थानिक ग्रामस्थांनी या बिबट्याला तात्काळ पकडावे अशी मागणी केली होती. त्यानुसार काही दिवसांपूर्वी येथे पिंजरा लावला व त्यात चार ते पाच वर्षाची बिबट्याची मादी जेरबंद झाली. या बिबट्याला माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्रामध्ये पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

# वैद्यकीय पदवी नसतानाही रुग्णांवर उपचार, शस्त्रक्रिया करणाऱ्या तिघा बोगस डॉक्टरांवर गुन्हा दाखल

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : वैद्यकीय पदवी नसताना, वैद्यकीय व्यावसायिक नसताना दवाखाना चालवून, रुग्णांवर शस्त्रक्रिया करणाऱ्या, ॲलोपॅथीची औषधे देणाऱ्या तिघा बोगस डॉक्टरांवर तपासणी करून महानगरपालिकेने कारवाई केल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

याप्रकरणी तिघाही बोगस डॉक्टरांवर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत कायदेशीर फिर्याद देऊन गुन्हा दाखल करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.




पिंजारगल्ली येथील डॉ. ठाकूर क्लिनिक, चाँदसी दवाखाना डॉ. एम. डी. हालदार येथील ओम संतोष ठाकुर (रा. पिंजार गल्ली, अहिल्यानगर), मृत्युंजय धनंजय हालदार व त्यांचा मुलगा संजय मृत्युंजय हालदार (दोघे रा. पिंजार गल्ली, अहिल्यानगर) वैद्यकीय पदवी नसताना वैद्यकीय व्यवसायाचा परवाना नसताना बेकायदेशीरपणे रुग्णांची तपासणी करत असल्याचे त्यांच्यावर उपचार व शस्त्रक्रिया करत असल्याचे माहिती आरोग्य सेवा रुग्णालय (राज्यस्तर) मुंबई येथून महापालिकेच्या आरोग्य विभागाला मिळाली होती.

डॉ. बागल यांच्या पथकाने १ एप्रिल रोजी पिंजारगल्ली येथे जाऊन दोन्ही क्लिनिकवर छापा टाकला. यावेळी संशयित बोगस डॉक्टर रुग्णांची तपासणी व उपचार करताना आढळून आले. तेथील रुग्णांकडे चौकशी केली असता, संशयित बोगस डॉक्टरांनी त्यांच्यावर मूळव्याध, भगंदर, फिशर आदी आजारांवर शस्त्रक्रिया केल्याचे समोर आले. प्राथमिक तपासणीनुसार तिघा बोगस डॉक्टरांवर कोतवाली पोलिस ठाण्यात महानगरपालिकेच्या वतीने डॉक्टर बागल यांच्यामार्फत फिर्याद दाखल करण्यात आली असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.

# घरदार नावावर केले; पोराने आईबापालाच हाकलून दिले

## कुसेगावच्या ज्येष्ठ नागरिकाचा मुलाविरुद्ध गुन्हा दाखल

■ जनप्रवास प्रतिनिधी

पाटस : कुसेगाव (ता. दौंड) येथील ज्येष्ठ नागरिक लक्ष्मण शितोळे व त्यांच्या पत्नीला पोटच्या मोठ्या मुलाने मारहाण करून घरातून हाकलून दिले असून त्यांच्यावर बेघर होण्याची वेळ आली आहे. त्यामुळे नैतिक हक्क आणि अधिकारासाठी आईबापावर अशा नाठाळ मुलाविरुद्ध गुन्हा नोंदवून न्यायाचा दरवाजा ठोठावण्याची नामुष्की ओढविली आहे.

अलीकडे मोहन हा कोण्या भोंदू बाबाच्या नादाला लागून आपल्याच आईवडील व भावावर मंत्रतंत्राचा मार्ग अवलंबत देवदेवस्कीच्या आहारी गेल्याची चर्चा गावकऱ्यांमध्ये सुरू आहे.

याबाबत दाखल तक्रारीनुसार, लक्ष्मण शितोळे (वय– ६९ वर्षे) हे आपली ६७ वर्षीय पत्नीसह २०१५ साली वन विभागातून सेवानिवृत्त झाल्यानंतर कुसेगाव येथील आपल्या बंगल्यात मोहन, सुधीर या आपल्या दोन मुले व सुनांसह राहत होते. वन विभागात कार्यरत असताना २००२ साली त्यांनी आपल्या मोठ्या मुलाच्या नावावर जागा खरेदी करून २०११ मध्ये त्याच जागेवर स्वखर्चाने बंगला बांधला. ९ वर्षे एकत्र राहिल्यानंतर २०२४ साली मोठा मुलगा मोहन याने सुधीर यास पत्नीसह घरातून बाहेर काढले. त्यावेळी लक्ष्मण शितोळे हे पत्नीसह बंगल्यातच राहत होते.


१६ मे २०२५ रोजी रात्री ९ वा. ‘‘हे घर व जागा आमच्या नावावर आहे‘‘ असे म्हणत मोहन व त्याच्या पत्नीने आईवडिलांच्या वयाचा देखील विचार न करता त्यांना शिवीगाळ करून काठीने मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली. या धक्क्याने लक्ष्मण शितोळे यांना हृदयाचा त्रास होऊ लागल्याने दवाखान्यात दाखल केले. १५ दिवसांच्या उपचारानंतर पायऱ्या चढण्यास मनाई असल्यामुळे ते लहान मुलगा सुधीर याच्याकडे तात्पुरते राहायला गेले.

दि. ८ जूनला स. ९ वा. लक्ष्मण आपल्या पत्नीसह पुन्हा बंगल्यात राहण्यास गेले असता पुन्हा एकदा ‘‘हे घर आमचे आहे‘‘ म्हणत मोहन व त्याच्या पत्नीने दोघांना शिवीगाळ करून हाकलून दिले. यावेळी नातेवाईक यांनी मोहन यास समजविण्याचा निष्फळ प्रयत्न केला. अखेर म्हातारपणी पोटच्या मुलामुळे बेघर होण्याची वेळ आल्याने लक्ष्मण यांनी शिवीगाळ, मारहाण, जीवे मारण्याची धमकी यांसह ज्येष्ठ नागरिक कायदा कलम २४ प्रमाणे मोहन व त्याची पत्नी यांच्याविरुद्ध पाटस पोलीस चौकीत तक्रार दाखल केली आहे. याबाबत अधिक तपास हे. कॉ. महेंद्र फणसे हे करत आहेत.

# स्वमग्नांसाठीच्या सुंदरजी व्होकेशनल इंस्टिट्यूटचे उद्घाटन

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : स्वमग्न (न्यूरोडायव्हर्स) तरुण आणि प्रौढ व्यक्तींना सक्षम बनवण्याच्या दृष्टीने पुण्यातील मार्केट यार्ड, बुरहानी कॉलनी येथे सुंदरजी व्होकेशनल इंस्टिट्यूटची (सुंदरजी व्यावसायिक संस्था) स्थापन करण्यात आली आहे. या संस्थेचे उद्घाटन बाल विकासतज्ञ डॉ. सुनील गोडबोले आणि डॉ. अश्विनी गोडबोले यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.




या समारंभाला सुंदरजी ग्लोबल अकाडमीच्या सह–संस्थापक आणि संचालक मसरत तवावाला, डॉ. सुनील गोडबोले, डॉ. अश्विनी गोडबोले, डॉ. झिमरा इस्रायल, निलेश बजाज तसेच रोटरी क्लब ऑफ पूना डाउनटाउनच्या अध्यक्षा सुश्री अदिती भेंडे, एडविना डायस, रिचर्ड लोबो, शिखा मित्रा, रश्मी शाह, शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

आपल्या भाषणात, मसरत तवावाला म्हणाल्या, आमचे अंतिम ध्येय न्यूरोडायव्हर्स तरुण आणि प्रौढ यांना आर्थिक स्वातंत्र्य निर्माण करून देण्याचे आहे.संस्थेत डिजिटल साक्षरता, बेकिंग, हाऊसकीपिंग, बागकाम आणि फॅब्रिक एनहान्समेंट अशा पाच परिवर्तनकारी व्यावसायिक प्रयोगशाळा असून त्यांचे ३ वर्षांचे आभ्यासक्रम आहेत.मला खात्री आहे की हे फाउंडेशन आमच्या विद्यार्थ्यांना प्रगती करण्यास तसेच स्वावलंबी बनवून माज्यात मानाने जीवन जगण्यास सक्षम करेल.

# हिवरे कुंभार शाळेचे पाच विद्यार्थी शिष्यवृत्तीत चमकले

■ जनप्रवास प्रतिनिधी

शिक्रापूर : हिवरे कुंभार ता. शिरूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पाचवीच्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादित केले असून शाळेचे पाच विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवले असल्याची माहिती मुख्याध्यापक अंजना चौधरी यांनी दिली आहे.

हिवरे कुंभार ता. शिरूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पाचवीच्या चाळीस विद्यार्थ्यांनी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षेत सहभाग घेतलेला वीस विद्यार्थ्यांनी दोनशे पेक्षा अधिक गुण मिळालेले असून यापैकी अक्षरा रोहिदास जगताप,



विक्रांत राजेंद्र मोरे, स्वराली सोमनाथ आढागळे, सार्थक काळुराम रणपीसे व वेदांत मच्छिंद्र गायकवाड या पाच विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळवले असून सर्व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक अंजना चौधरी, वर्ग शिक्षक सचिन लोंढे यांनी मार्गदर्शन केले असून सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे सरपंच दिपाली खैरे, शालेय शिक्षण समिती अध्यक्षा राजश्री तांबे, उपाध्यक्ष जालिंदर थोरात, केंद्रप्रमुख प्रकाश लंघे, विस्तारधिकारी वंदना शिंदे, गटशिक्षणाधिकारी बाळकृष्ण कळमकर यांसह आदींनी अभिनंदन केले आहे.

# यशवंतनगर शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना लोकसहभागातून मोफत स्कूल बॅग वाटप

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : नगर तालुक्यातील यशवंतनगर येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना लोकसहभागातून म्हणजे मिशन आपुलकीतून विक्रीकर निरीक्षक अधिकारी महेश टकले आणि विक्रीकर निरीक्षक अधिकारी शुभांगी टकले यांनी स्कूल बॅग वाटप केल्या आहेत. यशवंतनगर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील शिक्षिका मीनाक्षी टकले यांचे बंधू विक्रीकर निरीक्षक अधिकारी महेश टकले आणि विक्रीकर निरीक्षक अधिकारी शुभांगी टकले यांनी त्यांच्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त यशवंतनगर येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील एकूण



सर्व सत्तर विद्यार्थ्यांना अतिशय उत्कृष्ट दर्जाच्या स्कूल बॅग वाटप केल्या . पंचायत समिती अहिल्यानगरचे विस्तार अधिकारी रवींद्र कापरे , विक्रीकर निरीक्षक महेश टकले, विक्रीकर निरीक्षक शुभांगी, टकले ,गावातील सरपंच, उपसरपंच ,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य ,ग्रामपंचायत सदस्य यांच्या हस्ते या स्कूल बॅग विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आल्या.स्कूल बॅग मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना व पालकांना खूप आनंद झाला.यशवंतनगर शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक हे मजुरी करतात .त्यामुळे त्यांची अर्थिक परिस्थिती बिकट आहे.या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी विक्रीकर निरीक्षक अधिकारी महेश टकले आणि विक्रीकर निरीक्षक अधिकारी शुभांगी टकले यांनी ही खूप मोठी शैक्षणिक मदत केल्यामुळे सर्व पालकांनी आणि मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.यावेळी शिक्षिका मिनाक्षी टकले आणि उपक्रमशील शिक्षक संतोष अडसरे यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना गोड जेवण दिले.

# जीवनध्येय ज्यातून सापडते तो स्वधर्म : डॉ. चेतनानंद महाराज पुणेकर

## श्रीमंत दगडूशेठ गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळाच्यावतीने प्रवचन महोत्सवाचे उद्घाटन

■ जनप्रवास प्रतिनिधी

पुणे : आपल्याला स्वतः चा स्वधर्म कळत नाही, इथे आपण चुकतो. धर्म, जात, प्रांत यावर आधारित धर्म नव्हे, तर आपल्याला स्वधर्म समजून घ्यायला हवा. भगवदगीता ही आपल्याला स्वधर्म शिकविते. ज्यातून खऱ्या अर्थाने जीवनध्येय सापडते, तो स्वधर्म आहे, असे जगद्गुरु कृपांकित डॉ. चेतनानंद महाराज पुणेकर यांनी सांगितले.



श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने चातुर्मासानिमित्त प्रवचन महोत्सवाचे आयोजन टिळक स्मारक मंदिर येथे करण्यात आले आहे. महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष माणिक चव्हाण, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, मंगेश सूर्यवंशी, तुषार रायकर , राजाभाऊ घोडके, राजाभाऊ पायमोडे, ज्ञानेश्वर रासने, विलास रासकर, बंडू गावडे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

डॉ. चेतनानंद महाराज पुणेकर म्हणाले, भगवदगीचे भाष्य करणारे भाष्यकर्ते ज्ञानेश्वर महाराज आहेत. त्यांनी ज्ञानेश्वरीतून स्वधर्माचा विचार मांडला आहे. स्वामी विवेकांनद यांनी देखील सांगितलेल्या धर्माचे नाव विश्वधर्म होते, ते देखील आपण विसरत आहोत.

संतांना जीवनध्येय समजले. त्यामुळे त्यांनी त्याची प्रतारणा केली नाही, असेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात महेश सूर्यवंशी म्हणाले, प्रवचनात स्वधर्म व जीवन ध्येय, कर्म व चरित्र निर्माण, मैत्रबंधुभाव व संगत, सुख, शांती व आनंद, आजचे जग व संतांचे विचार याविषयी चेतनानंद महाराज निरुपण करीत आहेत.

यानिमित्ताने विश्वमाऊली ज्ञानोबाराय व जगद्गुरू तुकोबाराय यांचे मानवी जीवन समृद्ध व संपन्न करणारे चरित्र व तत्वज्ञान ऐकण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे. दि. १८ जुलै पर्यंत दररोज सायंकाळी ६ ते ८ यावेळेत टिळक स्मारक मंदिरात प्रवचनमाला होत असून सर्वांसाठी विनामूल्य खुली आहे.

## संक्षीप्त वृत्त

### अनोळखी बेवारस इसमाचा मृत्यू

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : आजारी अवस्थेत आढळून आलेल्या ६५ वर्षीय अनोळखी इसमाचा औषधोपचारा दरम्यान सिव्हिल हॉस्पिटल येथे मृत्यू झाला. ही घटना ११ जुलै रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी सिव्हील हॉस्पीटलचे वैद्यकिय अधिकारी डॉ. कोल्हे यांनी दिलेल्या माहितीवरुन तोफखाना पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद केली. पुढील तपास पोलीस हवालदार सुनिल आंधळे हे करीत आहेत. मृत व्यक्तीचे वर्णन असे आहे. नाव माहित नाही, वय-६५ वर्ष, रंग सावळा, दात शाबुत, नाक सरळ, केस पांढरे वाढलेले, दाढी वाढलेली पांढरी व आंगात लाल शर्ट, बरमुडा फोटो, गळयात तुळशीची माळ असे आहेत. मृत इसमाची अद्याप ओळख पटली नसून पोलीस त्याची ओळख पटवण्याचा प्रयत्न करीत आहेत. या मृत इसमास कोणी ओळखत असल्यास अगर त्याच्या नातेवाईकांबाबत कोणाला काही माहिती असल्यास त्यांनी तोफखाना पोलीस ठाणे फोन नं. ०२४१ २४१६११८ या फोन वर अगर पोलीस हवालदार सुनील आंधळे मोबाईल नं.. ९४०३६ ८५४२७ या नंबर संपर्क करावा असे आवाहन तोफखाना पोलिसांनी केले आहे.

### विना नंबर प्लेट दुचाकी वापरणाऱ्यावर गुन्हा दाखल

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : राहुरी पोलीस पथक रात्रीच्या सुमारास गोटूंबा आखाडा परिसरात गस्त घालत असताना आरोपी अनिकेत तोडमल हा त्याच्या जवळ विना नंबर व विना कागदपत्र असलेली दुचाकी स्वत: वापरत असताना मिळुन आल्याने त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उप निरीक्षक संदिप मुरकुटे, पोलिस नाईक सचिन ताजणे, प्रमोद ढाकणे, नदीम शेख, सतिष कुऱ्हाडे आदि पोलिस पथक दि. १३ जुलै २०२५ रोजी रात्री ९ वाजे दरम्यान राहुरी ते शनी शिंगणापूर रोडवर गस्त घालत होते. त्यावेळी गौटुंबे आखाडा येथील पुलावर अनिकेत तोडमल हा बजाज कंपणीची विना नंबरची प्लॅटीना मोटरसायकल घेऊन जाताना दिसला. पथकाने त्याला थांबवुन त्याचे नाव गाव विचारले तसेच त्याच्याकडील मोटरसायकलच्या नंबर बाबत व कागदपत्रा बाबत विचारपुस केली. तेव्हा सदर मोटरसायकल त्याच्या भावाने सेकंड घेतली असून गाडीचा नंबर व ती कोणाच्या नावावर आहे. या बाबत माहीती नसल्याचे सांगीतले. गाडीच्या मालकी बाबत कुठलाही पुरावा प्रथम दर्शनी मिळून न आल्याने पोलिस पथकाने सदर मोटारसायकल जप्त केली. पोलिस नाईक सतिष कुऱ्हाडे यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलिस ठाण्यात आरोपी अनिकेत कैलास तोडमल, वय २९ वर्षे, रा. उंबरे, ता. राहुरी, याच्यावर गुन्हा रजि. नं. ७८०/२०२५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम १२४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला

### न्यू इंग्लीश स्कुलमध्ये आपत्ती व्यवस्थापन शिबीर



■ जनप्रवास प्रतिनिधी

टाकळीभान : रयत शिक्षण संस्थेच्या टाकळीभान येथील न्यू इंग्लिश स्कूल व आण्णासाहेब पटारे पाटील ज्यूनियर कॉलेज मध्ये आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन शिबीर संपन्न झाले यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे पर्यवेक्षक एस.एस. जरे उपस्थित होते तर मार्गदर्शक म्हणून श्रीरामपूर येथील हिंदुस्थान पेट्रोलियम चे व्यवस्थापक ज्ञानेश्वर थोरात उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक ज्ञानेश्वर थोरात यांनी गॅस गळतीचे होणारे दुष्परिणाम, गॅस गळती रोखण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना कराव्या यांविषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगून गॅस गळती संबंधी प्रात्यक्षिके दाखविली.यावेळी व्यासपीठावर एच.पी. गॅसचे कर्मचारी मच्छिंद्र लगडे ,आशिष सरपते, विद्यालयाचे उपशिक्षक एस. एस. राठोड, एन.आर. पिदुरकर,एन पी चौधरी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ए.ए. पाचपिंड यांनी तर व्ही.डी. गोंदके यांनी आभार व्यक्त केले.

### श्री संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त उत्सव समितीच्यावतीने माळीवाडा येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. त्याच्या मंडप उभारणी कामाचा शुभारंभ श्री विशाल गणेश मंदिरचे महंत संगमनाथ महाराज यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी उत्सव समितीचे अध्यक्ष छबु नाना जाधव, कैलासराव खरपुडे, सतीश डागवाले, सुभाष राऊत, बाळासाहेब पुंड, चंद्रकांत ताठे, अनिल चेडे, सोमनाथ नागापुरे, विकास पटवेकर, बजरंग भुतारे, अशोकराव कापरे, शरद चाफेकर, भिमराज जाधव, अमोल धाडगे, विशाल जाधव, विनायक आंबेकर, भाऊसाहेब पुंड, सुनिल राऊत, बबनराव केवटे, मंदार सटाणकर, सुनिल पडोळे, विष्णुपंत म्हस्के आदि उपस्थित होते. या सप्ताहा विषयी माहिती देतांना अध्यक्ष छबुनाना जाधव म्हणाले गेल्या १९ वर्षांपासून माळीवाडा येथे श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येत असते. त्यात महाराष्ट्रातील अनेक नामवंत किर्तनकार आपली सेवा या ठिकाणी देत असतात. यानिमित्त नागरिकांमध्ये धार्मिकतेची गोडी लागण्यास मदत होते. मंडळाच्या सदस्यांसह अनेकांच्या सहकार्याने हा सप्ताह कायम यशस्वी होतो. यंदाही सप्ताहाची जंगी तयारी करण्यात आली असून, आज मंडप उभारणीने त्याची सुरुवात केली आहे. गुरुवार दि.१७ जुलै ते गुरुवार दि.२४ जुलैपर्यंत होणार्या या सप्ताहाचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन छबूनाना जाधव यांनी केले.

### सुनील रामदासी यांची भाजप राज्य परिषद सदस्यपदी निवड

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : भारतीय जनता पार्टीच्या राज्य परिषद सदस्यपदी सुनील रामदासी यांची नुकतीच निवड करण्यात आली. त्यांच्या या नियुक्तीबद्दल प्रथम महापौर भगवान फुलसौंदर यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संतोष गेनप्पा, विष्णू फुलसौंदर, सुहास पाथरकर, अवधुत फुलसौंदर, रवि बाकलिवाल, किशोर गांधी, बाळु लोढा, किशोर कानडे आदी उपस्थित होते.

सुनील रामदासी यांनी भारतीय जनता पक्षाच्या जडणघडणीत अत्यंत मोलाचा वाटा उचलला आहे. पक्षाच्या सुरुवातीच्या काळात त्यांनी कार्यकर्त्यांमध्ये एकसंघता निर्माण करून मजबूत संघटन उभारले.

# दोनशे कोटीचे रस्त्याचे काम निकृष्ट ?

## गव्हाणवाडी फाटा ते श्रीगोंदा रस्ता कामाची चौकशी करा अन्यथा उपोषण..

### सामाजिक कार्यकर्ते अनिल बनकर यांची मागणी



■ जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा : तालुक्यातील गव्हाणवाडी फाटा ते श्रीगोंदा या रस्त्याचे काम हे युद्ध पातळीवर चालू आहे. सदरील रस्त्याचे काम पूर्णपणे निकृष्ट पद्धतीने चालू आहे असा आरोप सामाजिक कार्यकर्ते अनिल बनकर व अनेक प्रवाशांनी केला आहे .सदरील रस्त्याचे काम चालू असताना चाललेल्या रस्त्याची ड्रॉइंग ची मागणी अनिल बनकर यांनी कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ नाशिक यांना पत्राद्वरे केली आहे . तसेच कामावरून इंजिनियर हे ड्रॉइंग तयार नाही असे उत्तर देता येत आहेत. हे काम ४३ किलोमीटर असून सुमारे २०० कोटीचे काम आहे.सिमेंट कॉंक्रेट मध्ये हा रस्ता होणारा आहे . १४ जुलै २०२५ रोजी सामाजिक कार्यकर्ते अनिल बनकर यांना माहिती मिळाली सदरील रस्त्याचे काम निकृष्ट चालू आहे त्यांनी त्या ठिकाणी धाव घेतल्यास डि. एल.सी सिमेंट मिक्स मटेरियल हे निकृष्ट आहे हे त्यांच्या निदर्शनात आले तसेच शेजारी असलेल्या पुलाचे काम त्यामध्ये फाउंडेशन ची पीसीसी ही पूर्णपणे निकृष्ट दिसून आली हाताने सुद्धा ती पिसीसी निघत होती.तसेच जि.एस.बी खडी मध्ये एक प्रकारे खडी नसून त्यामध्ये मोठे मुरूम खडे व दगड निर्दशनांस आले. याविषयी कामावर असणाऱ्या इंजिनियर यांना विचारणा केली असता त्यांनी हे खडी थर्ड पार्टी ॲप्रोल आहे व यापुढे काम चांगले करू असे सांगितले आहे.परंतु आतापर्यंत झालेल्या डि.एल.सी काम पुन्हां काढुन त्या ठिकाणी चांगले डि.एल.सी मटेरियल पुन्हा टाकून काम करावे या मागणीवर सामाजिक कार्यकर्ते अनिल बनकर ठाम आहेत व येणाऱ्या काळामध्ये वेळेप्रसंगी उपोषणाला बसणार आहे असे त्यांनी सांगितले तसेच हे काम बंद करा अशी त्यांनी सदरील कामावरील सुपरवायझर इंजिनियर तसेच कामगारांना सांगितले.

#### स्थानिक ठेकेदाराने दम देऊन काम केले पुन्हा चालू

त्या ठिकाणी काही स्थानिक ठेकेदार आले व त्यांनी उपस्थित प्रवासी व कार्यकर्त्यांना दम देण्याचा प्रयत्न केला तसेच सदरील काम चालू करा कोण काय करते मी पाहून घेतो कोणाला तक्रार करायची असेल त्यांनी करा आमदाराकडे तक्रार करा किंवा कोणाकडेही तक्रार करा काम बंद होणार नाही काम चालू राहू द्या असा दमच भरल्यामुळे येथील नागरिक भयबित होऊन निघून गेले. असे तेथील प्रत्यक्ष दर्शनी सांगितले आहे.

## दिव्यांगांनी विविध योजनांचा लाभ घ्यावा तहसिलदार अमोल मोरे यांचे आवाहन



■ जनप्रवास प्रतिनिधी

राहाता : जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभाग अहिल्यानगर यांच्या माध्यमातून विविध योजना या अस्थिव्यंग व्यक्तीसाठी सुरू आहेत. अहिल्यानगरचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्याचं काम होत आहे या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन राहात्याचे तहसीलदार अमोल मोरे यांनी केले.

केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय भारत सरकारच्या भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम कानपूर , एस.आर. ट्रस्ट, मध्य प्रदेश, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन संचलित, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभाग अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने, एडीप योजनांतर्गत आयोजित राहाता येथे आयोजित शिबीरात मोरे बोलत होते. यावेळी गटविकास अधिकारी विवेक गुंड , तालुका आरोग्य विभाग डॉ.संजय घोलप, ॲड.रघुनाथ बोठे, माजी नगराध्यक्ष सोपान सदाफळ कैलास सदाफळ,श्री साई श्रद्धा ग्रामीण मूक बधिर विद्यालयांचे बाळासाहेब कासार, डॉ.यशस चुंबळे,संजय सदाफळ,भाऊसाहेब जेजुरकर, साहेबराव निथाने, जबाजी मेचे, विजय सदाफळ, सागर सदाफळ, विजय शिंदे, अंबादास गाडेकर, चंद्रभान मेहत्रे, उत्तमराव डांगे, राजेंद्र वाबळे आदीसह लाभर्थी उपस्थित होते. प्रारंभी कासार यांनी योजनेची सविस्तर माहिती दिली. यावेळी राहाता तालुक्यातील विविध गावातील लाभार्थी उपस्थित होते. जनसेवा फाउंडेशन सेवा फाऊंडेशनच्या माध्यमातून मंत्र विखे पाटील आणि डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन संचलित जिल्हा दिव्यांग संचलित मंगळवार दि.१५ जुलै रोजी साई विठ्ठला लॉन्स, चितळी रोड, राहाता येथे तर सोमवार दि.२१ जुलै रोजी श्री साई निर्माण इंग्लिश मिडीयम स्कूल, विमानतळ रोड, श्री कृष्ण नगर शिर्डी येथे करण्यात आल्याची माहीती डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन संचलित जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे संचालक डॉ. अभिजित दिवटे यांनी दिली.

## शिष्यवृत्ती परीक्षेत सावित्रीबाई फुले विद्यालयाचे दैदिप्यमान यश

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, राहुरी येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

शाळेतील पाचवीच्या ग्रामीण सर्वसाधारण गटातील प्रज्वल सोन्याबापू भांड आणि वेदिका बापू सुंबे या विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. तर इयत्ता आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत भिंगारदिवे ईशा नितीन, शिंदे शिवानी सविनय, भांगे आज्ञा लक्ष्मण, नांगरे शौर्या श्रीकांत, खिल्लारे भूमी अशोक आणि गोसावी अवनी निलेश या सहा विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत आपली चमक दाखवली आहे.

या परीक्षेत पाचवीतील एकूण ९५ विद्यार्थ्यांपैकी ३२ विद्यार्थी पात्र ठरले असून, आठवीतील ६९ विद्यार्थ्यांपैकी २२ विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. हे यश संपूर्ण शाळेसाठी गौरवाचे ठरले आहे. या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल सावित्रीबाई फुले शिक्षण मंडळाचे अध्यक्ष व महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, सभापती डॉ. प्रमोद रसाळ, सचिव डॉ. महानंद माने, खजिनदार महेश घाडगे यांनी अभिनंदन केले आहे. तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण तुपविहीरे, उपमुख्याध्यापक बाळासाहेब डोंगरे, पर्यवेक्षक मनोज बावा व प्रा. जितेंद्र मेटकर यांनी देखील विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे कौतुक केले.

या यशामागे मार्गदर्शक शिक्षक गोकुळ ठाकूर, हलीम शेख, रवींद्र हरिश्चंद्र, सचिन सिन्नरकर, निशिगंधा हिले, तुकाराम जाधव, सुरेखा गव्हाणे आणि सर्व शिक्षकवृंद यांचे मोलाचे योगदान आहे. या घवघवत्या यशामुळे सावित्रीबाई फुले विद्यालयाचे नाव संपूर्ण तालुक्यात उजळून निघाले असून, विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# जिजामाता उद्यान विकास कामांच्या ५० लाखांच्या कामाच्या निविदा प्रसिद्ध- कृष्णा आढाव

■ जनप्रवास तालुका प्रतिनिधी

कोपरगाव : कोपरगाव शहराचे वैभव असलेल्या शहरातील जिजामाता उद्यानाचा विकास व्हावा अशी कोपरगाव शहरातील नागरिकांसह तमाम महिला भगिनींची मागणी होती. त्या मागणीची दखल घेवून आ.आशुतोष काळे यांनी जिजामाता उद्यानाच्या विकासासाठी आणलेल्या ५० लाखाच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली होती व या कामाच्या निविदा देखील प्रसिद्ध झाल्या आहेत. त्याबद्दल कोपरगाव शहरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असल्याचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हा युवक अध्यक्ष कृष्णा आढाव यांनी सांगितले आहे.

नागरीकांच्या अडचणी समजून घेऊन त्या अडचणी सोडवण्यासाठी कटिबद्ध असणारे आ.आशुतोष काळे यांनी कोपरगाव शहराच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाबरोबरच कोपरगाव शहराचा विकास साधला आहे. त्याचबरोबर विकासाचे उर्वरित प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू असतो.



हा पाठपुरावा सुरू असतांना निधी मिळविण्यापासून त्या त्या कामांना प्रशासकीय मंजुरी व कामाच्या निविदा प्रसिद्ध होईपर्यंत अथकपणे सुरूच असतो. त्याचाच एक भाग असणाऱ्या जिजामाता उद्यानाच्या विकासासाठी निधी मिळवून देवून आज प्रत्यक्षात विकास कामांच्या निविदा प्रसिद्ध झाल्या आहेत.

कोपरगाव शहरातून वाहणाऱ्या पवित्र गोदामाईच्या किनाऱ्यावर असलेले जिजामाता उद्यान महिलांसाठी अत्यंत महत्त्वाचे ठिकाण आहे. परंतु सोयी सुविधांचा अभाव असल्यामुळे या जिजामाता उद्यानाचा विकास व्हावा अशी कोपरगाव शहरातील नागरिकांसह तमाम महिला भगिनींची मागणी होती.

या मागणीची आ.आशुतोष काळे यांनी दखल घेवून ५० लाख रुपये निधी जिजामाता उद्यानाच्या विकासासाठी दिल्यामुळे होणाऱ्या विकास कामांमुळे उद्यानाचा पूर्णपणे चेहरामोहरा बदलणार असल्याचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हा युवक अध्यक्ष कृष्णा आढाव यांनी सांगितले आहे.

## प्रविण गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा पारनेर मध्ये निषेध

### पारनेर तालुका पुरोगामी चळवळीतील संघटना आक्रमक

■ जनप्रवास प्रतिनिधी

पारनेर : सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट येथे एका शिक्षण संस्थे तर्फे संभाजी बिग्रेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी तेथे इंदापूरच्या शिवधर्म फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी प्रवीण गायकवाड यांना काळे फासले होते व त्यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध व महाराष्ट्र जन सुरक्षा विधेयक २०२४ कायद्यासंदर्भात निवेदन पारनेर तालुका पुरोगामी चळवळीच्या वतीने तहसीलदार गायत्री सौंदणे यांना देण्यात आले.




दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ज्येष्ठ विचारवंत पुरोगामी चळवळीतील समस्त बहुजनांचे नेते लेखक, प्रभावी वक्ता ,प्रवीण गायकवाड यांच्यावर १३ जुलै २५ रोजी अक्कलकोट येथे पूर्वनियोजित भ्याड व जीवघेणा हल्ला करून त्यांच्या हत्याचा प्रयत्न करण्यात आला. या निवेदनावर युनिट ऑफ मूलनिवासी राजेंद्र करंदीकर, छत्रपती क्रांती सेना अविनाश देशमुख, युनिट ऑफ मूलनिवासी बाळासाहेब पातारे ,संभाजी ब्रिगेडचे सचिन काकडे, भूमिपुत्र शेतकरी संघटना संतोष वाबळे ,संभाजी ब्रिगेड सुदाम कोरडे, संभाजी ॲड.सविता नगरे ,सामाजिक कार्यकर्ता हिरामण सोनवणे, संभाजी ब्रिगेड एड. सोमनाथ गोपाळे, सामाजिक कार्यकर्ते ॲड .बाळासाहेब सोनवणे ,आरपीआयचे तालुकाध्यक्ष प्रदीप नगरे ,सामाजिक कार्यकर्ते अमित जाधव, युनिट ऑफ मूलनिवासी आयुब भाई शेख, युनिटी ऑफ मूलनिवासी रफिक राजे ,संभाजी ब्रिगेड रामकृष्ण पवार, संभाजी ब्रिगेडचे जय गायकवाड, मराठा सेवा संघाचे बबनराव वाबळे ,विनायक सोनवणे समशेर खान ,दादाभाऊ पटेकर ,सिताराम लवांडे , संतोष अडसूळ, प्रदीप कसबे, संदेश बर्वे, आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## संत शिरोमणी सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त सप्ताहाचे आयोजन

■ जनप्रवास वार्ताहार

पुणतांबा : संत शिरोमणी सावता महाराज यांच्या ७३० व्या पुण्यतिथी निमित्त येथे १७ ते २३ जुलै या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व पंचदिवशीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे

मुक्ताई ज्ञानपीठाचे महंत रामानंद गिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारपासून सुरू होणाऱ्या या कार्यक्रमात काकडा भजन ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण वाचन हरिपाठ तसेच सायंकाळी हरिकीर्तन महोत्सव होणारा असून यामध्ये ह भ प कैलास गिरी महाराज ज्ञानेश्वर महाराज जवळेकर अनिल महाराज तुपे लक्ष्मण महाराज नांगरे यांचे कीर्तन होणार असून कीर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप केले जाणार आहे. संत सावता महाराज पुण्यतिथी निमित्त बुधवारी. ( दि, २३ ) सावता महाराज प्रतिमेची गावातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे स्वामी रामानंद गिरी महाराज यांचे काल्याचे किर्तन तसेच महाप्रसाद वाटपाने महोत्सवाची सांगता होणार आहे कोपरगाव रस्त्यावरील वाकडी फाटा येथे असलेल्या पटांगणात होणाऱ्या या कीर्तन महोत्सव ग्रामस्थ तसेच भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सावता महाराज मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## अहिल्यादेवी होळकर यांची जयंती निमित्त राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

### अहिल्यानगर येथे यशवंत सेना व जय मल्हार संस्थेचा उपक्रम

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : यशवंत सेना अहिल्यानगर आणि जय मल्हार शैक्षणिक व बहुद्देशीय सामाजिक संस्था, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उत्साहात आणि भव्य स्वरूपात संपन्न झाला.

अहिल्यानगर येथील लक्ष्मीनारायण कार्यालयात पार पडलेल्या या सोहळ्याला अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. यामध्ये आमदार संग्राम भैय्या जगताप, संस्थेचे सरसेनापती माधवजी गडदे, शहराध्यक्ष कांतीलाल महादेव जाडकर, जिल्हाध्यक्ष विजय तमनर, कार्याध्यक्ष बाबासाहेब राशिनकर, प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हा प्रमुख व खासदार श्रीकांत शिंदे फाउंडेशनचे प्रतिनिधी राजेंद्र पोकळे तसेच डॉ. सोमनाथ देवकाते यांचा समावेश होता.

या विशेष दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंत व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. श्रीगोंदा तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यातून निवड झालेल्या व्यक्तींनी समाज, शिक्षण सामाजिक सेवा आणि इतर क्षेत्रांत आपल्या कार्याची ठसा उमटवला आहे. या वर्षीचा राज्यस्तरीय आदर्श समाजसेवक पुरस्कार माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल ढवाळ , पत्रकार चंदन घोडके, आप्पा चव्हाण तसेच सामाजिक कार्यकर्ते नारायण क्षीरसागर, सुरेश गलांडे व ज्ञानदेव भैलुमे यांना प्रदान करण्यात आला. याशिवाय, इतरही अनेक पत्रकार व समाजसेवकांचा या वेळी गौरव करण्यात आला. पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्यांचा सन्मान करून या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना प्रोत्साहन देण्याचा संस्थेचा उद्देश सफल झाला आहे. या भव्य कार्यक्रमास बंडू लबडे, अण्णासाहेब काळाने, ह. भ. प. शिंदे महाराज, बाबासाहेब मुसळे, सुरेश भाऊ दानवे, डॉ. संदीप तांबे, सुभाष जाडकर, जालिंदर बोरुडे, रंगनाथ तमनर, सयाजीराव ओहोळ, अभिजीत कोकरे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरस्कारप्राप्त सर्व व्यक्तींना सर्व स्तरातून हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा मिळत असून, अशा कार्यक्रमांमुळे सामाजिक कार्याला अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# अविवाहितांची लग्नाच्या आमिषाने फसवणूक, टोळीचा पर्दाफाश; नवरीसह एक अटकेत

■ जनप्रवास प्रतिनिधी

श्रीगोंदा : राज्यासह परराज्यातील अविवाहीत मुलांना पैशांसाठी खोटे आमिष दाखवून बनावट लग्न करुन फसवणुक करणा–या बनावट नवरी व मावशभाऊ श्रीगोंदा पोलिसांनी केले अटक

सविस्तर वृत्त अशे की श्रीगोंदा तालुक्यातील घोगरगाव येथील नवरदेव रोहित रमेश तरटे वय २८ रहिवाशी असून त्याचा हॉटेलचा व्यवसाय असून त्याच्या संपर्कात काही महिन्यापूर्वी एजंट संपर्कात आला होता त्याने चांगली नवरी पाहून देतो असे आमिष दाखवून १३ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी एक वाजण्याच्या सुमारास एजंट मार्फत बोला चाली करून तीन लाखाचा व्यवहार ठरवून बनावट नवरी मुलगी व बनावट मुलीचा मावश भाऊ यांनी घोगरगाव येथेच पैसे घेऊन १४ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी साडेसात वाजता रिध्दी सिध्दी मंगल कार्यालय, आळंदी देवाची, पुणे येथे रोहित रमेश तरटे,याच्याबरोबर बनावट नवरीचा रोल करणारी हीने तीच्या साथीदार व एजंटच्या उपस्थित विवाह केला त्यानंतर काही दिवस घरी राहुन त्याच्या घरातील रोख रक्कम चोरुन घेऊन बनावट नवरी गायब झाली . यानंतर नवरदेव व त्याच्या कुटुंबांनी चौकशी केली असता आपण फसलो हे लक्षात आल्यावर त्यांनी थेट श्रीगोंदा पोलीस स्टेशन गाठले नवरदेव रोहित रमेश तरटे याने एजंट व तिच्या साथीदार मार्फत बनावट नवरी कडून फसवणूक झाली याची तक्रार दिली

फिर्यादी वरुन श्रीगोंदा पोलीस स्टेशनने तपास करण्यास सुरुवात केली सदरच्या गुन्ह्यांमध्ये वरिष्ठ पोलीस अधिका–यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली नमुद गुन्हा करणा–या बनावट रोल करणारी महीला, एजंट व अन्य साथीदारांचा गुन्हे शोध पथकामधील पोना/संग्राम जाधव, पोकॉ/संदिप शिरसाठ, पोकॉ/रवि जाधव व मपोकॉ/२६९२ अलका वाघ अशांनी बुलढाणा, जालना व संभाजीनगर परीसरात जाऊन शोध घेत असताना तांत्रिक तपास व गुप्त बातमी दारामार्फत माहीती मिळाल्याने नवरीचा बनावट रोल करणारी एक महीला ,नवरीच्या मावश भावाचा रोल करणारा आकाश तोताराम सुरोशे वय ३१ वर्षे रा. दहिद बुद्रुक ता.जि. बुलढाणा या आरोपींना बुलढाणा व संभाजीनगर येथील वेगवेगळया ठिकाणाहून सापळा रचुन त्यांना अटक केले असून त्यांच्या इतर साथीदारांचा गुन्हयामध्ये सहभाग (रोल) निष्पन् केला असून त्यांचा पोलीस शोध घेत आहे.

सदर आरोपींना दि. १३जुलै२०२५ रोजी अटक करण्यात आली असून त्यांना श्रीगोंदा कोर्टात हजर केले असता आरोपींना चार दिवसाची पोलीस कस्टडी रिमांड मिळाली आहे. नमुद गुन्हयातील नवरीचा बनावट रोल करणारी एक महीला २) नवरीच्या मावश भावाचा रोल करणारा आकाश तोताराम सुरोशे वय ३१ वर्षे रा. दहिद बुद्रुक ता. जि. बुलढाणा यांनी खोटा विवाह केला असेल तर श्रीगोंदा पोलीसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे. आरोपी नवरीचा बनावट रोल करणारी एक महीला , नवरीच्या मावश भावाचा रोल करणारा आकाशतोताराम सुरोशे वय ३१ वर्षे रा. दहिद बुद्रुक ता.जि. बुलढाणा या आरोपीनंवर परराज्यात धम्बोला पो.स्टे जि. डुंगरपुर, राजस्थान ४२०प्रमाणे गुन्हा दाखल आहे .



## पारनेरमध्ये ऑनलाईन डिजिटल दाखले मिळवण्यासाठी नागरिकांची हेळसांड

■ जनप्रवास प्रतिनिधी

पारनेर : पारनेर ग्रामीण रुग्णालयातील जन्म मृत्यू आणि विवाह नोंदणी विभागातून नागरिकांना प्रशासकीय कामकाजासाठी लागणारे जन्म मृत्यू आणि विवाह नोंदणीचे डिजिटल दाखले मिळत नसल्याने नागरिकांची हेळसांड होत असल्याचे दिसून येत आहे.

काही दिवसापूर्वी पारनेर नगर पंचायत कडून जन्म मृत्यू विवाह नोंदणीचे ऑफलाईन दाखले मिळत होते पण कालांतराने हे दाखले पारनेर ग्रामीण रुग्णालयातील जन्म मृत्यू व विवाह नोंदणी विभागात मिळू लागले. पारनेर शहरातील बहुतांश नागरिकांना जन्म मृत्यू, विवाह नोंदणीचे दाखल्याची प्रशासकीय कामकाजासाठी





आवश्यकता असते पण गेली कित्येक वर्षापासून नागरिकांना ग्रामीण या विभागातून सेवा उपलब्ध होत नाही. एखादा नागरिक डिजिटल दाखले मिळवण्यासाठी या विभागात गेल्यास तेथील कर्मचारी सांगतात की आपले सरकार किंवा महा ऑनलाइन सारख्या अधिकृत वेबसाइट आमच्याकडे अजून कार्यान्वित नाहीत त्या मुळे आम्ही नागरिकांना मागणी असलेले डिजिटल दाखले देऊ शकत नाहीत. त्यामुळे नागरिकांना प्रशासकीय कामकाजासाठी देखील नागरिकांच्या या समस्या निर्माण झाली आहे. पारनेर नगरपंचायतला समस्येला तोंड द्यावे लागत आहे. आरोग्य विभागातील वरिष्ठांशी या संदर्भात चर्चा केली असता आम्ही मासिक मीटिंग मध्ये नागरिकांच्या समस्या बाबत विषय घेतला आहे.

पण वरिष्ठ पातळीवरून निर्णय घेतले जात नसल्याचे सांगितले जात आहे. त्या मुळे नागरिकांना डिजिटल दाखले मिळवण्यासाठी कोणाकडे दाद मागायची असा प्रश्न पडत आहे. लोकप्रतिनिधी यांनी नागरिकांना डिजिटल दाखल्याची ऑनलाईन वेबसाइट सुरू करण्यासाठी आरोग्य विभागाच्या संबंधित अधिकारी यांच्याशी मीटिंग घडून समस्या सोडवण्याची मागणी पारनेर शहरातील नागरिक करत आहेत.

> पारनेर नगर पंचायत विभागाकडे आता जन्म मृत्यू आणि विवाह नोंदणीचे दाखले मिळत नाहीत त्या साठी आता पारनेर ग्रामीण रुग्णालयातील विभागात दाखले उपलब्ध होत आहेत. पण हे दाखले डिजिटल दाखले मिळत नाहीत . नागरिकांची या समस्या साठी आम्ही पारनेर नगर पंचायतचे लेखी निवेदन जिल्हाधिकारी आणि आरोग्य अधिकारी यांना लवकरच देणार आहोत आणि पारनेर शहरातील नागरिकांच्या या समस्यांसाठी एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करणार आहोत.
>
> - योगेश मते, सभापती, पाणी पुरवठा, पारनेर नगर पंचायत

> माझ्या कुटुंबियांना मक्का मदिना या धार्मिक स्थळ येथे घेऊन जायचे आहे .त्या साठी मला विवाह नोंदणीचे डिजिटल दाखले आवश्यक आहे पण ग्रामीण रुग्णालयात ऑनलाइन वेबसाइट नसल्याने ते मिळत नाही त्या मुळे मला अडचण निर्माण झाली आहे. प्रशासनाने लवकरात लवकर डिजिटल दाखले मिळवण्यासाठी वेबसाईट कार्यान्वित करावी अशी मागणी करण्यात येत आहे.
>
> - रमीज राजे, ग्रामस्थ.

## जिल्हा परिषदसमोर प्रहारचे परसराम जगधने यांचे उपोषण

### देऊळगाव सिद्धी ग्रामपंचायत कामांच्या चौकशीची मागणी

■ जनप्रवास प्रतिनिधी

अहिल्यानगर : देऊळगाव सिद्धी येथे ग्रामपंचायत मार्फत झालेल्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार व बोगस बिलांची चौकशी व्हावी. तसेच सरपंच, उपसरपंच, ठेकेदार, ग्रामसेवक यांच्यावर कार्यवाही व्हावी, व संपूर्ण प्रकाराची चौकशी व्हावी या मागणीसाठी प्रहार संघटनेचे नगर तालुका कार्याध्यक्ष परसराम जगधने यांनी आज दि १४ जुलै पासून जिल्हा परिषद कार्यालयासमोर अन्नत्याग उपोषण सुरू केले आहे.

जगधने यांच्या मते देऊळगाव सिद्धी येथे मोठ्या प्रमाणात विकास कामे झालेले आहे. मात्र या कामांमध्ये जास्त रक्कमचे



बिले काढली. या मध्ये सरपंच, उपसरपंच, ठेकेदार, ग्रामसेवक यांनी संगनमताने हे केले असल्याचे आरोप यावेळी जगधने यांनी केला. मुरूमा ऐवजी रस्त्यावर संपूर्ण माती टाकण्यात आलेले आहे.

तसेच एलईडी लाईट न लावता साधे बल्ब लावण्यात आलेले आहेत. घनकचरा संकलनासाठी चे बांधकाम न करता जवळपास चार लाख रुपये बिल काढण्यात आलेले आहे. पाच लाख रुपयाचे दोन शौचालय बांधण्यात आलेले. शौचालय दुरुस्ती न करता बिले काढण्यात आली. पाणी शुध्दीकरणाचे आरो फ्लॅन्ट न बसवता बिले काढली. असे विविध प्रकारच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात घोटाळा झाला असून याची चौकशी व्हावी या मागणीचे निवेदन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी याना दि. ७ जुलै रोज जगधने यांनी दिले होते. याची चौकशी न झाल्यामुळे दि. १४ पासून पसरराम जगधने यानी जिल्हा परिषदे समोर अन्नत्याग उपोषण सुरू केले आहे.

## ऑनररी लेफ्टनंट संतोष साबळे यांचा सेवापूर्ती समारंभ उत्साहात

■ जनप्रवास प्रतिनिधी

पारनेर : पारनेर तालुक्यातील रूई छत्रपती येथील श्री संतोष गोविंदराव साबळे हे भारतीय सेनेतील १८ मराठा लाईट इन्फंट्री रेजीमेंट मधून २८ वर्षे यशस्वी सेवा करून ३० जून २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यानिमित्त त्यांच्या सेवानिवृत्ती व गौरव सोहळ्याचे आयोजन श्री छत्रपती आजी–माजी सैनिक संघटना व ग्रामस्थ यांच्या मार्फत रविवार दिनांक १३ जुलै २०२५ रोजी रुई छत्रपती येथील खंडोबा माळ मंदिराच्या प्रांगणात केले होते.

सोहळ्याच्या सुरुवातीला गावातील ग्रामदैवत श्री भैरवनाथ मंदिराचे दर्शन घेतले. त्यानंतर





तिरंगा ध्वज व हार फुग्यांनी सजवलेल्या विशेष आमंत्रित खुल्या वाहनातून गावाच्या सुरुवातीला असलेल्या वेताळ बाबा चौकातून प्रेरणादायी देशभक्तीपर गीतांच्या सुरासह फटाक्याच्या आतिशबाजी मध्ये मिरवणुकीची सुरुवात झाली.

वाहनामध्ये विराजमान ऑनररी लेफ्टनंट साबळे साहेब, पत्नी सुरेखा, आई रखमाबाई व वडील गोविंदराव भगवे फेटे परिधान करून सर्व मान्यवरांना अभिवादन केले. गावाच्या मुख्य पेठेतून मिरवणूक ग्रामपंचायत कार्यालय मध्ये आली असता तेथे सरपंच सौ मैनाबाई सोन्याबापु साबळे यांनी श्री संतोष साबळे यांच्यासह श्री शिवाजी शंकर साबळे यांचाही सेवा पूर्ती निमित्त सन्मान करण्यात आला. राजू मेहेत्रे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून उपस्थित तालुक्यासह जिल्ह्यातील सर्व माजी सैनिक व माजी सैनिक संघटनांचे व परिसरातील सर्व गावातील जनसमुदायाचे स्वागत केले.

सत्कारमूर्ती श्री साबळे साहेब यांनी आपल्या भाषणामध्ये आपल्या शालेय जीवनापासून भारतीय सेनेतील जीवन प्रवास जनसमुदायासमोर उलगडला. यामध्ये साऊथ सुदान येथील शांतीसैनिक म्हणून केलेले कार्य सहारणीय होते.

जम्मू काश्मीर येथील पाकिस्तान व चीन सीमेवरील रोमांचकारी कार्याच्या शौर्य व पराक्रमाच्या गाथा ऐकताना अनेकांचे डोळे भरून आले त्याच सोबत आपल्या भूमिपुत्राचा अभिमानही वाटला.

## एसटीमध्ये चढताना चोरट्याने दागिने केले लंपास

■ जनप्रवास प्रतिनिधी

राहुरी : राहुरी बस स्थानक येथे बसमध्ये चढत असताना अज्ञात आरोपीने मंगल गवळी यांच्या पर्समधील सुमारे पावने चार तोळे वजनाचे सोन्याचे दागीने असलेले पाकीट चोरुन नेल्याची घटना घडली.

मंगल दिलीप गवळी, वय ६२ वर्षे,श्रीरामपूर येथील मोरगे वस्ती येथील रहिवाशी असून त्या अंगणवाडी सेविका आहेत. दि. ८ जुलै २०२५ रोजी मंगल गवळी ह्या पुणे येथे त्यांच्या मुलीकडे गेल्या होत्या. त्या दि. ९ जुलै रोजी सकाळी पुणे येथुन श्रीरामपुरकडे येण्यास निघाल्या. दुपारी २.१५ वाजता त्या राहुरी बस स्थानक येथे आल्या. नंतर त्यांनी बस बदलून अहिल्यानगर ते श्रीरामपुर बसमध्ये बसल्या. दरम्यान बसमध्ये चढत असताना अज्ञात भामट्याने गर्दीचा फायदा घेऊन मंगल गवळी यांच्या पर्समधील ३ तोळे ७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे लॉकेट, चैन व अंगठी असे सोन्याचे दागीने असलेले पाकीट चोरुन नेले.

मंगल गवळी ह्या बसमध्ये सीटवर बसल्यावर पर्समधील दागीन्याचे पाकीट चोरी गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. घटनेची माहिती मिळताच पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनात पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेऊन आरोपीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.

मंगल दिलीप गवळी यांच्या फिर्यादीवरून अज्ञात भामट्या विरोधात गुन्हा रजि. नं. ७७९/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (सी) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

## संजीवनी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी राजेश परजणे यांची निवड



■ जनप्रवास वार्ताहार

पुणतांबा : जिल्हयात अग्रणी असलेल्या संजीवनी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी राजेश सखाहरी परजणे यांची नुकतीच बिनविरोध निवड झाली त्याबददल संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांनी सत्कार केला.

संजीवनी पतसंस्थेच्या अध्यक्षपदाची निवड मंगळवारी झाली यासाठी तालुका सहायक निबंधक प्रदिप रूद्राक्ष यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले.त्यांचा सत्कार अमृत संजीवनीचे चेअरमन पराग संधान यांनी केला.राजेश परजणे यांच्या नावाची सुचना मावळते अध्यक्ष प्रदिप नवले यांनी केले तर त्यास संचालक राजेंद्र बागुल यांनी अनुमोदन दिले. याप्रसंगी अमृत संजीवनीचे चेअरमन पराग संधान, संजीवनी पतसंस्थेचे उपाध्यक्ष संदिप गुरूळे, संचालक भाउसाहेब आदिक, श्रीकांत चांदगुडे, गणपत राउत, अनंत पाटील, महेंद्र नाईकवाडे, शिवाजीराव लहारे, जयराम सांगळे, कोल्हे कारखान्याचे उपाध्यक्ष राजेंद्र कोळपे, संचालक विश्वासराव महाले, त्रंबकराव सरोदे, बाळासाहेब वक्ते, सतिष आव्हाड, ज्ञानेश्वर परजणे, बापुसाहेब बारहाते, रमेश घोडेराव, संभाजीराव बोरनारे, महेश परजणे, मुकुंद काळे आदि उपस्थित होते. शेवटी मुख्य कार्यकारी अधिकारी व्ही. व्ही. रोहमारे यांनी आभार मानले.

## स्व. शंकरराव कोल्हेंसारख्या रत्नामुळे सहकाराला दिशा मिळाली : गिलबिले

■ जनप्रवास वार्ताहार

पुणतांबा : सहकार हा जागाचा आत्मा आहे. सहकारातुन अशक्यप्राय गोष्टी शक्य झाल्या, विकासरूपी संस्था उभ्या राहिल्या, परमेश्वरांने या भुतलावर माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या रूपाने सहकाराचा नांवलौकीक वाढविण्यांसाठी कर्मरत्न जन्माले घातले त्यातुन त्यांनी परिसराबरोबरच राज्याचे सहकारवैभव देशात नावारूपाला आणले असे प्रतिपादन व्यक्तीमत्व विकास केंद्राचे संस्थापक, अभियंते गोपी गिलबिले यांनी केले.

सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना आणि त्यांचे पायलट प्रकल्प राज्यातील साखरकारखानदारीला आदर्शवत आहे असेही ते म्हणाले.





कोल्हे सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमीत्त एकदिवसीय प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यांत आले होते त्याचे उदघाटन संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांनी केले. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यकारी संचालक सुहास यादव यांनी प्रास्तविकात कोल्हे कारखान्यात कर्मचा–यांबरोबरच सर्व उस उत्पादक सभासद शेतक–यांच्या व्यक्तीमत्व विकासाकरीता राबविलेल्या विविध योजनांची माहिती दिली. उपाध्यक्ष राजेंद्र कोळपे व साखर सरव्यवस्थापक शिवाजीराव दिवटे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. अध्यक्षपदावरून बोलतांना बिपीन कोल्हे म्हणाले की, सभासद शेतक–यांबरोबरच छोट्या मोठ्या घटकांच्या उत्कर्षाचा मार्ग सहकारातुन जातो. स्व. कोल्हे यांनी परदेशात उच्च शिक्षण घेतले तरी येथील मातीशी असलेली नाळ कधी सोडली नाही. संजीवनी नावाचे वैभव त्यांनी उभे केले त्याची फळे आपण चाखतो आहे. भविष्यातील बदल, तंत्रज्ञान, प्रगलभता आणि त्यातुन नवनविन निर्माण होणारी आव्हाने समर्थपणे पेलण्यासाठी युवानेते विवेक कोल्हे व त्यांचे सर्व संचालक मंडळ कार्यरत आहे.

गिलबिले पुढे म्हणाले की, संस्था आपल्यासाठी काम करते तेंव्हा तिच्या उत्कर्षासाठी कामगार या नात्यांने आपणही तितकेच योगदान दिले पाहिजे. प्रत्येकामध्ये आत्मविश्वास आहे तो फक्त जागृत करा आणि संस्था स्वतःच्या बळावर पुढे नेण्यासाठी झोकुन देवुन काम करा. स्वतःमध्ये बदल घडवा. कामावर निष्ठा ठेवा.

याप्रसंगी संचालक अमृत संजीवनीचे अध्यक्ष पराग संधान, विश्वासराव महाले, त्रंबकराव सरोदे, ज्ञानदेव औताडे सर, बाळासाहेब वक्ते, सतिष आव्हाड, रमेश घोडेराव, ज्ञानेश्वर होन, बाळासाहेब पानगव्हाणे, संजयराव औताडे, ज्ञानेश्वर परजणे, मानव संसाधन विभाग प्रमुख विशाल वाजपेयी, व्यवस्थापकीय व्यवस्थापक प्रकाश डुंबरे, सचिव तुळशीराम कानवडे, उपस्थित होते.

# नेहमी काहीतरी नवीन शिकण्याचा प्रयत्न करावा



बरेचजण बऱ्याच वेळा कोणतेही काम जीव ओतून करीत नाही. म्हणजेच तशी मनाची तयारी त्यांनी केलेली नसते. मी हे काम करणार आहे. त्याची मला माहिती नसेल, तर मी ती माहिती मिळवीन, असा मनःपूर्वक निर्धार करावा.

आपल्या सद्यपरिस्थितीला आपण स्वतःच जबाबदार आहात, यावर पहिल्यांदा विश्वास ठेवा. आपले जीवन प्रभावी आणिसार्थक बनविण्यासाठी काहीसे वेगळे आणि सकारात्मक करण्याची आवश्यकता असते. आपल्या भावनांना प्रेरित करण्याची भूमिकाच जीवनास सार्थक आणि समर्थ बनवते. परिस्थिती कितीही कठीण असो; आपण जर शांतचित्ताने एखाद्या समस्येवर वा परिस्थितीवर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला, तर तो उपाय हमखास सापडतो. बुद्धी आणि विवेकाचे नियंत्रण हे आपल्या अंतरीच असते. आपण जेव्हा त्यावर पूर्णपणे कंट्रोल करतो तेव्हा सर्व गोष्टींविषयीची आपल्याला माहिती मिळू लागते. आपण, जर आपल्या स्वतःचेच टीकाकार बनून आपल्याच चुका मोजू लागलो, तर आपण खालच्या पायरीवरून वरची टोकाची पायरी कधीच गाठू शकणार नाही. स्वतःचा शोध घेत पुढे पाऊल टाकणाऱ्यालाच हुशार, समजूतदार म्हटले जाते. जगात ज्या काही महान व्यक्ती घडल्या त्यांनी त्यांच्या अंतरीच्या प्रतिभेची कधीही अवहेलना केली नाही. उलट, त्यांनी आणखी खोलात जाऊन तिचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. आपणही अगदी असाच प्रयत्न करायला हवा. आपल्या अंतरी डोकावून आपल्या प्रतिभेचा शोध घ्यायला हवा.

नेहमी काहीतरी नवीन शिकण्याचा प्रयत्न करावा. आपले ध्यान ती नवीन गोष्ट शिकण्याकडे केंद्रित केले पाहिजे. जोपर्यंत ती नवीन गोष्ट आपण आत्मसात करत नाही, तोपर्यंत शिकण्याची वृत्ती सोडू नका. आपल्या अंतरी अद्भूत शक्ती आहे. तिचा शोध घ्या. प्रतिभेला बाह्यशिक्षणाची गरज भासत नाही. अशिक्षित व्यक्तीसुद्धा प्रतिभाशाली असू शकते. आंतरिक प्रतिभा म्हणजे तरी काय ? एखादी कला, तंत्र शिकून घ्यायचे असेल तर या प्रक्रियेत आपले संपूर्ण जीव ओतण्याची तयारी. बरेचजण बऱ्याच वेळा कोणतेही काम जीव ओतून करीत नाहीत. म्हणजेच तशी मनाची तयारी त्यांनी केलेली नसते. मी हे काम करणार आहे. त्याची मला माहिती नसेल, तर मी ती माहिती मिळवीन. नवीन गोष्ट शिकून घेईन; आणि काम पूर्ण करेनच तेही चांगल्या पद्धतीने, असा मनःपूर्वक निर्धार करावा. येथेच आपण आळस केला म्हणजे अपयशाला आमंत्रणच दिले. केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे, तर आंतरिक प्रतिभा असणेही आवश्यक आहे. आपण ज्या गोष्टीविषयी जास्तीत जास्त जाणून घेण्याची इच्छा बाळगून आहात, त्या गोष्टीकरिता केवळ ऐकून-बोलून भागणार नाही, तर ती गोष्ट स्वतःहून शिकणे आवश्यक आहे. कॉम्प्युटरविषयी जास्तीत जास्त ज्ञान मिळविण्यासाठी जोपर्यंत आपण स्वतः कॉम्प्युटरचे ज्ञान शिकून घेत नाही तोपर्यंत ते तुम्हाला आत्मसात करता येणार नाही. आपण जेव्हा त्याविषयी जास्तीत जास्त ज्ञान मिळवू तेव्हा कुठे ते आपण दुसऱ्याला देऊ शकू. यासाठी आळस, अती निद्रा यांचा त्याग करून उत्साहाने कामाला लागले पाहिजे. तुमच्यातील आंतरिक प्रतिभाच तुम्हाला यशाच्या अत्युच्च शिखरावर पोहोचवू शकेल.

# स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांची उंची जास्त असते

मजनू टाइप रोडरोमियो तरुणांप्रमाणेच डासांनाही स्त्रियांचे खूपच आकर्षण असते. त्यातही डासांना लठ्ठ स्त्री-पुरुष जास्त आवडतात, असा दावा न्यूयॉर्क येथील ॲलर्जी ॲन्ड अस्थमा केअरचे डॉ. किलफोर्ड बारोट यांनी केला आहे.

डासांच्या त्वचेमधून निघणाऱ्या रसायनांचा वास ३० मीटर अंतरावरूनच ओळखता येतो असा त्यांनी दावा केला आहे. डासांना स्त्रियांना चावणे आवडते, याचे कारण असे त्यांच्या शरीरात असलेले ॲस्ट्रोजन नावाचे तत्त्व डासांना खूपच आवडते; परंतु आता या संदर्भात केलेल्या ताज्या अध्ययनाचा निष्कर्ष असा की, स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांची उंची जास्त असते. त्यामुळे उडत्या डासांना पुरुषांचा चावा घेणे सोपे पडते. त्यामुळे पुरुषांना डास जास्त चावतात; पण स्त्री व पुरुष लठ्ठ असतील चावतात असेही आढळून आले आहे. याचे कारण असे की, लठ्ठ स्त्री-पुरुषांच्या शरीरात गरमी अथवा कार्बनडायक्साईडचे प्रमाण जास्त असते व तेच डासांना आकर्षित करते. महिला विशेषतः गर्भवती स्त्रिया डासांना जास्त आवडतात. कारण गर्भवतींच्या शरीरातून कार्बनडायक्साईड जास्त प्रमाणात बाहेर पडते, असे डॉ. बारोट यांचे म्हणणे आहे. डासांचा जास्तच त्रास होत असेल तर डासांना पळवून लावणाऱ्या ॲन्टी-हिस्टामिन औषध घेण्याचा त्यांनी सल्ला दिला आहे.

# जीवनाची सार्थकता विवाहात आहे



आपण लग्न केव्हा करावं ? असा प्रश्न हल्लीच्या आधुनिक विचाराच्या मुलींना पडतो. लग्न करण्यास त्यांना काही कारणं ठोस स्वरुपात हवी असतात. जर खालील कारणं योग्य सूट होत असतील तर 'लग्नाळू'मुलींनी लग्न करण्यास हरकत नाही असं म्हणता येईल.

- जर वय १८ ते २१ वर्षाच्या वरील असेल.
- विवाह संबंधाने तुमची मानसिक तयारी झाला असेल.
- शारीरिक मिलनाची तीव्रता जाणवत असेल तर.
- एकट्याला उदास वाटत असेल व कोणी साथीदार असावा असे वाटू लागले तर.
- आपलं सुखदुःख आपलेपणानं ऐकून घेणारा जोडीदार हवा असे वाटत असल्यास.
- तुम्ही मिळवत्या आहात.
- काही आव्हानात्मक कामे करत असल्यास.
- स्वइच्छा उफाळून आली असल्यास.
- घर खायला उठलंय असं वाटू लागल्यास.
- आपल्याला सहानुभूतीची गरज आहे. मनातले खूप खूप आपल्या खास माणसाला सांगावेसे वाटते.
- २१ वर्षांवरील विधवा असाल.
- म्हातारपण व यौवनकाल सुखात जावा असे वाटत असल्यास.
- योग्य वयात मूल व्हावं व त्याचं संगोपन घडावं असं वाटत असल्यास.
- आई-वडिलांना सुखी पाहू इच्छिता.
- समाजात सन्मानपूर्वक राहावं असं वाटत असल्यास.
- चांगल्या-वाईटाचा अनुभव घ्यावा असे वाटत असेल तर.
- जीवनाची सार्थकता विवाहात आहे असे जर मनाला वाटत असेल तर.
- वरीलप्रमाणे कारणे मनाला पटत असतील तर अशा विचाराच्या मुली विवाहयोग्य ठरतात. त्यांनी लग्नाचा विचार करावा.
- नोकरी, करिअर, कौटुंबिक जबाबदारी यामुळे काही मुलींचे वय वाढत जाते. मग 'आपण लग्न केव्हा करावे ? हा प्रश्न मनात डोकावत राहतो. जर वरील कारणे योग्य वाटल्यास मांडवाखालून निघायला हरकत नाही. इतर कारणांसाठी आपलं लग्न थांबवू नका.

# प्रेमात गोपनीयताच खुलून दिसते

पाश्चात्य धर्तीवर खुल्लमखुल्ला प्रेम करण्याची नवी फॅशन भारतीय तरुणांव्दारे अवलंबली जात आहे. विशेषत: समाजातील उच्चभ्रू वर्गाचा हा स्टेटस् सिम्बॉल होत आहे. लाजलज्जा गुंडाळून केले जाणारे हे प्रेम भारतीय संस्कृतीवर प्रश्नचिन्ह तर लावतेच शिवाय वडीलधाऱ्या मंडळींना डोळे मिटून घेण्यासही भाग पाडले आहे.

प्रेमराधनेच्या या नव्या ढंगाने प्रत्येक शहरात लव्हर्स पार्क व लव्हर्स स्पॉट निर्माण केले आहेत. जेथे प्रेमीजन कोणतीही बंधने न जुमानता प्रेम व्यक्त करीत आहेत. प्रेमाची ही नवी पद्धत एवढी मॉडर्न असते की तेथून जाणाऱ्यांना आपला मार्ग बदलावा लागतो. लाजलज्जेच्या साऱ्या मर्यादा ओलांडलेल्या या मंडळीत नोकरीच्या शोधार्थ आपल्या घरापासून दूर एखाद्या शहरात राहणारे तरुण असतात. अनिर्बंध जीवन जगण्याची इच्छा व एकाकीपणा त्यांना नवे संबंध जोडण्यास मजबूर करतात. बऱ्याचदा ऐषारामी जीवनासाठी व काही रुपयांसाठी ही मंडळी आपल्या स्वाभिमानही विकतात.

कारच्या काळ्या काचांआड, झाडाझुडपात, झाडामागे डोकावून पाहिलेत तर हे प्रेमाराधन कोणत्या टोकाला पोहचले आहे हे सहज लक्षात येईल. सर्व ठिकाणी मिठ्या मारुन बसलेले लैना-मजनू आढळतील. एकांत शोधत व पोलिसांचा ससेमिरा चुकवीत हे तरुण भारतीय शिष्टाचार व संस्कृतीची खिल्ली उडवताना दिसतील. प्रेमात गोपनीयताच खुलून दिसते. संयम हेच सुखी जीवनाचे सूत्र असते. प्रेम प्रदर्शनात नव्हे तर जाणीवेत असते, जे दोन मने जुळवते. प्रेम करणे वाईट नव्हे पण ते व्यक्त करण्यात शालीनता हवी. काळापुढे जाण्याच्या नादात आपला जोडीदार हिरावला जाऊ नये यासाठी जे काही कराल ते विचारपूर्वक करा.

# विनाकारण त्रागयाने बोलण्याऐवजी शांत रहा

संसार म्हटला की, भांड्याला भांडे लागणारच. दोन वेगवेगळ्या व्यक्तीमत्वाच्या व्यक्ती एकत्र येऊन संसाराची चूल मांडतात. यामुळेच मतभेद होऊन भांडण, वाद होतात. हे टाळण्यासाठी आपण खालील पद्धतीने वागावे.


**पुनरोक्ती टाळा :** महिलांना एक गोष्ट पुन्हा पुन्हा सांगण्याची सवय असते, त्यामुळे भांडण होणे साहजिकच असते. आपली ही सवय बदलण्याचा प्रयत्न करा. कारण या सवयीने पती वैतागतात.

**शिवीगाळ करु नका :** बऱ्याचदा कपल्स भांडणात आपल्या मर्यादा विसरुन एकमेकांना शिव्या देऊ लागतात. कधी कधी मनातील राग काढावा लागतो; पण त्यालाही काही मर्यादा असतात.

**ई-मेल एसएमएसव्दारे :** आपण एकमेकांशी बोलत नसाल व आपला जोडीदार काही ऐकून घेण्यास तयार नसेल तर ई-मेल वा एसएमएस याव्दारे आपले विचार मांडणे उत्तम ठरेल; पण त्यात भांडण वाढेल असे काहीही लिहू नका. तसेच आपण मेलव्दारे त्याची विनवणी करीत आहोत असेही वाटू देऊ नका. मेलवर ओळीने सर्व इश्यू मांडा व आपण कसे सॉल्व्ह करु इच्छिता ते लिहा.

**स्पेशल एटीकेटीसची अपेक्षा नको**

आपला पती थोडाही सामाजिक नाही याचा आपल्याला राग येत असेल. आपल्या मैत्रीणीशी गप्पा मारणे, नातेवाईकांकडे जाणे त्याला पसंत नसेल. तो आपल्या सोबत खूपच कमी वेळा बाहेर पडत असेल त्यामुळे आपण त्याच्याशी भांडत, त्याला नावे ठेवत असाल, त्याच्यावर रुसत असाल. अशावेळी तो असा का आहे हे समजून



घेण्याचा प्रयत्न करा. कदाचित त्याला आपल्या मैत्रिणी आवडत नसतील वा त्यावेळी तो खूप दमलेला असेल, प्रेमाने त्याला सामाजिक असण्याचे फायदे समजावून सांगा.

**प्रकरण वाढवू नका :** मित्र-मैत्रिणी समोर अशिष्ट वागणे, नावे ठेवणे यावरुन बऱ्याचदा भांडण होते. अशावेळी प्रकरण वाढवू देऊ नका. खरे तर हे योग्य नव्हे; पण गोष्टी वाढवण्यात कसलाही फायदा नसतो, तर तो अशा वागण्याबद्दल शरमिंदा असेल, तर आपणही सारे विसरुन त्याला माफ करा; पण अशी चूक पुन्हा करु नको असा इशारा मात्र अवश्य द्या. दुर्लक्षित करण्याची सवय गांभीर्याने घेऊ नका : आपण काही सांगत असताना त्याच्याकडे दुर्लक्ष करण्याची पुरुषांना सवय असते. अशावेळी राग येणे स्वाभाविक असते. बऱ्याचदा आपण ओरडत असतानाही कसलीही प्रतिक्रिया न दर्शवता तो तसाच रुमबाहेर जातो. आपण असे केल्यास त्याला अजिबात खपत नाही. बऱ्याचदा तो हातही उगारतो. त्याची ही सवय आपण बदलू शकत नाही. अशावेळी विनाकारण त्राग्याने बोलण्याऐवजी शांत राहा. रागाने थोडा वेळ त्याच्याशी बोलू नका. त्याला धडा शिवणे आवश्य असते; पण न भांडता.

**धडा द्या पण प्रेमाने**

ऑफिसातून परतल्यानंतर त्याचे टी.व्ही. पाहात बसणे आपल्याला खटकते. त्याने आपल्याशी बोल-ावे अशी आपली इच्छा असते. तसे होत नाही असे पाहून आपण त्याच्याशी भांडता; पण सारे काही आपणच ॲडजेस्ट करावे असे नाही. जेव्हा त्याचा आपल्याशी बोलण्याचा मूड असेल तेव्हा आपला फेव्हरेट कार्यक्रम टी.व्ही. वर आहे असे सांगून टी.व्ही. सुरु करा. टी.व्ही. पाहात नसाल, तर ऑफिसचे काम काढून बसा. त्यावेळी त्याला जाणीव होईल. धडा शिकवा पण प्रेमाने.

# मुलांना आपल्या छायेपासून दूर ठेवणे ही पालकांची खूप मोठी चूक



दैनंदिन जीवनात आपण पालक स्वतःच कळत-नकळत आपल्या मुलांना वाईट सवयी लावीत असतो. उदा. एक व्यसनी पिता मुलांना सिगारेट, विडी, दारू आणायला सांगतो; पण त्याने त्यापासून दूर राहाण्याची अपेक्षा करीत असतो. बऱ्याचदा आई-वडील जीविकेच्या कामात व्यस्त राहतात व मुलांकडे दुर्लक्ष करतात. बरेच पालक मूल घरात ऐकत नाही, नीट अभ्यास करीत नाही म्हणून बोर्डिंगमध्ये वा प्रसिद्ध शाळेत पाठवतात. काही पालक मुलांचे हित म्हणून त्यांना इतरत्र पाठवतात. कारण काहीही असले, तरी मुलांना जाणते होईपर्यंत आपल्या छत्रछायेपासून दूर ठेवणे ही पालकांची खूप मोठी चूक असते.


कोणत्याही संस्थेत, शाळेत, बोर्डिंग वगैरे ठिकाणी जरी मुलांना अभ्यासाचे नियमित जीवन व सदाचाराचे धडे मिळाले तरी त्यांना उत्कृष्ट व्यक्तिमत्त्व देण्यात, त्यांचा यशाचा मार्ग प्रशस्त करण्यात पालक जे काही करू शकतात ते अन्यत्र होऊ शकत नाही. भावी पिढी उत्तम होण्यासाठी मुलांना उत्तम बनवावे कारण मुलेच काही काळानंतर समंजस, हुशार होऊन समाजाचा व देशाचा भर उचलणार आहेत.

सुसंस्कृत आई-वडील मुलांच्या चारित्र्याचा पाया बालवयातच रचतात. पुढील काही गुण सुरुवातीपासूनच मुलांच्या स्वभावात जोपासायला हवेत. १) कष्टाळूपणा, २) स्वच्छता ३) नीटनेटकेपणा ४) मितव्यय ५) नियमितपणा ६) सभ्यता ७) औदार्य ८) सहकार्य या गुणांच्या चमत्काराने मुले यशस्वी होतात. बरेच आई-वडील मुलांच्या स्वैराचारी, बेशिस्त, स्वच्छंदी वागण्याचा दोष मुलांच्या मित्रांच्या शेजाऱ्यांच्या वा सामाजिक वातावरणाच्या माथी मारतात. खरे तर वरील दुर्गुण मुलांमध्ये येऊ नये यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन करण्याची जबाबदारी आई-वडिलांचीच असते. प्रत्येक माता-पिता आफल्या मुलांना राम, कृष्ण व श्रावणाच्या रूपात पाहू इच्छितात; पण दशरथ, वसुदेवाप्रमाणे या इच्छापूर्तीची किंमत देण्याचा विचार करीत नाहीत. गुण, कर्म, स्वभाव या दृष्टीने स्वतःला श्रेष्ठ बनवाल, तर मुलेही तशीच होतील.

# बैठे काम करून कंबर दुखू लागल्यास

आजच्या व्यस्त दिनचर्येत, दगदगीत, कामाचा ताण, निरनिराळे त्रास, तणाव, श्रम इ. मुळे थकवा येणे स्वाभाविक आहे. त्यातून आपण नोकरी व्यवसायही करीत असाल, तर घर व काम यामुळे दुप्पट थकवा येतो.

बरेच जण थकवा घालवण्यासाठी वेदनाशामक औषधांचा आधार घेतात. वा काहीजण मद्यपानही करतात. या गोष्टींचा नियमित वापर शारीरिकदृष्ट्या शेवटी घातकच ठरतो. थकवा टाळण्याचा व कमी थकवा जाणवण्याचा सर्वश्रेष्ठ व मोफत उपाय म्हणजे विनोदप्रिय होणे. आपल्या विचारांना सकारात्मक रूप देणे, आशावादी राहाणे, आनंददायक घटना लक्षात ठेवणे, नेहमी प्रसन्न राहाणे, हसण्या हसवण्यावर भर देणे. सतत कुढत राहणार, इतरांचा मत्सर करणार, आपल्या दुःखद भूतकाळात चिकटून बसणार, इतरांसाठी कपटी डाव रचणारी, इतरांमध्ये फक्त दुर्गुण पाहाणारी व त्यांची चर्चा करीत राहणारी, स्वतःला तुच्छ, लाचार समजणारी, नेहमी चिडचिड, इतरांवर दोषारोप करणारी माणसे आपला अमूल्य वेळ वाया घालवतातच शिवाय मानसिक, शारीरिक थकव्याला आमंत्रण देतात. त्यापासून दूर राहायला हवे. सातत्याने काम करताना अधूनमधून थंड साध्या पाण्याने हात-तोंड धुवावे.



डोळ्यांवर परिणाम मारावे. केस विंचरावेत. सोय असेल तर स्नानही करू शकता. कपडे, बूट चपला बदलाव्यात यामुळे खूपच आराम पडेल. काम करताना आरामाची संधी मिळाली नाही तर डोळे मिटून डोळ्यावर हात ठेवावेत. यामुळेही थकवा कमी होईल. आराम करताना निश्चित मनाने फक्त आरामच करा. म्हणजे आरामानंतर तरतरी येईल. सातत्याने काम करताना अधूनमधून ऋतनुसार आपल्या आवडीचे पेय (चहा, कॉफी, लिंबू - सरबत, लस्सी, दूध इ.) घेऊ शकता; परंतु सिंथेटिक वा कृत्रिम स्वादाची कोला वा इतर पेये टाळावीत. कामावर धूळ, धूर, ऊन वा इतर कोणत्याही कारणाने डोळ्यांना ताण, थकवा आल्यास डोळे स्वच्छ पाण्याचे सपकारे मारुन धुवावेत. तसेच चेहरा, हात पायही धुवावेत. बैठे काम करून कंबर दुखू लागल्यास वा जास्त शीण जाणवल्यास सोयीनुसार जमिनीवर चटई, सतरंजी अंथरून त्यावर सरळ झोपावे. चिंतामुक्त होऊन शरीर सैल सोडावे. डोळे बंद ठेवावेत. थोड्या वेळातच बदल दिसेल. जास्त काळ उभे राहिल्यामुळे वा चालण्यामुळे पाय, टाचा दुखत असतील, तर गरम पाण्यात थोडे मीठ टाकून त्यात पाय बुडवून ठेवावेत. वेदना व थकवा कमी होईल. पिंड्या दुखत असतील, तर गुडघ्यांवरून त्यावर थंड पाणी सोडावे.

# एकत्र जेवल्याने आवडी निवडी कळतात



आपण कदाचित म्हणाला की, एकत्र जेवल्यामुळे वा न जेवल्यामुळे असा काय फरक पडतो ? पण यामध्ये जमीन आसमानाचा फरक पडतो. प्रेमातील प्रगाढता एकत्र खाऊन-पिऊनच सुरु होते. जर जीवनात रांधणे, वाढणे व एकत्र जेवण महत्वाचे नसते. तर प्रत्येक मुलीला लहानपणीच आई-आजी कणकेची गोळी हातात देऊन म्हणाली नसती की, शिकून घे पोरी, उद्या हीच तुझ्या मदतीला येणार आहे. स्वयंपाक करायला शिकशील, तर सासरी जाऊन राज्य करशील. सकाळचा नाश्ता, लंच, वा डिनर एकत्र खाल्ल्यास खाण्याचे महत्व वाढते. हसत,खेळत,गप्पा मारीत, एकमेकांना न्याहाळीत खाण्याचा आस्वाद घेताना आपण बिलकूल तणावमुक्त होऊन जातो. त्यावेळी समोरच्या व्यक्तीची सोबत अतिशय सुखावह, आनंददायक वाटत असते. त्यातच जर खाद्यपदार्थही स्वादिष्ट, लज्ज्ञतदार असतील, तर दुधात साखरच. पोटाच्या मार्गाने तोंडावाटे बाहेर पडून साऱ्या जाणीवा, सारे प्रेम व्यक्त करण्याशिवाय इतर कोणताही मार्ग उरत नाही. तेव्हा एखादा स्वयंपाक करणाऱ्याचे मुक्तपणे गुणगान करताना अजिबात थकत नाही. उलट त्यातही त्याला खूपच सुखावह वाटत असते. जर एखादी पत्नी आपल्या पतीला खुश ठेवू इच्छीत असेल, त्याची प्राणसखी होऊ इच्छीत असेल, त्याच्या अंतरंगात शिरु पाहात असेल, तर तिला तिच्या पतीच्या पसंतीचे जेवण स्नॅक्स करता यायला हवाच आणि ते येत नसेल, तर शिकून घ्यायला हवे. थोडक्यात सांगायचे ते एवढेच की, प्रेम करा, प्रेमाने खाऊ घाला व प्रेमानेच खाण्यात साथही द्या आणि पाहा आपण एकमेकांच्या किती जवळ येतो ते.

# शिक्षणाला काहीच किंमत दिली जात नाही



वयात आलेल्या, सज्ञान झालेल्या मुलीबद्दलची चिंता तिचे हात पिवळे करुन तिला निरोप देईपर्यंत आई-वडिलांना सतावीत असते. सर्वच आई-वडिलांना मुलीच्या काळजीतून मुक्त होण्याची घाई असते. त्यामुळेच तिचे लग्न लावून देताना ते तिच्या भावनांचा विचारही करीत नाहीत. ज्यामुळे लग्नानंतर तिच्या वैवाहिक जीवनात अनेक प्रश्न उपस्थित होतात. लग्न ही जीवनातील अत्यंत महत्वाची बाब असते. त्यात स्त्रीला सहनशील, त्यागी व समर्पित व्हावे लागते व त्यानंतर तिच्या जीवनाला नवे वळण मिळणार असते. तसे घरातील सर्वांचीच मुलीला तिच्या सासरी सुखी, आनंदी पाहण्याची इच्छा असते. म्हणूनच तिचे लग्न उत्तम, सुखवस्तू कुटुंबातील मुलाशी करण्याची इच्छा ते बाळगून असतात. परंतु अशावेळी त्यांच्याकडून मुलीच्या इच्छेकडे, आवडी-निवडीकडे दुर्लक्ष केले जाते. त्याला महत्व दिले जात नाही व एखादा मुलगा बरा वाटला की, चटकन मुलीचे लग्न करण्याची घाई त्यांच्याकडून केली जाते.


या घाईगडबडीत मुलाच्या सवयी, घर-घराणे, वागणे याचाही विचार केला जात नाही. तसेच मुलाच्या मानसिक, शारीरिक गुणदोषांचाही विचार केजा जात नाही व याचा त्रास मुलीला भोगावा लागतो. बहुधा मुलीच्या शिक्षणाला काहीच किंमत दिली जात नाही. मॅट्रिक-नॉनमॅट्रिक मुलाशी बी.ए.पास मुलीचेही लग्न लावून दिले जाते. का तर तो सरकारी नोकरी करतो आहे म्हणून. त्यामुळे तिचे जीवन सर्वस्वी आई-वडिलांच्या निर्णयावरच अवलंबून असते. परंतू आता जमाना बदलला आहे. पूर्वी लहान वयातच मुलींची लग्ने होत असल्यामुळे त्यांना त्याबाबत समजही कमी होता. त्यामुळेच सासर व मुलींची लग्ने होत असल्यामुळे त्यांना त्याबाबत समजही कमी होता. त्यामुळेच सासर व मुलगा याचा विचार तिच्या माता-पित्यांना व घरातील इतर वडीलधाऱ्यांना करावा लागत असे. पण आता मुलगी वयात आल्यानंतर, शिकून-सवरुन सुजाण व सज्ञान झाल्यानंतर तिच्या भावी आयुष्याबद्दल व पतीबद्दल ती विचार व कल्पना करु शकते. त्या जाणून घेणे अत्यंत गरजेचे असते. विशेषत: मुलीच्या आई, वहिनी व मोठ्या बहिणींनी याबाबत पुढाकार घ्यायला हवा.

## सुगरणीचा सल्ला

- ❒ बाजारातून आणलेली कवठे काही दिवस तशीच ठेवली व नंतर फोडली तर ती अनेक वेळा खराब झालेली दिसतात. आतील गराला बुरशी आलेली असते. म्हणून पिकलेली कवठे आणल्याबरोबर ती फोडून, गर काढून फ्रीजमध्ये ठेवावा. म्हणजे कवठे वाया जात नाहीत.
- ❒ उकडलेल्या बटाट्याची भाजी करताना, बटाटे जास्त वाफेने फुटू नयेत म्हणून त्यात थोडेसे मीठ घालून ते उकडावेत. म्हणजे बटाटे फुटत नाहीत व चवीपुरतेच मीठ बटाट्यात उतरते. हीच कृती छोले, वाटाणे, डबल-बी इ. साठी केल्यास असेच फायदे होतात.

# किशोरवयीन मुलांना मित्रांची संगत करणे खूप आवडते

किशोरावस्था हा आयुष्याचा असा काळ आहे जिथपासून व्यक्तिमत्व आपले स्वरूप धारण करण्यास सुरुवात करते. या किशोरवयीन मुलांसमोर भावनांचे मोकळे आकाश असते.त्यांना इतके काही शिकायला मिळाले की,निवड करणे अवघड होऊन बसते.कधी हे क्षेत्र आवडते तर कधी ते क्षेत्र आवडते ! स्थैर्य प्राप्त न झाल्याने त्यांचे व्यक्तिमत्व आकार घेत नाही.ही किशोरवयीन मुलं जिथं एखाद्या गोष्टीविरूद्ध उत्साहीत होतात तिथं जरासे जरी मनाविरूद्ध घडले की हिरमसून जातात.त्यांचा आत्मविश्वास ढळू लागतो.इतकच नव्हे,तर मानसिक समस्यांना ते आयतंच आमंत्रण देतात ! आईचा प्रभाव मुलावर वडिलांपेक्षा जास्त पडतो.एक समजुतदार आई



आपल्या मुलास केवळ वागण्यातूनच पुष्कळ काही शिकवते. डॉ.रेणू तनेजा यांच्या मते,आईकडून मुलाला मिळणारा मॉरल सपोर्ट त्या मुलासाठी अमूल्य असतो.मुल जेव्हा निर्णय घेण्यास असमर्थ ठरते तेव्हा आपली आई आपल्याला याबाबतीत योग्य मार्गदर्शन करेल याचा त्याला पूर्ण विश्वास असतो. किशोरवयीन मुलांना मित्रांची साथसंगत करणे खूप आवडते.या काळातली मैत्री एकदम पक्की आणि कित्येकदा निर्दोष असते. याकाळात मित्रांचा प्रभाव जास्त पडतो, अमेरिकेत जाऊन स्थायिक झालेल्या मानसोपचारतज्ज्ञ राणी केसरीवाल म्हणतात की,हा जीवनातला एक ट्रान्झिशनल पीरियड आहे.होणाऱ्या बदलास सामोरे जाताना काही प्रमाणात दबाव झेलून ती जास्तच संवेदनशील बनतात. दुसऱ्यांच्या भावना दुखावतील असे कधीही बोलू नका.इतरांची प्रशंसा करा;पण तेही मोकळ्या मनाने ! प्रत्येक वेळी आपलीच स्तुती करत राहणे चांगले नाही.

# पावसाळ्यात हिरव्या बदामाचे सेवन करणे खरंच फायदेशीर आहे का?

पावसाळ्यात आपले शरीर निरोगी ठेवण्यासाठी अतिरिक्त काळजी आणि पोषण घेणे आवश्यक आहे. या ऋतूमध्ये आपल्याला आरोग्यदायी पदार्थांचे सेवन करायला हवे. पावसाळ्याशी संबंधित आजारांविरुद्ध तुमची रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी तुम्हाला हिरव्या बदामासारख्या हंगामी पदार्थांचे सेवन करायला हवे.

त्यामुळेच आम्ही हिरव्या बदामांबद्दल अधिक सविस्तर माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. दिव्या गोपाल, सल्लागार आहारतज्ज्ञ आणि पोषणतज्ज्ञ, मदरहूड हॉस्पिटल्स, बनशंकरी, बेंगळुरू यांनी सांगितले, हिरवे बदाम किंवा गोड हिरव्या शेंगा हे एक सुपरफूड आहे, जे तुम्ही आरोग्य उत्तम राखण्यासाठी सेवन केले पाहिजे.



**पावसाळ्यात हिरव्या बदामाचे सेवन का करावे?**

**केस मजबूत करण्यासाठी**

हिरवे बदाम हे व्हिटॅमिन-ई आणि मॅग्नेशियमसारखी आवश्यक जीवनसत्त्वे आणि खनिजांचा एक चांगला स्रोत आहे. हे केस मजबूत करण्यासाठी आणि केस गळणे कमी करण्यासाठी एकत्र काम करतात. याच्या नियमित सेवनाने, पावसाळ्यातील दमट वातावरणात तुमच्या केसांची चमक आणि ताकद वाढेल, असे दिव्या यांनी सांगितले.

**त्वचा सुधारते आणि पोषण देते** : हिरव्या बदामामध्ये व्हिटॅमिन-ईचे प्रमाण जास्त असल्याने त्याचा त्वचेलाही फायदा होतो. व्हिटॅमिन-ई हे एक खूप प्रभावी अँटिऑक्सिडेंट आहे, जे मुक्त रॅडिकल्सपासून बचाव करते, ज्यामुळे त्वचेचे नुकसान आणि वृद्धत्वाची प्रक्रिया टाळता येते. हिरवे बदाम त्वचेला आतून मऊ आणि चमकदार करण्यासाठी पोषण देतात. हे मुरुम आणि इतर त्वचेच्या समस्या कमी करण्यासदेखील मदत करू शकते, असे दिव्या यांनी सांगितले.

**रोगप्रतिकारशक्ती वाढवते** : पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात साथीच्या आजारांचा धोका वाढतो. तज्ज्ञांच्या मते, हिरव्या बदामांमध्ये अँटिऑक्सिडंट्स आणि आवश्यक पोषक तत्वे असतात, जी रोगप्रतिकारकशक्ती वाढवतात आणि तुमच्या शरीराला सामान्य आजार आणि पावसाळ्यातील संसर्गाशी लढण्यास मदत करतात. याच्या नियमित सेवनाने, हे संपूर्ण पावसाळ्यात तुम्हाला निरोगी आणि उत्साही ठेवण्यात मदत करेल, असे दिव्या यांनी सांगितले.

**हाडं आणि दात मजबूत करतात**

हिरव्या बदामांमध्ये कॅल्शियम आणि मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असते, हे हाडं आणि दातांच्या आरोग्यासाठी आवश्यक असलेली मुख्य खनिजे आहेत. त्यांचे नियमित सेवन केल्याने तुमची हाडे आणि दात मजबूत होतील, त्यामुळे ऑस्टिओपोरोसिस आणि हाडांच्या इतर आजारांचा धोका कमी होईल, असे दिव्या म्हणाल्या.

**पचनासाठी उत्तम** : हिरव्या बदामामुळे अन्न पचन होण्यास मदत होते आणि आतडे निरोगी राहण्यास मदत होते. याच्या सेवनाने बद्धकोष्ठतासारख्या पचनाच्या समस्या, पावसाळ्यातील आहार आणि खाण्या-पिण्याचा वेळ बदलल्यावरही दूर राहतील, असे दिव्या यांनी सांगितले.

**हिरवे बदाम खाण्याची योग्य वेळ कोणती?** : हिरवे बदाम तुम्ही नाश्त्याच्या वेळी घ्या, सॅलेडमध्ये किंवा स्मूदीमधून घ्या, हिरवे बदाम बहुमुखी आणि स्वादिष्ट असतात. मजबूत केसांसाठी, चमकदार त्वचेसाठी हिरव्या बदामाचा आहारात समावेश करा आणि रोगप्रतिकारशक्ती वाढण्यासाठी हे फायदेशीर आहे, असे दिव्या यांनी सांगितले.

# गरम खाण्यामुळे जीभ भाजली?



अनेक वेळा घाईत आपण गरम पदार्थ खातो किंवा गरम पेय पितो आणि आपली जीभ भाजते. गरम चहा प्यायल्याने जीभ भाजल्याचं तर अनेक जणांनी अनुभवलं असेल. जीभ भाजली की आपल्याला खाताना, पिताना किंवा बोलताना त्रास होतो. ही एक गंभीर समस्या नाही.

जीभ भाजली की सामान्यत: आपण लगेच थंड पाणी पितो. पण जर तुम्हाला त्याचा त्रास जास्त होत असेल तर येथे दिलेल्या घरगुती उपायांच्या मदतीने तुम्ही आराम मिळवू शकता.

**दही** : जीभ भाजली असेल तर दही खाणे फायदेशीर आहे. याच्या थंडावाने आराम मिळतो, म्हणून जेव्हा जेव्हा जीभ भाजते तेव्हा फक्त एक चमचा दही घ्या आणि काही वेळ तोंडात ठेवा.

**बेकिंग सोडा** : चिमूटभर बेकिंग सोडा अनेक समस्यांवर उपाय आहे. त्याच्या एल्काइन नेचरमुळे खूप आराम मिळतो. यासाठी बेकिंग सोडा पाण्यात विरघळवून घ्या आणि नंतर गुळण्या करा.

**साखर** : जीभ भाजल्यावर त्वरित आराम मिळवण्यासाठी चिमूटभर साखर देखील खूप प्रभावी आहे. तोंडात साखर टाका आणि ती स्वतःच विरघळू द्या. पाणी पिण्याची गरज नाही. असे केल्याने जळजळ आणि वेदनांपासून खूप आराम मिळेल.

**मध** : मध चाटल्याने जिभेच्या जळजळीतही आराम मिळतो. कारण ते अँटीसेप्टिक गुणधर्मांनी परिपूर्ण आहे.

**एलोवेरा जेल** : कोरफडीच्या वापरामुळे जीभेच्या जळजळीपासून त्वरित आराम मिळतो. त्याचे जेल कूलिंग इफेक्ट प्रदान करते. एलोवेरा जेलचे आइस क्यूब बनवा. हे अनेक समस्यांवर प्रभावी आहे. जिभेवर लावण्याव्यतिरिक्त, तुम्ही त्वचेच्या काळजीमध्ये देखील वापरू शकता.

**साधे अन्न खा** : जीभ भाजली असल्यास, शक्य तितके साधे अन्न खा. खूप मसालेदार अन्न टाळा. साधे अन्न पोट थंड ठेवते त्यामुळे जीभ लवकर बरी होते.

# लग्नानंतर महिलांच्या दिसण्यात आणि रंगातही होतो बदल? पण का?

लग्नानंतर स्त्री-पुरुषांच्या आयुष्यात अनेक बदल पाहायला मिळतात. हे बदल शारीरिक आणि मानसिक दोन्ही दृष्टींनी पाहिले जाऊ शकतात. पण पुरुषांच्या तुलनेत लग्नानंतर महिलांचे आयुष्य अधिक बदलते. शारीरिक असो किंवा मानसिक, सर्व प्रकारचे परिणाम लग्नानंतर महिलांवर दिसू लागतात.

स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. प्रज्ञा त्रिवेदी सांगतात की, भारतातील अनेक महिलांचे लैंगिक आयुष्य लग्नानंतरच सुरू होते. लैंगिक जीवन सुरू केल्यानंतर महिलांच्या शरीरात अनेक बदल दिसून येतात. याशिवाय काही महिला त्यांच्या वैवाहिक जीवनात खूप आनंदी असतात.

ज्यामुळे शरीरात खूप आनंदी हार्मोन्स बाहेर पडतात. या कारणांमुळे लग्नानंतर महिलांच्या शरीरात काही बदल दिसून येतात. मात्र हा बदल प्रत्येकामध्ये दिसून येईलच असे नाही. चला जाणून घेऊया लग्नानंतर शरीरात दिसणारे काही खास बदल.

**स्तनांच्या आकारात बदल**

लग्नानंतर महिलांच्या स्तनांमध्ये सर्वात मोठा बदल झाल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे . लग्नानंतर जोडप्यांमध्ये रोमान्स खूप वाढतो. प्रणयामुळे, आपल्या शरीराची मज्जासंस्था खूप उत्तेजित होते, ज्यामुळे मज्जातंतूंमध्ये क्रियाशीलता वाढते. ज्याचा परिणाम स्तनांवर होतो. तथापि, हे सर्वांना लागू होत नाही. अशी अनेक प्रकरणे आहेत ज्यात लग्नानंतरही स्तनांच्या आकारावर कोणताही परिणाम दिसून येत नाही.

**हॅपी हार्मोन्स वाढतात**

ज्या स्त्रिया त्यांच्या वैवाहिक जीवनात आनंदी असतात त्यांच्या शरीरात अधिक आनंदी संप्रेरकांचा स्राव होऊ लागतो. लग्नानंतर बहुतेक महिलांच्या शरीरात सेरोटोनिन, एंडोर्फिन आणि ऑक्सिटोसिन सारखे हार्मोन्स मोठ्या प्रमाणात बाहेर पडू लागतात. त्यामुळे रोमान्स दरम्यान उत्साह असतो. प्रणयानंतर, आनंदी हार्मोन्स खूप चांगले प्रवाहित होतात.



**चेहऱ्यावर चमक येते**

लग्नानंतर चेहऱ्यावरचा ग्लो वाढतो. विशेषत: अशा महिला, ज्या त्यांच्या वैवाहिक जीवनात खूप आनंदी असतात. कारण आनंदी राहिल्याने चेहऱ्यावर चमक येते. तसेच जेव्हा तुम्हाला प्रणयातून आनंद मिळतो तेव्हा त्याची चमक तुमच्या चेहऱ्यावर दिसते. लग्नानंतर शरीरात निघणाऱ्या हार्मोन्सचा परिणाम तुमच्या त्वचेवर दिसून येतो. यामुळे तुमचा चेहरा मुलायम आणि निरोगी दिसतो.

**वजन वाढते**

अशा अनेक महिला आहेत ज्यांचे वजन लग्नानंतर वाढते. याचे सर्वात मोठे कारण म्हणजे आपल्या आहाराकडे लक्ष न देणे. किंबहुना, लग्नानंतर अनेक स्त्रिया आपल्या कौटुंबिक कामात इतक्या व्यस्त होतात की त्यांना योग्य वेळी जेवणही मिळत नाही. ते इतर अनेक प्रकारची निष्काळजीपणा करतात ज्यामुळे त्यांचे वजन वाढते. तसेच, काही प्रकरणांमध्ये, लैंगिक जीवन वाढल्यामुळे, महिलांच्या पोटावर, मांड्या आणि नितंबांवर चरबी वाढते.

**चेहऱ्यावर मुरूम आणि पुरळ येणं**

काही स्त्रिया लग्नानंतर गर्भधारणा टाळण्यासाठी गर्भनिरोधक गोळ्यांचा अवलंब करतात. त्यामुळे महिलांच्या त्वचेवर पिंपल्स आणि मुरुमांची समस्या दिसू लागते. अशा परिस्थितीत तुम्हीही हे करत असाल तर ते टाळा. डॉक्टरांच्या सल्ल्याने गर्भनिरोधक गोळ्या घ्या. तसेच, गर्भधारणा टाळण्यासाठी सुरक्षित पद्धतींचा अवलंब करा .


**शरीराची गंध वाढवते**

लग्नानंतर महिलांच्या शरीरात इस्ट्रोजेन हार्मोन्सची पातळी लक्षणीय वाढते. इस्ट्रोजेन हार्मोन्स वाढल्यामुळे हृदय सुरक्षित राहते. शिवाय, यामुळे शरीराचा गंधही वाढते.

लग्नानंतर शरीरात इतरही अनेक बदल दिसून येतात. मात्र, हे सर्व बदल तुमच्या शरीरात दिसतीलच असे नाही. प्रत्येक व्यक्तीचे शरीर वेगळे असते आणि त्याची काम करण्याची क्षमताही वेगळी असते. त्यामुळे सर्वच प्रकारचे बदल प्रत्येकामध्ये दिसतीलच असे नाही.

# बायकांना नोकरी का सोडून द्यावी लागते? इच्छा असूनही घराबाहेर पडून काम करता येत नाही कारण..

दिल धडकने दो सिनेमातला एक संवाद आहे. त्यात आयेशा मेहरा या नायिकेचा नवरा असलेला मानव म्हणतो, आजवर आमच्या घराण्यात कुणी बाहेर जाऊन काम केलं नाही; पण मी आयेशाला बिझनेस सांभाळण्याची परवानगी दिली! तो म्हणतो ते बोचरं असलं तरी आजही अनेक महिला घरून नोकरी करण्याची परवानगी असेल तरच नोकरी करू शकतात. अगदी लग्न ठरलेल्या आधुनिक मुलीही सहज सांगतात की 'त्यांनी' म्हणजे सासरच्यांनी सांगितलं आहे की तू नोकरी केलीस तरी आमची काही हरकत नाही. म्हणजेच आजही तरुणीने/बाईने नोकरी करणं हे घरच्यांच्या इच्छेवर आणि परवानगीवरच बहुतांश अवलंबून असतं. तशी परवानगी नसेल तर अनेकजणी नोकरी सोडून, विशेषत: मूल झाल्यानंतर तर घरीच बसतात.



एनपीआर.ओर.जी. या साइटवरच्या लेखाचा संदर्भ घेत सांगायचं तर भारतीय अर्थव्यवस्था जोमाने वाढत असताना दुसरीकडे महिलांचं घराबाहेर पडून काम करणं कमी होतं आहे. २०३० पर्यंत भारतीय अर्थव्यवस्था जगातील तिसऱ्या क्रमाकांची बलाढ्य अर्थव्यवस्था होईल असा अंदाज आहे. ज्या अर्थव्यवस्थेत महिला अधिक प्रमाणात नोकऱ्या, व्यवसाय करतात त्या अर्थव्यवस्थेची वाढ वेगानं होते असं दिसतं. १९९० ते २००० याकाळात भारतीय अर्थव्यवस्थेतही महिलांचे नोकऱ्यांचे प्रमाण वाढलेले होते. अर्थात म्हणजे तरीही दर ५ पैकी फक्त एक महिला अधिकृत नोकरी म्हणावी असं काम करते. घरकाम, शेतीतली कामं त्यात मोजली जात नाही.

**पाच शक्यता म्हणून नोकरी नको**

१. घरात संपन्नता आली, समृद्धी असेल, आर्थिक स्थिती उत्तम असेल तर त्या घरातल्या बाईला नोकरी करण्याची काहीच गरज नाही असं मानलं जातं त्यामुळे संपन्न घरातल्या स्त्रियांचे नोकरी करण्याचे प्रमाण कमी होताना दिसते.

# त्वचा चमकदार होण्यासाठी घरगुती नाईट फेस मास्क

काय आपला चेहरा सकाळी उठल्यावर ड्राय आणि डल दिसतो? अनेक कंपन्यांच्या क्रीम आणि लोशन वापरून झाले असल्यावरही चेहऱ्यावर ती चमक येत नाहीये का? तर आम्ही आज आपल्या घरगुती नाइट फेस मास्कबद्दल माहिती देत आहोत ज्याने आपली त्वचा चमकदार होण्यात मदत मिळेल.

**हळद आणि बेसन** : चार चमचे बेसन आणि दोन चमचे दूध किंवा सायीत चिमूटभर हळद मिसळून मास्क तयार करा. हा रात्रभर चेहऱ्यावर लावून ठेवा. सकाळी गार पाण्याने धुऊन घ्या.

**स्ट्रॉबेरी** : व्हिटॅमिन सी आणि फॉलिक ॲसिडने भरपूर स्ट्रॉबेरी त्वचेला निरोगी बनवतं. हे मास्क तयार करण्यासाठी स्ट्रॉबेरी दुधासोबत क्रश करून पेस्ट तयार करा. त्यात एक चमचा बेसन मिसळून चेहऱ्यावर लावा. सकाळी गार पाण्याने धुऊन घ्या. चेहरा चमकदार दिसेल.

**ओट्स आणि दही** : ओट्स बारीक वाटून त्या एक चमचा दही, एक चमचा मध आणि चिमूटभर हळद मिसळून पेस्ट तयार करा. आवश्यकतेनुसार पाणी मिसळून पेस्ट तयार करा आणि चेहऱ्यावर लावा.

## शुद्धिपत्रक

दैनिक जनप्रवास या अंकात दि.१३/०२/२०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या ग्रामपंचायत शिंगवे ता. आंबेगाव जिल्हा पुणे या ग्रामपंचायतच्या शिंगवे येथील सोनवणे वस्ती क्रमांक २ येथे पाण्याची टाकी बांधणे या बाबत जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली होती. या नोटिसीमध्ये नजरचुकीने सदर नोटीस शिंगवे ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध होण्याचा दिनांक हा दि.१२/०१/२०२५ ते दि.१५/०१/२०२५ असा झाला होता. सदर दिनांक नजरचुकीने झाल्याने त्या ऐवजी हा दि.१३/०२/२०२५ ते दि.१५/०२/२०२५ असा तारखेचा मजकूर आहे असे समजावे (वाचावे)

# पावसाळ्यात चेहरा काळपट : टॅनिंगमुळे तेज कमी झालं?

आजकाल टॅनिंगची समस्या खूप कॉमन होत चालली आहे. पावसाळ्यात चेहरा काळवंडतो. ज्यामुळे चेहऱ्याचा तेज कमी होतो. टॅनिंग घालवण्यासाठी आपण त्वचेची पुरेपूर काळजी घेतो. सनक्रीम किंवा टॅनिंग रिमूव्हर क्रीमचा देखील वापर करतो. पण यात देखील केमिकल रसायनांचा वापर होतो. ज्यामुळे स्किन खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पण ब्यूटी उत्पादनांचा वापर न करताही आपण टॅनिंग घालवू शकता. यासाठी विशेष उतपादानांची गरज नाही. काही घरगुती साहित्यातही आपण घरगुती टॅनिंग रिमुव्हल क्रीम तयार करू शकता. यासाठी बेसन, तांदुळाचं पीठ आणि कॉफी लागेल. कशा पद्धतीने घरगुती टॅनिंग रिमुव्हल क्रीम तयार करावी पाहूयात. टॅनिंग रिमुव्हल क्रीम करण्यासाठी लागणारं साहित्य



**तांदुळाचं पीठ, कॉफी, बटाट्याचा रस**

**कृती** : सर्वात आधी एका बाऊलमध्ये एक चमचा बेसन, तांदुळाचं पीठ आणि कॉफी पावडर घ्या. त्यात २ चमचे बटाट्याचा रस घालून मिक्स करा. सर्व साहित्य एकत्रित व्यवस्थित मिक्स करून पेस्ट तयार करा. पेस्ट लावण्यापूर्वी चेहरा धुवून घ्या. तयार पेस्ट चेहऱ्यावर लावा.

काही वेळ तसेच राहू द्या. काही वेळानंतर पाण्याने चेहरा धुवून घ्या. आपण या क्रीमचा वापर आठवड्यातून २ वेळा करू शकता. यामुळे नक्कीच टॅनिंग दूर होईल.

**बेसन** : चेहऱ्यासाठी बेसनाचे अनेक फायदे आहेत. या पिठात प्रोटीन, लिनोलिक आणि ओलेइक ॲसिड सारखी अनसॅच्युरेटेड फॅट्स असतात. यासह रिबोफ्लेविन, नियासिन, फोलेट आणि बीटा-कॅरोटीन सारखी जीवनसत्त्वे असतात. ज्याचा चेहऱ्याला पुरेपूर फायदा होतो.

**बटाट्याचा रस** : चेहऱ्यासाठी बटाट्याच्या रसाचे अनेक फायदे आहेत. यात लोह, व्हिटॅमिन सी आणि रिबोफ्लेविन असते. जे पोर्समधून घाण काढून चेहरा स्वच्छ करते. यासह डोळ्यांखालील वर्तुळे आणि सुरकुत्या कमी करण्यासही प्रभावी ठरते.

## जाहीर नोटीस

आमचे अशिल सौ. वैशाली विजय डाके (रा. विठ्ठलवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे) सदर नोटीसीने जाहीर करतात की, त्यांचे पती विजय तुकाराम डाके (रा. विठ्ठलवाडी, ता. इंदापूर, जि. पुणे) हे दारूच्या आहारी गेलेले आहेत. दारूच्या नशेत ते सावकाराकडून कायदेशीर/बेकायदेशीर पद्धतीने ५, १०, २० टक्के व्याजदाराने पैसे घेत आहेत. व त्यानंतर सावकार आमचे अशिल व त्यांच्या कुटुंबीयांना नाहक त्रास देत आहेत. तसेच आमचे अशिलांचे पती विजय तुकाराम डाके हे सावकारांनी त्रास दिलेनंतर दारूच्या नशेत विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे आमचे अशिलांचे पती विजय तुकाराम डाके यांना कोणत्याही सावकारांनी कायदेशीर/बेकायदेशीर पद्धतीने, अथवा अन्य कोणत्याही मार्गाने पैसे देऊ नयेत. दिलेले पैशांमुळे आमचे अशिलांचे पती विजय तुकाराम डाके यांनी जर विष प्यायले अथवा त्यांच्या जिवीतास धोका निर्माण झालेस सदरील सावकारांना जबाबदार धरणेत येईल. तसेच वैध/अवैध सावकारी करणाऱ्यांनी आमचे अशिलांचे कुटुंबाला, कुटुंबातील सदस्यांना कसलाही नाहक त्रास देणेचा प्रयत्न करू नये. तसेच कोणीही त्यांचेबरोबर सावकारीचा व्यवहार करू नये यासाठी प्रस्तुतची जाहीर नोटीस देणे भाग पडत आहे.

सही/-
ॲड.ऋषिकेश अविनाश कोथमिरे
बी.ए.एल.एल.बी.
इंदापूर,ता.इंदापूर,जि.पुणे.
मोबा. ९८९०६७०५५२/७८४१००३४५२

## जाहिर नोटीस

दौंड येथील मे.उपविभागीय अधिकारी दौंड यांचे कोर्टात
पिठासन अधिकारी,श्री रेवणनाथ बाबुराव लबडे सो।
फौज/कवि/१२६/२०२३
दिनांक ०६/१०/२०२३

अबीदखान मोहम्मद खान — अर्जदार
रा.दौंड ता.दौंड,जि.पुणे
विरुध्द
मा.मुख्याधिकारी
दौंड नगरपरिषद दौंड

या जाहिर नोटीस द्वारे तमाम लोकांस कळविण्यात येते कि, आसमा अबीद खान हिचा जन्म दिनांक ०७/०५/१९८१ रोजी रेल्वे हॉस्पिटल दौंड ता.दौंड,जि.पुणे येथे राहत्या घरी झाला. त्यांच्या जन्माची नोंद जन्म/मृत्यु दप्तरी नसल्याने सदर जन्माची नोंद होणे बाबत परवानगी व तसा जन्माचा दाखला मिळणेबाबत अर्जदार यांनी किरकोळ अर्ज मे.प्रांत कार्यालय दौंड येथे दाखल केलेला आहे. तसेच अर्जदार यांचा सदर दाखला मिळणे बाबतचा आदेश होणे बाबत मागणी केली आहे. सुनावणी दि.२२/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता नेमण्यात आली आहे.

तरी या जाहिर नोटीस द्वारे तमाम लोकांना कळविण्यात येत कि ज्या कोणास सदर अर्जाबाबत हरकत घ्यावयाची असेल त्यांनी पुढील ३० दिवसात जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून स्वत:अगर वकिलामार्फत लेखी हरकत उपविभागीय अधिकारी दौंड यांच्याकडे किंवा मा.मंडळ अधिकारी यवत दौंड यांच्या कार्यालयात नोंदवावी मुदतीत हरकत न असल्यास आसमा अबीद खान हिच्या जन्माचा दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी. हि जाहिर नोटीस असे.

उपविभागीय दंडाधिकारी दौंड
उपविभागीय कार्यालय दौंड

## जाहिर नोटीस

दौंड येथील मे.उपविभागीय अधिकारी दौंड यांचे कोर्टात
पिठासन अधिकारी,श्री रेवणनाथ बाबुराव लबडे सो।
फौज/कवि/१४१/२०२४

अबीदखान मोहम्मद खान
रा.दौंड ता.दौंड,जि.पुणे
विरुध्द
मा.मुख्याधिकारी
दौंड नगरपरिषद दौंड

या जाहिर नोटीस द्वारे तमाम लोकांस कळविण्यात येते कि,अबीदखान मोहम्मद खान यांचा जन्म दिनांक ०१/०६/१९५० दौंड ता.दौंड,जि.पुणे येथे राहत्या घरी झाला. त्यांच्या जन्माची नोंद जन्म/मृत्यु दप्तरी नसल्याने सदर जन्माची नोंद होणे बाबत परवानगी व तसा जन्माचा दाखला मिळणेबाबत अर्जदार यांनी किरकोळ अर्ज मे.प्रांत कार्यालय दौंड येथे दाखल केलेला आहे. तसेच अर्जदार यांचा सदर दाखला मिळणे बाबतचा आदेश होणे बाबत मागणी केली आहे. सुनावणी दि.१५/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता नेमण्यात आली आहे.

तरी या जाहिर नोटीस द्वारे तमाम लोकांना कळविण्यात येत कि ज्या कोणास सदर अर्जाबाबत हरकत घ्यावयाची असेल त्यांनी पुढील ३० दिवसात जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून स्वत:अगर वकिलामार्फत लेखी हरकत उपविभागीय अधिकारी दौंड यांच्याकडे किंवा मा.मंडळ अधिकारी यवत दौंड यांच्या कार्यालयात नोंदवावी मुदतीत हरकत न असल्यास अबीदखान मोहम्मद खान यांच्या जन्माचा दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी. हि जाहिर नोटीस असे.

उपविभागीय दंडाधिकारी दौंड
उपविभागीय कार्यालय दौंड

## चौकशीची जाहीर नोटीस

एस.आर.एन.क्रमांक: PUN/14706/18/24

फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक:- १०३८/२४

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक वर्सुबाई ट्रस्ट बाबत |

न्यासाचा पत्ता :-द्वारा किसन बाजीराव सावंत,जी.नं.६३.,आढे.,ता.खेड,जि.पुणे पुणे,पुणे,खेड,अधे

अर्जदार -सचिन किसन सावंत,

सर्व संबंधित लोकांस जाहिर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, पुणे, हे वर नमुद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय?आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या आहे काय ?

जंगम मिळकत (वर्णन)

| अं.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | CASH | 1000.00 |

(अ) जंगम मिळकत:- रोख रु. 1000/- मात्र
(अक्षरी रुपये एक हजार मात्र फक्त )

स्थावर मिळकत (वर्णन)

| अं. क्र | शहर किंवा गांव | सी.एस.किंवा महानगरपलिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मुल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरुप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | NA | NA | NA | NA | NA | 0.00 |

(ब) स्थावर मिळकत:- रोख रु.०/- मात्र
(अक्षरी रुपये मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस झाल्या तारखेपासुन तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी.त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जाईल.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाने शिक्यानिशी आज दिनांक १०-०७-२०२५ रोजी दिली.

प्रत:-१. उपरोल्लेखील मालमत्तेवर डकविणेसाठी.
२. न्यासाचे कार्यालयावर डकविणेसाठी
३. स्थानिक दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी.
४. या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर डकविणेसाठी.
५. (इतर असल्यास उल्लेख करावा.)
टीप : आवश्यक तेथे खुण करावी.

शिक्का

सही/-
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे

# लग्नाच्या पहिल्या रात्री मुलीच्या मनात असतं असं काही

लग्न म्हटलं तर मुलींच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होत असतात कारण तिला आपलं घर सोडून दुसऱ्या कोणाच्या घरी त्याच्या कुटुंबासोबत जुळवून घ्यायचं असतं. लहानपणापासून दुसऱ्याच्या घरी जायचे आहे हे ऐकत त्या हिशोबाने वेगवेगळे स्वप्न रंगवत मुली मोठ्या होतात आणि लग्नानंतर पहिल्या रात्री काय घडेल हा विचार तर त्यांच्या मनात सतत सुरूच असतो. पहिल्या रात्रीबद्दल मुलींच्या मनात काय सुरू असतं, त्या रात्रीबद्दल त्यांच्या काय अपेक्षा असतात हे जाणून घेणे देखील आवश्यक आहे कारण अनेकदा मुलांना हे कळतच नाही की त्यांना नेमकं करायचं तरी काय आहे आणि



नवीन घरात, नवीन वातावरणात मुली स्वत:ला काय हवं हे सांगत देखील नाही. म्हणून जाणून घ्या काय अपेक्षा असतात मुलींच्या.

मुलींची इच्छा असते की सर्वात आधी तर मुलाने प्रेमाने तिच्याशी गप्पा माराव्या. तिचा हात आपल्या हातात घेऊन भावना शेअर कराव्या. एकमेकांना एकमेकांबद्दल काय आवडतं हे सांगावं. आवड-निवड सांगाव्या. आणि शेवटी ही जाणीव करून द्यावी की प्रत्येक पावलावर तो तिच्या साथ देईल.

अनेक मुली लग्नाच्या धावपळीत व्यवस्थित आहार घेऊ पात नाही. अशात तिच्यासाठी काही लाइट फूड किंवा ज्यूस, शेक, ड्राय फ्रूट्स अरेंज केल्यास तिला निश्चित आनंद होईल आणि नवरा पुढे देखील तिची काळजी घेईल हे कळून येईल.

मुलींना फर्स्ट नाइट नेहमी लक्षात राहावी असं वाटतं असतं. याला मेमोरेबल करण्यासाठी फोटोहून अधिक स्पेशल काय असू शकतं. सेल्फी, कँडिड फोटो उत्तम पर्याय ठरेल.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग क्र. १, पुणे
## ई-निविदा सूचना क्र.०५ सन २०२५ २६ ( दुसरी मागणी)

जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत तळेगाव ढमढेरे पाणी पुरवठा योजना, ता. शिरुर, जि. पुणे या योजनेकरिता (Floating Pumping Station) करणे. या कामाची निविदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग क्र. १, पुणे यांचेकडून मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित किंमत रु. ७८,७१,०००/- (GST विरिहीत) आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि. १८.०७.२०२५ पासून www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सूचनेनुसार राहतील.

दिनांक : ०७.०७.२०२५

सही/-
(अर्जुन नाडगौडा)
कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग क्र.१
पुणे ४११००१

विमाका / पुणे / जाहि / ७८ / २०२५ - २०२६

# पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर राज्यातील वाहतूक कोंडीवर नियंत्रण येईल : मंत्री उदय सामंत

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्रातील सुरू प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर राज्यातील वाहनांची गर्दी, वाहतूक कोंडी यावर मोठ्या प्रमाणात नियंत्रण येईल, असे मंत्री डॉ. उदय सामंत यांनी आज विधान परिषदेत सांगितले. सदस्य सत्यजित तांबे यांनी राज्यातील वाहतूक कोंडी, चुकीची चलने, पोलिसांची कारवाई आणि मोठ्या शहरांतील प्रकल्पांसंदर्भात अर्धा तास चर्चेच्या सूचना मांडल्या होत्या, त्यास मंत्री डॉ.सामंत यांनी उत्तर दिले.

मंत्री डॉ .सामंत म्हणाले की, वाहतूक कोंडी ही मुंबईसह सर्व मेट्रो शहरांमध्ये मोठी समस्या झाली आहे. यावर तोडगा काढण्यासाठी मागील महिन्यांत तीन बैठकांचे आयोजन करण्यात आले. यात एक बैठक उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. गृहविभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव इक्बाल चहल यांच्या नेतृत्वाखाली राज्यस्तरीय उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून, समितीने २० दिवसांत गृह व परिवहन विभागाला अहवाल सादर करावा, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

गाडी पार्किंगमध्ये असतानाही चलन मिळतात, हे गंभीर प्रकार आहेत. त्यांचीही चौकशी सुरु आहे. कोणी आणि कुठे कॅमेरे लावले, याची माहिती घेतली जात आहे, असे मंत्री डॉ.सामंत यांनी सांगितले. वाहनांची वाढती संख्या देखील वाहतूक कोंडीस कारणीभूत ठरत असल्याचे मंत्री डॉ.सामंत यांनी नमूद केले. आजपर्यंत महाराष्ट्रात ४ कोटी ९५ लाख वाहने नोंदवण्यात आली आहेत. फक्त मुंबईत दररोज ७९४ नव्या वाहनांची नोंद होते. यामुळेच मुंबई, पुणे, नागपूर



यांसारख्या शहरांत मेट्रो जाळ्याचा विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असेही त्यांनी सांगितले. राज्यात मेट्रो प्रकल्पांची प्रगती सांगताना त्यांनी स्पष्ट केले की, मुंबईत ३९३.७६ किमी, पुण्यात १३६.४२ किमी आणि नागपुरात ८३.८२ किमी लांबीचे मेट्रो प्रकल्प साकारले जात आहेत. हे पूर्ण झाल्यानंतर सुमारे १.५ ते २ कोटी लोक दररोज मेट्रोने प्रवास करतील. मुंबईतील सागरी किनारा रस्ता हा ऐतिहासिक प्रकल्प असल्याचे सांगत सामंत म्हणाले की, पूर्वी वांद्र्याहून नरिमन पॉईंटला पोहोचायला दीड ते दोन तास लागायचे, आता तोच प्रवास १७-१८ मिनिटांत होतो.

पुढे बोलताना मंत्री डॉ.सामंत यांनी सांगितले की, वसई-विरारपर्यंत मेट्रो नेण्याचा संकल्प केला आहे. शहरांत रिंगरोडसुद्धा उभारल्या जात आहेत. सकाळी ७ ते रात्री १० या वेळेत शहरांतून अवजड वाहने जाऊ नयेत, यासाठी विशेष निर्देश देण्यात आले आहेत.

सभागृहात सदस्य श्री.तांबे यांनी मांडलेल्या मुद्द्यांवर उत्तर देताना सामंत म्हणाले की, वाहतूक नियंत्रण करताना पोलीस, परिवहन आणि महसूल विभाग एकत्रित कारवाई करतात. यामुळेही ट्रॅफिक जाम होतो. यावर तोडगा काढण्यासाठी गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली असून, सर्व संबंधित मुद्दे त्या समितीत समाविष्ट केले जातील.

## शशिकांत शिंदे शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नवे प्रदेशाध्यक्ष

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : शरद पवारांनी भाकरी फिरवली असून शशिकांत शिंदे यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. जयंत पाटलांच्या राजीनाम्यानंतर आता पक्षाचा धुरा शशिकांत शिंदे यांच्या खांद्यावर देण्यात आली आहे. शशिकांत शिंदे यांची निवड ही एकमताने करण्यात आली आहे. शशिकांत शिंदे हे शरद पवारांचे विश्वासू नेते मानले जातात. त्यामुळे त्यांना ही संधी मिळाल्याची चर्चा आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची मंगळवारी महत्त्वाची बैठक पार पडली. त्यामध्ये नव्या प्रदेशाध्यक्षपदाची घोषणा करण्यात आली. मावळते प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनीच त्यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. त्यानंतर शशिकांत शिंदे यांची एकमताने निवड करण्यात आली.

शशिकांत शिंदे हे राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून शरद पवारांसोबत आहेत. राष्ट्रवादीच्या फुटीनंतरही त्यांनी शरद पवारांची साथ दिली. पक्षाच्या संघटनात्मक बांधणीमध्ये त्यांना मोठा अनुभव आहे. तसेच पश्चिम महाराष्ट्रातील पक्षाच्या प्रमुख नेत्यांपैकी ते एक आहेत. आज मुंबईत वाय बी चव्हाण सेंटरमध्ये राष्ट्रवादी पक्षाची सर्वसाधारण बैठक पार पडली. या बैठकीला शरद पवार, जयंत पाटील, माजी मंत्री अनिल देशमुख, जितेंद्र आव्हाड, हर्षवर्धन पाटील, शशिकांत शिंदे यांच्यासह इतरही अनेक महत्त्वाच्या नेत्यांची उपस्थिती होती. या बैठकीनंतर पक्षाच्या अनेक महत्त्वाच्या नेत्यांनी भाषण केले. अनिल देशमुख यांनी नव्या प्रदेशाध्यक्षपदासाठी शशिकांत शिंदे यांच्या नावाचा प्रस्ताव ठेवला. हा प्रस्ताव एकमताने संमत करण्यात आला. त्यानंतर शरद पवार यांनी शशिकांत शिंदे यांच्या नावाची राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) नवे प्रदेशाध्यक्ष म्हणून घोषणा केली. काही दिवसांपूर्वी जाहीर भाषणात जयंत पाटील यांनी मला प्रदेशाध्यक्षपदाच्या जबाबदारीतून मुक्त करावे, अशा भावना व्यक्त केल्या होत्या.

## नदी किनारी पूर रेषेसंदर्भात असलेल्या ब्ल्यू लाईनबाबत पुन्हा सर्वेक्षण : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : राज्यातील नद्यांच्या किनारी असलेल्या पूर रेषेसंदर्भात असलेल्या ब्ल्यू लाईन बाबत महसूल आणि जलसंपदा विभागामार्फत पुन्हा सर्वेक्षण केले जाईल, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधान परिषदेत सांगितले. सदस्य अनिल परब यांनी बदलापूर जवळील उल्हास नदी पात्रात होत असलेल्या अतिक्रमणाबाबत प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री प्रवीण दरेकर, सतेज पाटील, डॉ. मनीषा कायंदे यांनी सहभाग घेतला.

महसूल मंत्री बावनकुळे म्हणाले, नदी किनारी असलेल्या क्षेत्रातील माती उत्खनन करुन उल्हास नदीपात्रात टाकत असल्याचे निदर्शनास आले होते. त्या अनुषंगाने गौण खनिजासाठी आणि वापरण्यात आलेल्या यंत्रसामग्रीसाठी एकूण १० कोटी १६ लाख १७ हजार १४१ एवढ्या दंडात्मक रकमेचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच यामध्ये वापरण्यात आलेली यंत्रसामग्री जप्त करण्यात आली आहे. हा दंड वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले. दहिसर येथे गणपत पाटील नगर परिसरात भराव टाकला जात असल्याबाबतच्या एका उपप्रश्नाच्या उत्तरात येथे तीन दिवसात महसूल विभागाचे अधिकारी जाऊन चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करतील, असे मंत्री श्री. बावनकुळे यांनी सांगितले. त्याचप्रमाणे कोकण विभागातील समुद्र किनारा आणि नदी किनारी महसुली जागेवर अनेक ठिकाणी झालेले अतिक्रमण काढण्याची कार्यवाही सुरू असून अतिक्रमण केलेल्या सर्व प्रकरणांची चौकशी करण्यात येईल, असेही महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

## कुष्ठरोग निर्मूलनाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरीय समिती स्थापन करणार : सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : राज्यातील कुष्ठरोग निर्मूलनाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे राज्यस्तरीय समिती स्थापन केली जाणार आहे. या समितीत या क्षेत्रात कार्यरत तज्ज्ञ, डॉक्टर, स्वयंसेवी संस्था व व्यक्तींचा समावेश असणार आहे. ही समिती दर तीन महिन्यांनी आपला अहवाल राज्य सरकारला सादर करणार असून, तिच्या शिफारसींमुळे कुष्ठरोग निर्मूलनाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी अधिक प्रभावी होईल, असा विश्वास सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानभवन येथे झालेल्या बैठकीत व्यक्त केला.

कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाचे राज्यस्तरावर योग्य निरीक्षण होण्यासाठी आरोग्य सेवा आयुक्तांच्या नेतृत्वाखाली एक स्वतंत्र समिती देखील स्थापन करण्यात येणार आहे. ही समिती शहरी, ग्रामीण आणि शालेय स्तरावरील रुग्ण शोध मोहीम, उपचार, तसेच पुनर्वसन यासाठी कार्यपद्धती निश्चित करेल आणि राज्यभरातील कामकाजाचे मार्गदर्शन करेल.

बैठकीत राज्यातील स्वयंसेवी संस्थांनी अनुदानवाढीची मागणी मांडली. सध्या राज्यात कुष्ठरोगावर उपचार करणाऱ्या १२ स्वयंसेवी रुग्णालयांमध्ये २,७६४ खाटा आहेत, तर पुनर्वसन करणाऱ्या ११ संस्थांमध्ये १,८२५ खाटा मंजूर आहेत. यातील रुग्णालय तत्त्वावरील संस्थांना प्रति खाटा प्रतिमाह रु. २,२०० तर पुनर्वसन संस्थांना रु. २,००० इतके अनुदान मिळते. हे अनुदान वाढवून रु. ६,००० प्रति खाटा करण्याचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाने तयार करून वित्त विभागाकडे सादर केला असून, लवकरच तो राज्य मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येणार आहे, अशी माहिती आरोग्यमंत्र्यांनी दिली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम म्हणून कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाची अंमलबजावणी अधिक जोरदारपणे करण्याचे निर्देश आरोग्यमंत्र्यांनी यावेळी दिले. कुष्ठरोग शोध मोहीम, उपचार आणि निर्मूलन या त्रिसूत्रीवर आरोग्य विभागाने लक्ष केंद्रित करावे. आशा सेविका, शालेय आरोग्य तपासणी आणि इतर आरोग्य कर्मचारी यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त रुग्णांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करा, असेही ते म्हणाले.

या बैठकीस आमदार सुलभा खोडके, विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवनचे प्रतिनिधी, आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, आरोग्य संचालक डॉ.विजय कंदेवाड, कुष्ठरोग सहसंचालक डॉ.सांगळे, तसेच विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## पुढील अधिवेशनात धर्मांतर विरोधी कायदा आणणार : गृह राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : राज्यात धर्मांतर विरोधात कायद्याच्या अभ्यासासाठी मुख्यमंत्र्यांनी पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. या समितीच्या अहवालातील सूचनांचा विचार करून पुढील अधिवेशनात धर्मांतरविरोधी कायदा मान्यतेसाठी सादर केला जाईल, असे गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी विधान परिषदेत सांगितले.

सदस्य श्रीमती उमा खापरे यांनी पुणे जिल्ह्याच्या दौंड तालुक्यातील केडगाव येथे पंडिता रमाबाई मुक्ती मिशन या संस्थेच्या अनाथ आश्रमात मुली व महिला यांचे धर्मांतरण केले जात असल्याबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री प्रवीण दरेकर, डॉ.श्रीमती मनिषा कायंदे, सदाशिव खोत यांनी सहभाग घेतला.

याबाबत माहिती देताना राज्यमंत्री डॉ. भोयर म्हणाले की, केडगाव येथील अनाथ आश्रमामध्ये मुलींचे धर्मांतरण तसेच मुलींना मारहाण करणे, सार्वजनिक शौचालय साफ करायला लावणे, जातीवरून शिवीगाळ करणे, वाईट वागणूक देणे अशा फिर्यादीवरून ८ डिसेंबर २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. या संस्थेतील अनियमितता तसेच सुरू असलेल्या बेकायदेशीर कृत्यासंदर्भात तपासी अधिकारी म्हणून पोलीस उपअधीक्षक दर्जाच्या महिला पोलीस अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबाबतचा अधिक तपास सुरू असून एका महिन्यात याचा चौकशी अहवाल प्राप्त होईल, आणि त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्याबाबत संबंधित विभागाला कळविण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

## भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला पृथ्वीवर परतले, कॅलिफोर्नियाच्या समुद्र किनाऱ्यावर सेफ लँडिंग




जनप्रवास : प्रतिनिधी

दिल्ली : भारतीय अंतराळवीर शुभांशू शुक्ला आपल्या चार सहकाऱ्यांसह सुरक्षितपणे पृथ्वीवर परतले आहेत. त्यांचे ड्रॅगन अंतराळयान कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्यावर यशस्वीरीत्या उतरले आहे. सुमारे १८ दिवस अंतराळात राहिल्यानंतर त्यांनी अनेक शास्त्रीय प्रयोग पूर्ण केले आहे.

शुभांशू शुक्ला २५ जून रोजी फ्लोरिडा येथील केनेडी स्पेस सेंटरवरून फाल्कन ९ रॉकेटच्या सहाय्याने अंतराळात गेले होते. ते अमेरिका, पोलंड आणि हंगेरीमधील तीन सहकारी अंतराळवीरांसोबत १४ जुलै रोजी दुपारी ४.४५ वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरून पृथ्वीकडे रवाना झाले. अखेरीस, हे सर्व अंतराळवीर आज १५ जुलै रोजी पृथ्वीवर पोहोचले.

सध्या, अंतराळयान समुद्रात उतरल्यामुळे सर्व अंतराळवीरांना तेथून बाहेर काढण्याची प्रक्रिया सुरू आहे. यानंतर त्यांची आरोग्य तपासणी केली जाईल आणि अंतराळ प्रवासामुळे शरीरावर झालेल्या परिणामांपासून त्यांना सावरण्यासाठी पुढील १० दिवस देखरेखीखाली ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर शुभांशू शुक्ला भारतात परत येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. हा क्षण भारतासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे.दरम्यान, अमेरिकन अंतराळ संस्था नासा आणि भारतीय संस्था इस्रो यांच्यातील करारानुसार भारतीय हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांची ॲक्सिओम-४ या मोहिमेसाठी







निवड झाली होती. ४१ वर्षांपूर्वी १९८४ मध्ये सोव्हिएत युनियनच्या अंतराळयानातून भारताचे राकेश शर्मा यांनी अंतराळात प्रवास केला होता. यानंतर शुभांशू यांचा हा अनुभव भारताच्या गगनयान मोहिमेत उपयुक्त ठरणार आहे. ही भारताची पहिली मानवी अंतराळ मोहीम आहे, ज्याचा उद्देश भारतीय अंतराळवीरांना पृथ्वीच्या खालच्या कक्षेत पाठवणे आणि त्यांना सुरक्षितपणे परत आणणे आहे. हे २०२७ मध्ये प्रक्षेपित होण्याची शक्यता आहे. भारतात अंतराळवीरांना गगनयात्री म्हणतात. त्याचप्रमाणे रशियामध्ये त्याला कॉस्मोनॉट म्हणतात आणि चीनमध्ये त्याला तैकोनॉट म्हणतात.

६ जुलै रोजी आयएसएस स्टेशनवरून शुभांशू यांचे काही फोटो समोर आले. ज्यामध्ये शुभांशू क्युपोला मॉड्यूलच्या खिडकीतून पृथ्वीकडे पाहत असल्याचे दिसून आले होते. शुभांशू शुक्ला हे भारतीय हवाई दलात स्क्वाड्रन कमांडर आहेत आणि त्यांना 2000 तासांहून अधिक उड्डाणाचा अनुभव आहे. आपल्या १८ दिवसांच्या अंतराळ प्रवासात त्यांनी ६0 पेक्षा अधिक शास्त्रीय प्रयोगांमध्ये सहभाग घेतला, ज्यामध्ये भारताचे ७ महत्त्वाचे प्रयोगही समाविष्ट होते. त्यांनी अंतराळात मेथी आणि मूग या बियांचे निरीक्षण व अभ्यास केला आहे.

## कला विश्व



### रणबीर कपूर आणि अजय देवगणबरोबर काम केलेल्या अभिनेत्याचा होता ऑम्लेटचा स्टॉल

पडद्यावर दिसणारे अनेक कलाकार बऱ्याचदा आर्थिक संकटांचा सामना करीत असतात. ते विविध मुलाखतींमधून याचा खुलासा करतात. आता रणबीर कपूर व सलमान खानबरोबर काम केलेल्या एका अभिनेत्याने त्याच्या आर्थिक परिस्थितीबाबत वक्तव्य केले आहे. अभिनेता इश्तियाक खानने सलमान खानबरोबर भारत या चित्रपटात काम केले होते आणि तो रणबीर कपूरच्या तमाशा या चित्रपटातदेखील दिसला होता. इश्तियाकने नॅशनल स्कूल ऑफ ड्रामामधून पदवी मिळवली आणि त्याने व्यावसायिक अभिनेता होण्यापूर्वी एका शाळेत अभिनयाचा शिक्षक म्हणूनही काम केले. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत अभिनेत्याने खुलासा केला की, जेव्हा तो शिक्षक म्हणून काम करत होता, त्यावेळी त्याने जवळच एक ऑम्लेटचा स्टॉल लावला होता. एकदा त्याचा विद्यार्थी त्याच्या स्टॉलवर आला होता, त्यावेळी त्याला त्याची लाज वाटली. तो असेही म्हणाला की, मी ज्या वातावरणात वाढलो, त्याचा माझ्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव आहे. इश्तियाक खानने नुकतीच मुलाखत दिली. या मुलाखतीत तो म्हणाला, संध्याकाळी आम्ही काही जण अंड्यांचा स्टॉल लावायचो. मी कॉलेजच्या नाटकांसाठी, संगीत आणि डान्ससाठी कॉन्ट्रॅक्टदेखील स्वीकारायचो. एके दिवशी माझा एक विद्यार्थी माझ्या स्टॉलवर आला. तो त्याच्या सरांना म्हणजेच मला त्या स्टॉलवर पाहून आश्चर्यचकित झाला. मला त्यावेळी लाज वाटली होती. इश्तियाक पुढे म्हणाला, मुलं माझा आदर करत होती. शाळेत मुलांना मी माझा चेहरा कसा दाखवू हे मला कळत नव्हतं. मी निराश झालो. मी दुसऱ्या दिवशी शाळेत गैरहजर राहिलो. मग तो मुलगा पुन्हा आला, त्यावेळी तो त्याच्या वडिलांसह स्कूटरवरून आला. त्यानं त्याच्या वडिलांना सांगितलं, की हे आमचे शिक्षक आहेत. त्याच्या वडिलांनी माझ्याकडे पाहिले; पण ते काहीही बोलले नाहीत. तेव्हा माझ्या एका वरिष्ठानं मला समजावून सांगितलं की, तू चोरी करत नाहीस ना? मग तुला लाज का वाटते? तुझ्या कामाबद्दल लाज बाळगू नको. पुढे इश्तियाक खान त्याच्या मित्रांबद्दल म्हणाला की, माझ्या सगळ्या मित्रांना माहीत होतं की, माझ्याकडे पैसे नाहीत. एकदाही त्यांनी माझ्याकडे चहाचे पैसे मागितले नाहीत. माझ्याकडे सायकल किंवा स्कूटर नव्हती. पण, माझ्या मित्रांची सायकल, स्कूटर मी अधिकारानं वापरायचो. त्या गोष्टी माझ्या नाहीत याची त्यांनी मला कधीच जाणीव करू दिली नाही. मी ज्या वातावरणात वाढलो, त्यामुळे मी एक चांगला माणूस होण्याचा प्रयत्न करतो. जर मी द्वेष असलेल्या वातावरणात वाढलो असतो, तर कदाचित मी एक चांगला माणूस झालो नसतो. जेव्हा माझ्या गावात होतो, त्यावेळी माझी सर्व स्तरांतील लोकांशी मैत्री होती. श्रीमंत मुलांपासून ते असे लोक जे सगळ्यांशी बोलत नाहीत, अशा सर्वांशी माझी मैत्री होती. मुंबईत काही लोक दलित आणि मुस्लिमांना घरं भाड्यानं देत नाहीत. हा माझ्यासाठी खूप मोठा सांस्कृतिक धक्का होता, असेही अभिनेता म्हणाला. इश्तियाक ने 'तीस मार खान', 'मैदान' व 'विकी विद्या का वो वाला व्हिडीओ' यांसारख्या चित्रपटांमध्येही काम केले आहे.



### ती मला बहिणीसारखी, अभिनेत्री रोशनी वालियानं केलं मृणाल ठाकूरचं कौतुक

'सन ऑफ सरदार २' चित्रपट सध्या चर्चेत आहे. लवकरच चित्रपटगृहांमध्ये हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. अभिनेता अजय देवगण व मृणाल ठाकूर यामध्ये मुख्य भूमिकांतून झळकणार आहेत. मृणाल पहिल्यांदाच अजय देवगणबरोबर या चित्रपटामधून काम करीत आहे. अशातच या चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिका साकारणारी अभिनेत्री रोशनी वालियानं नुकतंच मृणालचं भरभरून कौतुक केलं आहे. रोशनी वालिया लवकरच 'सन ऑफर सरदार २'मधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतीच तिनं तिनं अभिनत्री मृणाल ठाकूरबद्दल सांगितलं आहे. त्यासह रोशनीनं 'सन ऑफ सरदार २'मध्ये काम करण्याचा तिचा अनुभवसुद्धा सांगितला आहे. रोशनी म्हणाली, 'सन ऑफ सरदार २' चित्रपटासाठी ऑडिशन दिल्यानंतर माझी निवड झाली; पण मी या चित्रपटात इतक्या दिग्गज कलाकारांसह काम करणार आहे यावर माझाच विश्वास बसत नव्हता. रोशनीनं पुढे याबाबत सांगितलं, चित्रपटाच्या सेटवर अजयसरांनी माझी त्यांच्या मुलीप्रमाणे काळजी घेतली. अजयसर खूप गमतीशीर स्वभावाचे आहेत. मला सर्व कलाकारांबरोबर काम करताना खूप मजा आली. चित्रपटातील सर्व कलाकार खूप छान आहेत. पुढे रोशनी मृणाल ठाकूरबद्दल म्हणाली, मृणाल मला मोठ्या बहिणीसारखी आहे. ती मला खूप जवळची वाटते. तिनं मला मोठ्या बहिणीप्रमाणे खूप चांगले सल्ले दिले. तिनं मला तिच्या संघर्षाबद्दलही सांगितलं. रोशनी पुढे मृणालबद्दल म्हणाली, ती एक सुपरस्टार आहे. माझ्या मते, तर ती बॉलीवूडमधील आणि भारतातील उत्कृष्ट अभिनेत्रींपैकी एक आहे. इंडस्ट्री कोणतीही असो; ती प्रत्येक ठिकाणी उत्तम काम करीत आहे आणि याचा मला खूप आनंद आहे. 'सन ऑफ सरदार २' हा चित्रपट येत्या २५ जुलैला प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटामध्ये अजय देवगण, मृणाल ठाकूर, चंकी पाडे, संजय दत्त, संजय मिश्रा, रवी किशन, रोशनी वालिया यांसारखे प्रसिद्ध कलाकार झळकणार आहेत. अजय देवगणची मुख्य भूमिका असलेल्या 'सन ऑफ सरदार' या चित्रपटाच्या पहिल्या भागाचा हा सीक्वेल आहे.

* संपादक – संजय प्रल्हाद भोकरे * सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. एम्बसी सेंटर, प्लॉट नं. २०७, जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई, ४०००२१. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०–२५४२४२३२ E-mail : sanjmaha@gmail.com